


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार १२ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

# राज्यात ऊन्हाचा तडाखा वाढणार

## कमाल तापमानात 2 ते 3 अंशांनी वाढ होण्याचा अंदाज



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मोसमी पावसाची वाटचाल काहीशी संथ गतीने सुरू असून मागील तीन दिवसांपासून मोसमी पावसाची उत्तर सीमा कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथे स्थिर आहे. दरम्यान, पुढील तीन दिवसांत राज्यातील अंतर्गत भागात कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला असून मोसमी पावसाची आतुरतेने वाट पाहणा-या नागरिकांना ऊन्हाचा तडाखा सहन करावा लागेल, असा अंदाज व्यक्त क्मागील काही दिवसांपासून राज्यातील काही भागात वादळी पाउस आणि पूर्व मोसमी पावसामुळे कमाल तापमानामुळे काहीशी घट झाली होती, त्यामुळे नागरिकांना तीव्र ऊष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र, राज्यातील काही भागात पूर्व मोसमी पाउस अजूनही सक्रिय झाला नसून मागील काही दिवसांपासून राज्यातील बहुतांश जिल्ह्यांवर असलेला वादळी पावसाचा प्रभाव काहीसा कमी होताना दिसत आहे. दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात पावसाची नोंद होत असली तरीही मुंबईसह उत्तर कोकणात ऊष्मा कायम असून विदर्भातील बहुतांश भागातील कमाल तापमानात मागील काही दिवसांपासून वाढ होताना दिसत आहे. दरम्यान, गुरु वारी वर्धा येथे ४४.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर ब्रम्हपुरी ४४.२, नागपूर ४४, अकोला ४३.४, तर यवतमाळ येथे ४३.२ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. तसेच मध्य महाराष्ट्रातील काही भागातही कमाल (पान २ वर)

# राज्यात मान्सून लांबणीवर



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरिकांना दिलासा देणा-या मान्सूनच्या प्रगतीला गेल्या दोन दिवसांपासून ब्रेक लागला आहे. महाराष्ट्रातील मान्सूनचा प्रवास सध्या एकाच भागात थांबला असून, पुढील ३ दिवसांत तो राज्यातील आणखी काही भाग व्यापण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे.दरम्यान, पुढील पाच दिवस राज्यातील विविध भागांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आज कोकण, विदर्भासह काही जिल्ह्यांमध्ये तुरळक पाउस पडण्याची शक्यता असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान शेतकरी राजा अद्यापही मान्सूनच्या प्रतीक्षेत आहे. सोमवारी मान्सून सिंधुदुर्ग, कोल्हापूर (पान २ वर)

# तुकाराम मुंढे विदर्भ दौ-यावर!

## भेसळखोरांचे धाबे दणाणले



**नागपूर/प्रतिनिधी :**अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे लवकरच विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशात दौ-यास निघणार आहेत. दौ-याचा उद्देश राज्यभर सुरू असलेल्या भेसळखोर आणि तस्करांवर कारवाई आणखी वाढवणे असल्याच्या पोस्ट समाज माध्यमांवर तुकाराम मुंढे यांच्या समर्थकांनी प्रसारित केले आहे. आयुक्त मुंढे यांच्या अचानक तपासणीमुळे हाटेल, रेस्टारंट, ढाबे, डेअरी, किरकोळ दुकाने व औषध विक्रेते सतर्क झाले आहेत. आयुक्त तुकाराम मुंढे यांचा विदर्भ आणि मराठवाडा दौरा प्रशासनाची काटेकोर पद्धत आणि लोकांच्या आरोग्यावरील कारवाईचा आणखी कठोर संदेश देण्याचे संकेत आहे. या दौ-याची कुजबुज लागल्याने भेसळखोरांची झोप उडालेली आहे, आणि व्यवसायांनी नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल. आयुक्त मुंढे यांचा दौरा मुख्यत? लोकांच्या आरोग्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आहे. भेसळयुक्त, प्रतिबंधित किंवा नियमविरोधी पदार्थांची विक्री करणा-या व्यवसायांवर लक्ष ठेवणे, नियमांचे काटेकोर पालन होईल याची खात्री करणे, तसेच औषध व अन्न क्षेत्रातील पारदर्शकता वाढवणे या दौ-याचे मुख्य उद्देश आहेत. राज्यभरातील हाटेल, रेस्टारंट, ढाबे, खाद्यपदार्थ उत्पादक, डेअरी, किरकोळ दुकाने, मेडिकल स्टोअर्स आणि इतर व्यवसायिक प्रतिष्ठान या दौ-याच्या यादीत आहेत. प्रत्येक ठिकाणावर क्नत्र्ह नियमांचे पालन केले जात आहे की नाही, हे पाहिले जाईल. नियमांचे उल्लंघन आढळल्यास माल जप्त, परवाना रद्द, प्रतिष्ठान सील, कायदेशीर कारवाई, तसेच संबंधित व्यक्तींची अटक होउ शकते. आयुत्तांच्या अचानक तपासणीमुळे कोणत्याही पूर्वसूचना दिल्या जात नाहीत, त्यामुळे सर्व व्यवसायांना सतर्क राहणे आवश्यक आहे. या कारवाईमुळे नागरिकांना सुरक्षित अन्न व औषध मिळेल. भेसळखोर व तस्कर व्यवसायांवर नियंत्रण ठेवून आरोग्याच्या दृष्टीने धोका कमी केला जाईल. लोकांनीही नियमांचे पालन करणा-या प्रतिष्ठानांचा व्यवहार करण्याची सवय ठेवावी.

# विधानसभा, लोकसभेनंतर राज्यसभेतही टीएमसी फुटली

**कोलकाता/वृत्तसंस्था-** घर फिरले की घराचे वासेही फिरतात याचा प्रत्यय सध्या पश्चिम बंगालमधील राजकारणाकडे पाहून येत आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर तृणमूल कॉँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. विधानसभेतील जवळपास ६० आमदार, लोकसभेतील २० खासदारानंतर आता राज्यसभेतील खासदारही तृणमूलची साथ सोडताना दिसत आहे. गुरुवारी तृणमूल कॉँग्रेसचे राज्यसभा खासदार प्रकाश चिक बराईक यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांत तृणमूल कॉँग्रेसला सोडचिठ्ठी



देणारे ते तिसरे राज्यसभा खासदार ठरले आहेत.प्रकाश चिक बराईक यांच्याआधी तृणमूल कॉँग्रेसच्या दोन ज्येष्ठ खासदारांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. तृणमूलचे ज्येष्ठ नेते सुखेंदू शेखर रॉय आणि सुष्मिता देव यांनीही पक्षाची साथ सोडली. त्यानंतर प्रकाश बराईक यांनीही खासदारकीचा राजीनामा दिल्यामुळे तृणमूलला धक्का बसला आहे. दरम्यान, प्रकाश बराईक यांच्या राजीनाम्यामुळे राज्यसभेत तृणमूल कॉँग्रेसचे संख्याबळ आता १० (पान २ वर)

# संतनगरीत 1 लाख भाविकांची गर्दी

## दर्शनवारीत लागल्या लांबच लांब रांगा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर तीन वर्षानंतर येणा-या अधिक मासाचे हिंदू संस्कृतीत अनन्य साधारण महत्त्व आहे. अधिक मासात तीर्थाटन अधिक पुण्याचे मानले जाते. पुरु षोत्तम मास यां नावानेही ओळखल्या जाणा-या यां महिन्याची सांगता येत्या १५ जुनला येणा-या अमावस्याला होत आहे. यामुळे विदर्भासह राज्यातील तीर्थक्षेत्रे भाविकांनी नुसती फुलून गेली आहे.

### अधिक मासासह एकादशीचा दुहेरी योग

विदर्भ पंढरीत हजारो भाविकांची मांदियाळी-या श्रद्धेला आणि तीर्थाटनाला विदर्भ पंढरी शेगाव नगरी देखील अपवाद नाही! या पवित्र मासानिमित्त संतनगरी शेगाव भाविकांनी नुसती फुलून गेल्याचे चित्र आहे. आज गुरुवारी तर शेगावात भाविकांची अधिकच मांदियाळी जमल्याचे पाहावयास मिळाले. आज संत गजानन महाराजांचा वार म्हणजे गुरुवार आणि कमला एकादशी असा दुहेरी योग जुळून आला. यामुळे संतनगरीत कमीअधिक एक लाख भाविकांचा मेळा जमला! राज्यातील जवळपास एक लाख भाविकांनी श्रींचे समाधीचे दर्शन घेतले. जवळपास ६५ हजार भाविकांनी गजानन महाराज संस्थानाच्या वितरित करण्यात येणा-या महाप्रसादाचा लाभ घेतला. दर्शनबारीत दीर्घ रांगा-विदर्भाची



पंढरी असलेल्या संत नगरी शेगाव येथे अधिक महिन्यात जवळपास दररोज ५० ते ६० हजार भाविक श्रींच्या मंदिरात दर्शनासाठी येत आहे. तर सुट्टीच्या दिवशी शनिवार, रविवार, गुरु वार, एकादशी या दिवशी जवळपास ७० ते ८० हजारांहून अधिक भाविक श्रींचे चरणी नतमस्तक झालेत. आज गुरु वारी पहाटेपासून दर्शन बारीत भाविकांच्या दीर्घ रांगा लागल्याचे दिसून आले. संत गजानन महाराज समाधी स्थळाचे थेट दर्शनासाठी सुमारे ३:३० तास तर श्रीमुख दर्शनासाठी ४५ मिनिटे वेळ लागत होता. श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी दर्शन बारीत शिस्तबद्ध (पान २ वर)

# अनावश्यक हस्तक्षेप केला तर 'थेट कटू निर्णय'

## सुनेत्रा पवार यांनी भर सभेत भरला दम

**मुंबई/प्रतिनिधी :**अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्य २७ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्षाच्या प्रमुख तथा उमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मंत्री, आमदार, खासदार तसेच शेकडो पदाधिका-यांना संबोधित केले. त्यांनी आपल्या पक्षाची दिशा कशी असेल, आगामी राजकारण कसे असेल याची झलक आपल्या भाषणातून दिली. त्यांनी आपला पक्ष दिवंगत नेते अजित पवार यांच्याच विचारांनी चालेल. तसेच पक्षात अनावश्यक हस्तपेक्ष झाल्यास मला कटू निर्णय घ्यावा लागेल, असा थेट दमच भरला. मी पक्षाची बदनामी खपवून घेणार नाही, असेही



### अजित दादांविना पक्षाचा पहिलाच वर्धापन दिन

सुनेत्रा पवार म्हणाल्या. सुनेत्रा पवार यांचा रोक कुणाकडे होता, अशी आता राजकारणात चर्चा रंगली आहे. संघटन मजबूत करण्यासाठी आजपासूनच कामाला लागा. गाव वाडी वस्ती प्रत्येक बुथवर कार्यकर्त्यांची फळी उभी केली पाहिजे. पक्षात ज्येष्ठता सन्मान राहील. नव्या पिढीला संधी दिली जाईल. आपण ज्येष्ठांचा अनुभव आणि युवकांची उर्जा यांचा समन्वय साधणार आहोत. महिलांचा आदर केला जाईल. आपल्याला माहीत आहे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून गेल्या चार महिन्यात मी ही जबाबदारी वेगळ्या परिस्थितीत घेतली.

ही जबाबदारी घेत असताना मला नक्कीच येणा-या सर्व गोष्टींची जाणीव होती. मी पक्षाला सर्वोच्च प्राधान्य देउन, दादांच्या पावलावर पाउल ठेवून काम करत आहे. प्रत्येक कार्यकर्त्याची निष्ठा मला माहीत आहे. योग्यवेळी प्रत्येकाला न्याय आणि संधी मिळेल, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.तसेच, प्रत्येकवेळी मी सर्वांना समजून घेतलं. सावरू न घेतलं. दादांनी त्यांच्या हयातीत सर्वांना खूप समजून घेतलं. सर्वांचे हट्ट पुरवले. प्रेम केलं. मान सन्मान दिला. पदं दिली. जे जे म्हणाल ते त्यांनी त्यांच्या परीने दिलं. या पुढे मी पक्षाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देईन. पण कुणाचा अनावश्यक हस्तक्षेप असेल तर विचार केला जाईल. दादा ज्या प्रमाणे पक्ष हितासाठी कटू निर्णय घेत होते. त्याचप्रमाणे असे निर्णय घेण्यास मला जड जाईल, पण न्याय देण्यासाठी दादांच्या पावलावर जाण्याचा निर्णय घेईल, असा सज्जड दमही सुनेत्रा पवार यांनी भरला.कार्यकर्ते, पदाधिकारी पक्ष हिताच्या निर्णयात माझ्यासोबत असतील आणि साथ देतील. सरकारमधील प्रत्येक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जागरू कपणे काम केलं पाहिजे. पक्षाची होणारी बदनामी माझ्यासह सर्वांची जबाबदारी आहे. मला यात कठोर भूमिका घेण्याची वेळ येणार नाही याची काळजी घ्यावी, असा इशाराही त्यांनी दिला. विविध महामंडळे आणि सदस्यांच्या नियुत्त्या केल्या जातील. पक्ष निष्ठा आणि पक्षासाठी समर्पण याचा विचार केला जाईल. ज्यांनी महामंडळासाठी अर्ज केला असेल त्याचा विचार केला जाईल. काळजी करू नका. गुणवत्ता आणि पात्रता असणा-यांनाच संधी दिली जाईल. किती वर्ष काम केलं, या पेक्षा पक्षाला किती पुढे नेले याचा विचार केला जाईल. कधी कधी पक्ष विस्तारासाठी बाहेरच्या नेत्यांना पक्षात घेतल्यावर त्यांचा सन्मान करण्यासाठी काही तडजोडी कराव्या लागतात. पण तसं करताना निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सन्मान राखला जाईल, असे आश्वासनही त्यांनी पदाधिका-यांना दिले.

# मध्यप्रदेशात भाजपने तिन्ही राज्यसभा जागा बिनविरोध जिंकल्या

## ● नटराजन यांच्या रद्द नामनिर्देशनावर निवडणूक आयोगाचे मौन ● सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

**भोपाळ/दिल्ली/वृत्तसंस्था :**मध्य प्रदेशातील तिन्ही राज्यसभा जागांवर भाजप उमेदवारांना निवडणूक प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. अशा प्रकारे रजनीश अग्रवाल, तरु ण चुग आणि महेश केवट राज्यसभेसाठी बिनविरोध निवडून आले आहेत.यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशातून राज्यसभा जागेसाठी मीनाक्षी नटराजन यांचे नामांकन रद्द झाल्याच्या विरोधात कॉँग्रेसच्या याचिकेवरील सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली होती. दुसरीकडे, या प्रकरणावर निवडणूक आयोगानेही कोणताही निर्णय दिला नाही.यापूर्वी गुरु वारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान कॉँग्रेसचे वकील अभिषेक मनु सिंघवी म्हणाले - या प्रकरणावर आजच सुनावणी होणे आवश्यक आहे, कारण उमेदवारी



अर्ज मागे घेण्यासाठी दुपारी ३ वाजेपर्यंतच वेळ आहे.यावर निवडणूक आयोगाने म्हटले - आम्हाला या याचिकेची प्रतच दिली नाही. ती वाचण्यासाठी वेळ हवा आहे. यावर सिंघवी म्हणाले - सुनावणी उद्या झाली तरी चालेल, पण तोपर्यंत निकाल घोषित करू नये. यानंतर न्यायालयाने म्हटले - अशा प्रकरणांमध्ये कायदा आधीच निश्चित आहे. याचिका उद्यासाठी सूचीबद्ध केली जाते.

कॉँग्रेसने ही याचिका बुधवार-गुरु वारच्या मध्यरात्री १ वाजून ४८ मिनिटांनी डिजिटल माध्यमातून दाखल केली होती. यात आरोप करण्यात आला आहे की, रिटर्निंग ऑफिसरने बेकायदेशीर, मनमानी आणि पक्षपाती पद्धतीने निर्णय घेतला आहे, तो रद्द करण्यात यावा. या प्रकरणावर कॉँग्रेस मुख्यालयात वरिष्ठ नेत्यांची बैठक सुरू आहे. मध्य प्रदेशचे आमदार आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेटही घेणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पुढे ढकलल्याने विरोधी पक्षनेते उमंग सिंघार म्हणाले- कॉँग्रेसला आज सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. निवडणूक आयुत्तांनी ठरवले असते तर कालच याबद्दल निर्णय देउ शकले असते. अर्ज फेटाळणे किंवा स्वीकारणे, हा विशेष अधिकार निवडणूक आयोगाला आहे. हरियाणात निवडणूक आयोगाने हस्तक्षेप केला होता, गुजरातमध्ये हस्तक्षेप केला होता, मग मध्य प्रदेशात का नाही केला? सिंघार यांनी (पान २ वर)

# प्रसिद्ध खाद्य दुकानांवर मुंढेंचा दणका!

**मुंबई :**अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून २५ मे रोजी कार्यभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी राज्यभर धाडी आणि तपासणी मोहिमेचा धडाका लावला आहे. या कारवाईसोबतच त्यांनी अनेक मोठे निर्णय देखील घेतले आहेत. आता मुंबईच्या उपनगरातील प्रसिद्ध खाद्य दुकानावर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली. मुलुंडमधील प्रसिद्ध चाट विक्री केंद्र गुप्ता चणा भंडारवर एफडीएने धाड टाकत दुकान सील केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री मुलुंड पश्चिमेतील डम्पिंग रोड, गौतम नगर परिसरात असलेल्या गुप्ता चणा भंडार येथे एफडीएच्या पथकाने छापेमारी केली. तपासणीदरम्यान दुकानात गंभीर स्वरू पाच्या नियमभंगाच्या घटना आढळून आल्या. त्यामुळे संबंधित आस्थापनाविरोधात तातडीची कारवाई करत स्टडूप बिझनेस नोटीस बजावण्यात आली असून दुकानाचा व्यवसाय तात्पुरता बंद करण्यात आला आहे. एफडीएच्या अधिका-यांना तपासणीदरम्यान अत्यंत अस्वच्छ आणि आरोग्यास अपायकारक परिस्थिती आढळली. तसेच विक्रीसाठी ठेवलेल्या अन्नपदार्थांच्या पाकिटांवर उत्पादकाचे नाव, उत्पादन दिनांक आणि मुदत संपण्याची तारीख नमूद नसल्याचे निदर्शनास आले. यानंतर कारवाई करत एकूण ११४.२ किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला. जप्त मालामध्ये ६८ किलो भाजलेला चणा, १९.५ किलो बारीक शेव, १८ किलो मुरमुरे, ५.२ किलो पाणीपुरीच्या पु-या आणि ३ किलो शेवपुरीच्या पु-यांचा समावेश आहे. या मालाची अंदाजे किंमत ८,२९० रु पये असल्याचे एफडीएने सांगितले.

# ऊपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचे विमान बिघडले

**मुंबई/प्रतिनिधी :**राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या अध्यक्षा आणि राज्याच्या उमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या बुधवारी दिल्लीत होत्या. दिल्लीला निघण्यापूर्वी त्यांच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला होता. त्यामुळे सुनेत्रा



पवारांना मुंबई विमानतळावर प्रतिक्षा करावी लागली. सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहण्याची नोंद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावे झाली. त्यानिमित्ताने दिल्लीत त्यांच्या सत्कार आणि एनडीएच्या घटक पक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उमुख्यमंत्री सुनेत्रा पवारही उपस्थित होत्या. पण, त्यापूर्वी त्यांना मुंबई विमानतळावर ताटकळत बसावे लागले. सुनेत्रा पवार यांनी दिल्ली दौ-यासाठी सीएमआर या कंपनीच्या चार्टर विमानाने प्रवास केला. दिल्लीला रवाना होण्यापूर्वी या कंपनीच्या विमानात बिघाड झाला होता, अशी माहिती समोर आली. विमानात बिघाड झाल्यानंतर ते दुरु स्त करण्यात आले. त्यानंतर सुनेत्रा पवार या दिल्लीला रवाना झाल्या.

# विमान दुर्घटनेचा अंतिम अहवाल पुन्हा लांबणीवर

**अहमदाबाद/वृत्तसंस्था -** अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या बोईंग ७८७ विमान दुर्घटनेला १२ जून रोजी एक वर्ष पूर्ण होत असताना या भीषण दुर्घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दुर्घटनेत २६० जणांचा मृत्यू झाला होता. मात्र आंतरराष्ट्रीय नियमांनुसार एका वर्षात अंतिम अहवाल सादर करणे अपेक्षित असतानाही इंडियाज एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टीगेशन ब्यूरो(एएआयबी)तो मुदतीत सादर करता येणार नसल्याचे समोर आले आहे. तपास यंत्रणेकडून या आठवड्यात अंतिम अहवालाऐवजी प्रगती अहवाल सादर केला जाण्याची शक्यता आहे. तपासातील प्रलंबित बाबी आणि



विलंबाची कारणे या अहवालात नमूद केली जाणार आहेत. अंतिम अहवाल पुढील तीन महिन्यांत प्रसिद्ध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या दुर्घटनेच्या तपासासाठी अअकइ, अमेरिकेची राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळ, बोईंग आणि जीई एरोस्पेस यांच्यात समन्वय सुरू आहे. विमानाच्या इंजिनांची आणि संबंधित प्रणालींची सखोल तपासणी अमेरिकेत केली जात असून त्यासाठी आवश्यक असलेली विशेष यंत्रसामग्री तेथे उपलब्ध असल्याने इंजिनांचे विश्लेषण सुरू आहे. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या प्राथमिक अहवालानुसार, विमानाने उड्डाण घेतल्यानंतर काही क्षणांतच दोन्ही इंजिनांच्या इंधन नियंत्रण स्विचची स्थिती रन वरू न कटऑफवर गेली होती. त्यामुळे दोन्ही इंजिनांना इंधनपुरवठा बंद झाला आणि इंजिन बंद पडले. काकपीटमधील वैमानिकांमधील अल्प संवादातून हे स्विच नेमके कसे हलवले गेले याबाबत संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून आले. त्यामुळे ही मानवी चूक होती की तांत्रिक बिघाड, याबाबत तपास यंत्रणा अद्याप निश्चित निष्कर्षापर्यंत पोहोचलेली नाही. तपासकर्ते विमानातील राम एअर टर्बाइन या आपत्कालीन यंत्रणेच्या कार्यान्वित होण्याच्या वेळेचाही अभ्यास करत आहेत. विमानातील वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ही यंत्रणा सुरू होते.

# रेडी रेकनर दरांमध्ये मोठा बदल

## गरीब आणि मध्यमवर्गीयांना दिलासा-महसूल मंत्री बावनकुळे

**नागपूर/प्रतिनिधी -**राज्य शासनाने रेडी रेकनर दर निर्धारणात ऐतिहासिक बदल करण्याचा निर्णय घेतला असून यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध राजकीय आणि प्रशासकीय विषयांवर भूमिका स्पष्ट केली.रेडी रेकनर दराबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की,



आतापर्यंत मोठ्या व्यावसायिक इमारती आणि छोट्या घरांना अनेक ठिकाणी समान दर लागू होत होते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत होता. आता राज्य शासनाने 'मायक्रो झोन' संकल्पना स्वीकारली असून परिसर, बांधकामाचा प्रकार आणि मालमत्तेच्या स्वरूपानुसार स्वतंत्र रेडी रेकनर दर निश्चित केले जाणार आहेत. यामुळे मोठ्या इमारतींना वेगळा तर सर्वसामान्यांच्या घरांना स्वतंत्र दर लागू होईल आणि घर खरेदी-विक्रीवरील शुल्काचा भार कमी होईल, असे त्यांनी सांगितले.

**अमरावती विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे पारडे जड-**अमरावती विधान परिषद निवडणुकीत दबाव टाकल्याच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी हे आरोप फेटाळून लावले. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असून कोणावर दबाव टाकण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी सांगितले. विरोधकांचा पराभव निश्चित असल्याने अशा प्रकारची विधाने केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. (पान २ वर)

# कर्जमाफीच्या जीआरची होळी, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा एल्गार!

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतक-यांची दिशाभूल करणारी असून त्यामध्ये लादलेल्या जाचक अटींमुळे बहुसंख्य शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केला. या फसव्या कर्जमाफीच्या निषेधार्थ



आज, गुरु वारी बुलढाणा जिल्ह्याच्या जळगाव जामोद येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्यावतीने रविकांत तुपकर व अक्षय पाटील यांच्या नेतृत्वात कर्जमाफीच्या जी.आर.ची होळी करण्यात आली. त्यानंतर शेतक-यांसह तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.शेतक-यांना कोणत्याही अटी-शर्तीशिवाय सरसकट कर्जमाफी, प्रलंबित पीकविमा, सर्व पिकांना उत्पादन खर्चावर आधारित भाव, यां मागण्यांसाठी लवकरच राज्यात आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी सरकारला देण्यात आला.

कर्जमाफीच्या शासन निर्णयाची होळी केल्यावर जळगाव जामोद तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी रविकांत तुपकर यांनी तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी व पीकविमा कंपनीचे अधिकारी यांना चांगलेच धारेवर धरले. पीकविमा न मिळालेल्या शेतक-यांच्या तक्रारी घेउन सुनावण्या घ्या आणि अहवाल शासनाला पाठवून कंपनीला नुकसाग्रस्त शेतक-यांना विमा द्यायला लावा. अन्यथा एक्केकालेला कपडे काढून ठोकेन, असा रोखठोक इशारा दिला. यावेळी तुपकरांच्या आक्रमक भूमिकेमुळे तहसील परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऐतिहासिक विक्रमाबद्दल

## भाजपा युवा मोर्चातर्फे जैन मंदिरात महाआरती व प्रार्थना

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने विश्वास, विकास आणि जनकल्याणाला समर्पित आपली यशस्वी १२ वर्षे पूर्ण केली आहेत. तसेच, आत्तापर्यंतच्या सर्व लोकनियुक्त पंतप्रधानानमध्ये सर्वाधिक काळ (४३९९ दिवस) पंतप्रधानपदी विराजमान राहून त्यांनी एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. या सुवर्ण क्षणाचे औचित्य साधून भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने स्थानिक श्री आदिनाथ दिगंबर जैन परवार पंचायती मंदिर दहिसाथ चौक, अमरावती येथे भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी तसेच मेलघाट भाजपा महिला मोर्चा प्रभारी आरती वानखडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष डॉ.नितीन धांडे व युवा मोर्चा शहर जिल्हा अध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा यांच्या



मार्गदर्शनात हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

याप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, 'पंतप्रधान मोदींचा हा कार्यकाळ भारताचा विकास, सुरक्षा, आर्थिक सक्षमीकरण आणि जागतिक प्रतिष्ठेतील अभूतपूर्व वाढीचा साक्षीदार राहिला आहे. सरकारची ही १२ वर्षे जिथे सेवा, सुशासन आणि लोक-आकांक्षांच्या पूर्तीची राहिली आहेत, तिथेच पुढची २१ वर्षे विकसित भारताचे ध्येय साध्य करण्याचा प्रवास असेल.'

यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि देशाच्या निरंतर प्रगतीसाठी भगवंताच्या चरणी मनोभावे प्रार्थना केली. महाआरती संपन्न झाल्यानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या सोहळ्याला जैन परवार पंचायती मंदिराचे अध्यक्ष मुकेश जैन, सचिव शैलेंद्र जैन, कोषाध्यक्ष विनोद कुमार जैन, स्वप्निल जैन, कल्लू जैन, रितेश जैन, आकाश जैन, अर्पित जैन, संजय जैन आणि सुदीप जैन प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच स्वीकृत नगरसेवक प्रा.संजय तीरथकर, शहर सुधार सभापती राधा कुरील, भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष सुधा तिवारी, प्रा. रविकांत कोल्हे, सुधीर बोपुलकर, शैलेंद्र मिश्रा, दीपक डाबी, राजू मेटे, चंद्रशेखर कुळकर्णी, राकेश श्रॉफ यांच्यासह भाजयुमो महामंत्री कीर्तिदीप सराफ, साहिल शर्मा, अक्षय भोगल, निलेश शर्मा, श्रवण मेहरे, श्रीकांत बिजवे, राम गुप्ता व उमंग मोंगा, निलेश डागा, हर्ष शर्मा उपस्थित होते. महिला मोर्चा ची तृप्ती वाठ, कल्याणी मुदलिया, मंजुषा खांडेकर, प्रीती कराळे, माधुरी, मीना पवार, उज्वला काळपांडे, जया माहोरे, शीतल वाघमारे, अंजली पाठक, भावना कुदळे, रुची ककरानिया, अलका सप्रे, प्रेमा बीरेली, मीना चव्हाण, सुरेखा त्यागी, शुभांगी भोंगाडे आणि प्रीती ठाकूर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने विकास, सुशासन आणि जागतिक स्तरावर मिळविलेल्या यशाबद्दल गौरव व्यक्त केला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा यांनी जैन मंदिर ट्रस्टचे सर्व विश्वस्त व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या प्रार्थना व महाआरती कार्यक्रमासाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्व ट्रस्टींचे विशेष धन्यवाद मानले.

### जि.प. मराठी शाळेच्या विद्यार्थ्याची यशाला गवसणी

# शिवणी रसुलापूरचा अजिंक्य झाला पोलीस उपनिरिक्षक

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** तालुक्यातील शिवणी रसुलापूर येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा अजिंक्य सुनंदा ओंकार ढोके यांची मुंबई पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदी निवड झाल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र पोलीस अकादमीत वर्षभराचे कठोर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या ५८३ प्रशिक्षणार्थींमध्ये ४५ वी रँक प्राप्त करत अजिंक्य ढोके यांनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीही अजिंक्य यांची नांदगाव खंडेश्वर येथे आरोग्य सेवक म्हणून निवड झाली होती. त्यानंतर त्यांची नागपूर येथे तलाठी पदावरही निवड झाली होती. मात्र, पोलीस अधिकारी बनण्याचे स्वप्न उराशी बाळगत त्यांनी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले आणि अखेर मुंबई पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली.

अजिंक्य ढोके यांनी आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद मराठी शाळा, शिवणी येथे पूर्ण केले. अत्यंत सामान्य आर्थिक परिस्थितीत वाढलेल्या अजिंक्य यांनी अनेक अडचणींवर मात



करत शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली. विशेष म्हणजे कोणत्याही क्लोचिंग क्लासला न जाता कर्तव्यनिष्ठा, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर त्यांनी हे यश मिळवून आपल्या कुटुंबासह संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

अजिंक्य यांच्या यशाची बातमी समजताच शिवणी गावात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. प्रशिक्षण पूर्ण करून गावात आगमन झाल्यानंतर गावकऱ्यांनी त्यांची भव्य रॅली काढून उत्स्फूर्त स्वागत केले. गावातील विविध ठिकाणी त्यांचा तसेच त्यांच्या आई-वडिलांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अजिंक्य यांच्या यशाचे कौतुक करत त्यांचा संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवास हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आदर्श असल्याचे सांगितले.

अजिंक्य ढोके यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि स्वतःच्या अथक परिश्रमाला दिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतेही ध्येय अशक्य नसते, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

अजिंक्य यांच्या या उल्लेखनीय यशामुळे शिवणी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे.

## विधानपरिषद आचारसंहिता

मनपाचे अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्यावर आचारसंहिता भंगाचे गुन्हा दाखल करण्याचे लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

अमरावती मनपा मार्फत जन्म मृत्यू दाखल्यांचा घोळ मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. याबाबत किरीट सोमैया हे वारंवार अमरावती येथे येऊन यायाबाबत आक्षेप दाखल करतात. तसेच कोणत्याही संविधानिक पदावर नसताना शासकीय अधिकारी कर्मचारी समवेत बैठकी आयोजीत करतात. किरीट सोमैया यांच्या दिनांक ०८/०५/२०२६ च्या आयुक्त मनपा यांना दिलेल्या पत्रांवये जन्म सुधारणा जन्म प्रमानपत्र घोटाळा बाबत कळविले होते तसेच सदर पत्रात दिनांक ११ जून रोजी या संदर्भात अधिक चर्चा करण्यासाठी मनपा अमरावती येथे येणार असल्याचे कळविले होते. त्या अनुषंगाने किरीट सोमैया , आयुक्त मनपा अमरावती , वैद्यकीय अधिकारी मनपा अमरावती , अतिरिक्त आयुक्त मनपा अमरावती , अधीक्षक जन्म मृत्यू नोंदणी विभाग , अमरावती महापौर , उपमहापौर सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आदि अधिकारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

निवडणूक काळात आचारसंहिता असल्याने शासकीय बैठक , भूमिपूजन , शासकीय कार्यक्रम घेण्यास बंदी असल्यानंतर देखील या प्रकारची बैठक आयुक्त मनपा या जबाबदार अधिका-यामार्फत मनपाच्या सभागृहात घेणे ही नियमबाह्य बाब आहे. या बैठकीत उपस्थित सर्व अधिकारी पदाधिकारी तसेच किरीट सोमैया यांच्यावर आचारसंहिता भंग केल्याच्या गुन्हा दाखल करण्याची मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी राज्य निवडणूक आयुक्त , महाराष्ट्र राज्य , जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी , अमरावती यांना लेखी पत्राद्वारे केली.

## १ व १० वरिल उर्वरित

### राज्यात ऊन्हाचा तडाखा

तापमानात काहीशी वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत असून पुढील तीन दिवसांत ऊन्हाची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे.

**मोमसी पावसाची देशात आगेकूच-**मोसमी पावसाने गुरु वारी कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या आणखी काही भागांसह तमिळनाडूच्या उर्वरित भागांमध्ये, तसेच पश्चिम बंगालच्या आणखी काही भागात आणि बिहारच्या काही भागात वाटचाल केली, अशी माहिती हवामान विभागाने दिली.

### राज्यात मान्सून

आणि सांगली जिल्हे पार करत रत्नागिरी, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांपर्यंत व्यापला होता. मात्र त्यानंतर त्याच्या प्रगतीचा वेग मंदावला आहे. सध्या मान्सूनची सीमा रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे, सोलापूर तसेच कर्नाटकातील कलबुर्गी, आंध्र प्रदेशातील नंद्याल, तामिळनाडूतील चेन्नई आणि पश्चिम बंगालमधील सिलिगुडी परिसरापर्यंत पोचली आहे.कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सूनपूर्व सरी आणि हलका पाउस सुरू असला तरी राज्यातील अनेक भाग अद्यापही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

### विधानसभा, लोकसभेनंतर

खासदारांवर आले आहे. संसदेच्या वरिष्ठ सभागृहात पक्षाची ताकद कमी होणे हा ममता बॅनर्जी यांच्यासाठी एक मोठा राजकीय फटका मानला जात आहे. तसेच येत्या एका आठवड्यात पक्षाचे आणखी तीन राज्यसभा खासदार राजीनामा देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### संतनगरीत १ लाख भाविकांची

पद्धतीने रांगेत लागून मनोभावे दर्शन घेतले. श्रींच्या समाधी मूर्तीचे दर्शन घेउन भाविकांनी श्री राम मंदिरात श्रीराम लक्ष्मण माता सीता व हनुमंताचे दर्शन घेतले. त्याचप्रमाणे श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण अनेक भाविक भक्तांनी केले.

संस्थांनाची सुसज्ज सेवा-जवळपास ६५ हजार भाविकांनी महाप्रसादाचा सुद्धा लाभ घेतला. भाविकांना श्रींचे दर्शन घेण्यास असुविधा होउ नये व त्यांना योग्य प्रकारे श्रींचे दर्शन घेता यावे याकरिता मंदिर परिसरात ठिकठिकाणी शेकडो सेवाधारी तैनात करण्यात आले. भाविक भक्तांनी वाहनांसाठी संस्थानच्या निःशुल्क वाहन पार्किंगचा लाभ घेतला . समाधी दर्शन घेउन बाहेर येणा-या भाविकांना खोब-याची बर्फी प्रसाद म्हणून देण्यात आली.

रेल्वे, लालपरीसह व्यवसायिकांचे चांगभले-शेगाव येथे आलेल्या हजारो भाविकांमुळे राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे, खाजगी वाहने यांना सुद्धा मोठा आर्थिक फायदा झाला.लहान व्यवसायिकांनी अधिक महिना पावल्याची भावना व्यक्त केली. हार फुल,चहा विक्रेते व नाश्ता, हाटेल, भोजनालय तसेच विविध खेळणे आणि वस्तू विक्रेते लहान व्यवसायिकाकडे खरेदीदार यांनी एकच गर्दी केल्याचे दिसत होते.

### मध्यप्रदेशात भाजपने तिन्ही

भोपाळमध्ये माध्यमांशी बोलताना सांगितले- झारखंडमध्ये भाजप उमेदवाराला तुम्ही (निवडणूक आयोग) वैध ठरवू शकता, तर मीनाक्षी नटराजन यांच्या प्रकरणात निर्णय का घेतला नाही? यावरून स्पष्ट होते की, निवडणूक आयोग भाजपच्या रबर स्टॅम्पप्रमाणे काम करत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर निवडणूक आयोगाने कोणताही विचार केला नाही. त्यांच्या रिटर्निंग ऑफिसरने स्पष्टपणे नियमांची पायमल्ली केली.सर्वोच्च न्यायालयाने उद्याची वेळ दिली आहे.

### रेडी रेकनर दरांमध्ये

अमरावतीसह इतर भागांतील राजकीय परिस्थितीचा उल्लेख करत महायुतीच्या विजयाचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**अतुल लोंढेंच्या बैठकीवर टीका-**काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांच्या बैठकीबाबत विचारले असता, निवडणुकीचा निकाल जवळपास स्पष्ट असताना अशा बैठका घेऊन काहीही साध्य होणार नसल्याचे बावनकुळे म्हणाले. भाजप आणि महायुतीकडे सुमारे ६०० मतांचे पाठबळ असून विरोधकांकडे केवळ सुमारे २०० ते २२५ मतांचे संख्याबळ असल्याचा दावा त्यांनी केला. विरोधी आघाडीतच मतभेद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**भाजप घाबरल्याच्या आरोपांना उत्तर-**भाजप घाबरल्याच्या आरोपांवर बोलताना बावनकुळे म्हणाले की, भाजपच्या मतदारांची काळजी विरोधकांनी करण्याची गरज नाही. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी एकत्र येण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सहलींमुळे संघटनात्मक समन्वय अधिक मजबूत होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

**धान घोटाळ्याबाबत चौकशीस तयार-**धान घोटाळ्याबाबत काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, पटोले यांनी संबंधित कागदपत्रांची प्रत द्यावी. ती प्रत मुख्यमंत्रीला पाठवून विषय मंत्रिमंडळात मांडण्याची तयारी शासनाची असल्याचे त्यांनी सांगितले.

**पीओपी मूर्तींबाबत पर्यावरणपूरक भूमिका-**पीओपी मूर्तींबाबत विचारलेल्या प्रश्नावर बावनकुळे यांनी प्रदूषणमुक्त पर्यायांचा अवलंब करण्यावर शासन भर देणार असल्याचे सांगितले. पर्यावरणाला हानी होणार नाही अशा पद्धतीने मूर्ती निर्मिती व्हावी यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**मोदींच्या नेतृत्वावर विश्वास-**पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाविषयी बोलताना बावनकुळे म्हणाले की, विकसित भारताचा संकल्प देशाने स्वीकारला आहे. भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने नरेंद्र मोदीजी यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरणार असून भविष्यात त्यांच्या नावावर अनेक विक्रम नोंदवले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### काटेपूर्णा नदी पात्रात बुडाल्याने

उपस्थित युवकांनी घटनास्थळी धाव घेत पाण्यात उडी मारली आणि मोठ्या प्रयत्नांनंतर माधुरी खोत, मीरा चौधरी यांना सुखरूप बाहेर काढलं.यानंतर वृषाली खोत आणि स्वराज खोत यांचा शोध सुरू करण्यात आला. काही वेळानंतर दोघांचेही मृतदेह पाण्यात आढळून आले. या दुर्घटनेत बचावलेल्या महिलांना पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे रवाना करण्यात आलं. अधिक मासाच्या धार्मिक स्नानासाठी गेलेल्या कुटुंबावर काळाने घाला घातल्याने समशेरपूर गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेनंतर पोलिसांनी आकस्मित घटनेच्या अनुषंगानं गुन्हा दाखल केला आहे

### २३ सहाय्यक पोलीस निरीक्षकांची

आली आहे. यामध्ये श्रीकांत कडू यांची एसपी यांचे वाचक अधिकारी म्हणून,संजय आत्राम यांची पो.स्टे. तिवसा येथे, तर निलेश गोपाल चावडीकर यांची पो.स्टे. वरुड येथे बदली झाली आहे. याशिवाय अनंत वडतकर यांची पो.स्टे. परतवाडा येथे तर दादाराव कोपनर यांची पो.स्टे. दर्यापूर येथे नियुक्ती करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातून बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये रविंद्र ताले यांची अप्पर पोलीस अधीक्षक यांचे वाचक अधिकारी म्हणून, गणपत काळूसे यांची पो.स्टे. चांदुर रेल्वे येथे, तर प्रेमकुमार केदार आणि संजीव खंदारे या दोघांचीही पो.स्टे. चांदुर बाजार येथे बदली झाली आहे. तसेच दुर्गेश राजपूत यांची पो.स्टे. मोर्शी येथे शिवचरण डोंगरे यांची पो.स्टे. धारणी येथे, युवराज राठोड यांची पो.स्टे. दर्यापूर येथे, मनिषा सामटकर यांची पो.स्टे. चांदुर रेल्वे येथे, मनिष दुबे यांची पो.स्टे. मोर्शी येथे आणि सपोनि संतोष गुर्जर यांची स्थानिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या नवीन नेमणुकीच्या ठिकाणी तात्काळ हजर होण्याचे आदेश दिले आहेत.

### महानगरपालिकेत किरिट सोमय्या

बाळासाहेब ठाकरे गटाच्या नगरसेवकांनी जोरदार विरोध केला आणि घोषणाबाजी केली. त्यामुळे महापालिका परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यातच एमआयएमच्या काही नगरसेवकांनी किरिट सोमय्या यांच्या वाहना समोर आडवे होत त्यांची वाट अडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी या नगरसेवकांना लगेच ताब्यात घेतले. महापालिकेच्या परिसरात किरीट सोमय्या यांच्या वाहनांचा ताफा येताच एमआयएमचे नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनी 'किरीट सोमय्या वापस जाओ' अशा घोषणा देण्यास सुरूवात केली. यावेळी भाजपचे आणि एमआयएमचे कार्यकर्ते आमने-सामने आले. पण, यावेळी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना पांगवले. एमआयएमचे नगरसेवक विरोधाच्या घोषणा देत किरीट सोमय्या यांच्या वाहनापर्यंत पोहचले. ते चक्क वाहनासमोर रस्त्यावरच झोपले. त्यांना हटविण्यासाठी पोलिसांना बरेच परिश्रम घ्यावे लागले.सोमय्या हे महापालिकेत बैठकीसाठी येणार असल्याने पोलिसांनी आधीच चोख बंदोबस्त ठेवला होता. एमआयएमच्या आंदोलनानंतर या परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. किरीट सोमय्या हे कोणत्याही संवैधानिक पदावर नाहीत, त्यामुळे त्यांना महापालिकेत बैठक घेण्याचा कोणताही अधिकार नाही, असा आरोप एमआयएमच्या नगरसेवकांनी केला आहे. दरम्यान, पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या एमआयएमच्या नगरसेवकांना ताब्यात घेतले आहे.

**पोलिसांनी नगरसेवकांना फरफटत नेले-** एमआयएमचे गटनेते अब्दुल हमीद आणि नगरसेवक मुनज्जर अली हे कमालीचे आक्रमक झाले होते. सोमय्या यांची गाडी रोखण्यासाठी या दोन्ही नेत्यांनी थेट त्यांच्या वाहनासमोर उड्या टाकल्या आणि रस्त्यावर लोटांगण घातले. यामुळे महापालिकेत प्रचंड तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत अब्दुल हमीद आणि मुनज्जर अली यांना रस्त्यावरून फरफटत बाजूला नेले. यावेळी पोलिस उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ हे उपस्थित होते.

**पाच नगरसेवकांसह २५ जण ताब्यात -**या अचानक झालेल्या गदारोळानंतर महापालिका परिसरात तैनात असलेल्या सिटी कोतवाली पोलिसांनी तातडीने धाव घेतली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलिसांनी पाच नगरसेवकांसह अंदाजे २० ते २५ कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम ६८ अन्वये नोंद करून सुटका करण्यात आली. पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात सोमय्या यांची आयुक्तांच्या दालनात बैठक पार पाडली.

**काँग्रेसनेही केला विरोध-**किरीट सोमय्या हे वारंवार अमरावतीत येऊन महापालिकेत बैठका घेतात, यावर काँग्रेसनही आक्षेप घेतला होता. किरीट सोमय्या हे वारंवार जिल्ह्यात येऊन येथील पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेला वेठीस धरत आहेत. त्यांच्यावर दबाव आणत आहेत. काही प्रकरणांमध्ये खोट्या दाखल्यांच्या आधारे जन्म प्रमाणपत्र मिळवल्याचे पुढे आले आहे. त्यात यंत्रणेमार्फत पोलीस तक्रारही झाली आहे. परंतु त्या प्रकरणांतही कुणी बांगलादेशी किवा रोहिंग्याशी संबंधित असल्याचे पुढे आले नाही. त्यामुळे सोमय्या जाणीवपूर्वक अमरावती जिल्ह्याची बदनामी करीत असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

### मित्राला सोडण्यासाठी गेलेल्या

३०) याला सोडण्यासाठी नालसाबपुरा परिसरात आला होता. त्याला सोडून समीर घरी जात असता उर्दू शाळा जवळ आरोपी अब्दुल ईक्का ने त्याला थांबून शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. त्याच्यासोबत त्याचे इतर दोन साथीदारही होते. आरोपी यांनी त्याच्यावर चाकुने हल्ला करून मारहाण केली. माहिती मिळताच नमीरचा मित्र समीर घटनास्थळी पोहोचला त्याने नमिरला आधी एका खाजगी रुग्णालयात नेले तेथून प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी त्यांना नागपूर रेफर करण्यास सांगीतले. नातेवाईकांनी त्याला पीडीएमसी मध्ये दाखल केले आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपी विरुद्ध कलम ११८(२),११५(२),३५२,३(५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### दिलीप एडतकर यांच्या

ज्येष्ठ नेते सुनील देशमुख यांना ई-मेलद्वारे राजीनामा पाठविला होता. आपल्या राजीनामा पत्रात त्यांनी प्रदेश सरचिटणीसपदाची जबाबदारी आपण न मागता देण्यात आली होती, ती आपण प्रामाणिकपणे पार पाडली असल्याचे नमूद करत यापुढे नाममात्र पदाला चिकटून राहणे शक्य नसल्याचे म्हटले होते.

दरम्यान, गुरुवारी काँग्रेसच्या विविध पदाधिकाऱ्यांनी ॲड. दिलीप एडतकर यांच्या निवासस्थानी बैठक घेत त्यांना सरचिटणीस पदाचा राजीनामा मागे घेण्याची विनंती केली.या बैठकीस माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर, माजी आयएमए अध्यक्ष डॉ. बी. आर. देशमुख, माजी महापौर वंदना कंगाले, अशोक डोंगरे, युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, डॉ. मतीन अहमद, प्रा. सिरीन, अनिला काजी, जिल्हा काँग्रेस औद्योगिक विभागाचे अध्यक्ष समीर जवंजाळ, विजय बर्वे तसेच अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. सुनील देशमुख यांनी ॲड. एडतकर यांच्या स्वाभिमानी व स्पष्टवक्ता स्वभावाचा उल्लेख करत पक्षातील त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान राखला गेला पाहिजे, असे मत व्यक्त केले व प्रदेश काँग्रेस तर्फे राजीनामा नामंजूर करणारे पत्र दिलीप एडतकर यांना सोपविले.

काँग्रेस नेते किशोर बोरकर यांनीही ॲड. एडतकर यांच्या कार्याचा गौरव करताना ते शाहू-फुले-आंबेडकर विचारांचे प्रखर पुरस्कर्ते असल्याचे नमूद केले. पक्षात काही नाराजी असू शकते, मात्र काँग्रेस पक्षासाठी कायमरीत्या राजकीय परिस्थितीत त्यांच्यासारख्या नेतृत्वाची काँग्रेसला गरज असल्याचे ते म्हणाले.

ॲड. दिलीप एडतकर यांनी प्रदेश काँग्रेसच्या निर्णयाचा आदर करत आभार मानले आणि पूर्वी प्रमाणे कार्य करत राहू असा निर्वाळा दिला.

### अखेर काजल इंगळे हत्याकांडाचा

माहिती त्याने पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोचून पंचनामा केला. यावेळी काजलची ओळख पटवण्याचे आव्हान पोलिसांच्या समोर होते पण पोलिसांनी या आव्हानाला पार केले आणि डीएनए टेस्ट च्या आधारावर मृतक तरूणीची ओळख विश्राळी येथील काजल जितेंद्र इंगळे अशी झाली. यानंतर तिच्या मारेकरी पर्यंत पोहोचण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. शेवटी गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी सकाळी काजलचा मावस भाऊ चेतन सुनील थोरात याला ताब्यात घेतले. सायंकाळपर्यंत त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. त्याने हत्या का केली हे अजून पर्यंत समोर आले नाही.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ ,सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे प्रभारी निरीक्षक दिनेश दहातोंडे ,अतुल वर यांच्या नेतृत्वात सहाय्यक निरीक्षक मनीष वाकोडे, महेश इंगोले, दशरथ आडे, गजानन सोनुने, अंमलदार सुनील लासुरकर, फिरोज खान ,सतीश देशमुख, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश लोखंडे, मंगेश परिमल, आस्तीक देशमुख, संभाजी केंद्रे, जहीर शेख, सचिन बहाळे, मिर्झा, नईम बेग, नाझीमुद्दीन सय्यद, अतुल संभे,विकास गुडधे, विशाल वाक्पांजर ,सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखिल गेडाम, योगेश पवार, चेतन गुल्हाने, चेतन शर्मा, राहुल दुधे ,संदीप खंडारे ,शंतनु बारोटकर यांनी केली.

### ५.१५ किलो गांजासह आरोपी

गांजा किंमत ९९ हजार ४२० रुपये जप्त केला. आरोपी विरुद्ध धारणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर अधीक्षक दत्ता तोटेवार, उपविभागीय अधिकारी माधवराव गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली धारणीचे पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण, संध्या चव्हाण, सतीश झाल्टे, धिकार, सतीश राठोड ,उईके ,आदित्य, विकास, कथिलकर ,रितेश, सागर ,वंदना, कविता, नितीन लोहकपुरे, मंगेश मानमोडे, नायब तहसीलदार राजेश माली, जितेंद्र बारवान, नरेंद्र ठाकरे यांनी ही कारवाई केली.

### वारंवार वीजपुरवठा खंडित, नागरिक

महावितरणच्या मुख्य अभियंताला दिलेल्या निवेदनातून केली आहे.निवेदनात म्हटले आहे की, वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. विद्युत केंद्रावर तक्रार देऊनही कुठली कार्यवाही होत नाही. केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा फोन लावल्यास ते मुद्दामून फोन उचलत नाही. पावसाळा चालू व्हायच्या आधीच ही परिस्थिती आहे. दुपारी लोड शेडिंग व रात्री नागरिकांना अनेक अडचणी येत आहे. याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे नाहीतर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी जिल्हाप्रमुख संतोष बद्रे, अजय महल्ले, सुनील राऊत, संजय पळसोदकर, राजेश धोटे, अमर करेसिया, चेतन कल्याणकर आदि उपस्थित होते.

### निमगव्हाण येथे प्रतिबंधित

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार निमगव्हाण येथील शेतातील खोलीत मोठ्या प्रमाणात एचटीबीटी कपाशी बियाण्यांचा साठा असल्याचे उघड झाले. यानंतर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन संयुक्त पथकाने छापा टाकला. यावेळी शुभमसिंग बलजितसिंग चौधरी (वय २१, रा. धामणगाव रेल्वे) हा संशयित तेथे आढळून आला. छाप्यात कोहिनूर ब्रँडचे ५६, ग्लायको गार्डचे १४०, विराटचे १५५ आणि महाराजा ब्रँडचे ८१ असे एकूण ४३२ पॅकेट एचटीबीटी कपाशी बियाणे आढळून आले. प्रति पॅकेट १,६५० रुपये किंमत असलेल्या या साठ्याची एकूण किंमत ७.१२ लाख रुपये असल्याचे निष्पन्न झाले. पंचनामा करून संपूर्ण साठा जप्त करण्यात आला. कृषी अधिकारी व गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक रवी राणे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध बियाणे अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम, अत्यावश्यक वस्तू अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात, तंत्र अधिकारी नितीन लोखंडे, जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख प्रवीण खर्चे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किरण औटे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**शेतकऱ्यांनी सावध राहण्याचे आवाहन-**

एचटीबीटी हे जनुकीय बदल केलेले कपाशी बियाणे असून त्याच्या पर्यावरणीय परिणामांमुळे केंद्र शासनाने त्याच्या विक्री व लागवडीवर बंदी घातली आहे. तरीही काही विक्रेते अशा बियाण्यांची अवैध विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचे समोर येत आहे. कृषी विभाग व पोलिस प्रशासनाने शेतकऱ्यांना अशा बियाण्यांची खरेदी किंवा लागवड न करण्याचे आवाहन केले असून, साठा, विक्री, खरेदी किंवा लागवड करताना आढळल्यास व्यापारी आणि शेतकरी दोघांविरुद्धही कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, १२ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला वेग

### पशुधन संरक्षणासाठी युद्धपातळीवर लसीकरण; लक्ष्यपूर्तीसाठी काटेकोर नियोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला युद्धपातळीवर प्रारंभ केला आहे. पशुधनाचे आरोग्य अबाधित राखणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून विभागाने राज्यभर व्यापक नियोजन केले असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली.*



घटसर्प (हेमोरेजिक सेप्टिसेमिया) व फऱ्या (ब्लॅक क्वार्टर) यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पावसाळ्यापूर्वी लसीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. लसींची गुणवत्ता आणि प्रभाव कायम राहावा यासाठी राज्यस्तरापासून ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत शीतसाखळी व्यवस्थापनाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे. लस वाहतुकीसाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात असून आवश्यक तापमान राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करण्यात आली असून ही पथके गावागावांत आणि गोठ्यांपर्यंत जाऊन 'डोअर स्टेप' पद्धतीने लसीकरण करीत आहेत. एकही जनावर लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे संभाव्य संकट आणि आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

> यंदाच्या मोहिमेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे डिजिटल आणि पारदर्शक व्यवस्थापन होय. प्रत्येक पशुधनाला लस दिल्यानंतर त्याची नोंद केंद्र शासनाच्या 'भारत पशुधन प्रणाली' (एनडीएलएम पोर्टल) वर तात्काळ करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पशुधनाचे १२ अंकी टॅगिंग करूनच नोंदणी करण्यात येणार असून त्यामुळे मोहिमेच्या प्रगतीवर थेट देखरेख ठेवणे शक्य होणार आहे. तसेच बोगस नोंदींना आळा बसून लसीकरण मोहिमेची विश्वासार्हता अधिक मजबूत होणार आहे.
>
> – पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे

## वर्धा येथील तरुणाचा वाशीम येथे संशयास्पद मृत्यू

■ प्रतिनिधी | वाशिम ■



कामनिमित्त मित्रांसोबत वाशिम येथे आलेल्या ३४ वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना बुधवारी (दि. १०) पहाटे उघडकीस आली. आशिष बाबाराव शेळके (रा. एकलारा, ता. आर्वी, जि. वर्धा) असे मृताचे नाव आहे. घातपात की अपघात, यावरून तर्कवितर्क लावले जात असून, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आशिष शेळके हा त्याचा मित्र विनोद वसंतराव फटिंग (रा. सेलू, जि. वर्धा), अजय मनोहरराव वानखेडे (रा. धानोली, जि. वर्धा), गणेश जनार्दन भगत (रा. धानोली, जि. वर्धा) आणि सचिन शंकरराव राऊत (रा. सेलू, जि. वर्धा) यांच्यासह वाशिम शहरातील एका ले-आऊटच्या कामासाठी आले होते. दिवसभराचे काम आटोपल्यानंतर, हे पाचही जण मंगळवारी (दि. ९) सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास शहरातील शिवाजी चौक परिसरातील 'हॉटेल अलख लॉजिंग'मध्ये मुक्कामी आले होते. प्रत्यक्षदर्शिनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेलवर पोहोचले तेव्हा हे सर्वजण नशेत होते. त्यांनी हॉटेलमधील कॉमन डॉर्मेट्रीमध्ये मुक्काम केला. मात्र, बुधवारी पहाटे जेव्हा अन्य मित्रांना जाग आली, तेव्हा आशिष बेडवर दिसून आला नाही. त्याचा शोध घेतला असता, हॉटेलला लागून असलेल्या इमारतीच्या परिसरात तो मृतावस्थेत आढळून आला.

रात्री एकत्र झोपलेले असताना आशिष पहाटे उठून टेरेसवर कसा गेला आणि तिथून तो खाली कसा पडला, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, हा अपघात आहे की घातपात, हे गूढ कायम आहे. वाशिम शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून, पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठविला आहे. पुढील तपास वाशिम शहर पोलीस करत आहेत.

## जऊळका ग्रामपंचायतीच्या निविदा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह



### दोन कंत्राटदारांच्या निविदा फेटाळल्याचा आरोप; चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जऊळका ग्रामपंचायतीमार्फत जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत मंजूर असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती विकास योजनेअंतर्गत 'बौद्ध वस्तीतील सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम' या कामासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदा ९ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

या निविदा प्रक्रियेत एकूण सहा कंत्राटदारांनी सहभाग घेतला होता. मात्र तांत्रिक छाननीदरम्यान दोन कंत्राटदारांच्या निविदा फेटाळण्यात आल्याचे समोर आले आहे. संबंधित कंत्राटदारांनी कोणतेही ठोस कारण न देता त्यांची निविदा नाकारण्यात आल्याचा आरोप करत प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ई-निविदा प्रणालीवरील उपलब्ध माहितीनुसार, चार कंत्राटदारांच्या निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्या असून दोन निविदा 'ेरामू-ऊाम्फ्गर्म्ेि' या कारणास्तव बाद करण्यात आल्या आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्याचे कारण नमूद करण्यात आले असले तरी संबंधित कंत्राटदारांनी हा निर्णय अन्यायकारक असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणामुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत स्थानिक स्तरावर नाराजी व्यक्त होत असून निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून संपूर्ण माहिती सार्वजनिक करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## महाविस्तार एआय : शेतकऱ्यांच्या हातातील डिजिटल कृषी सल्लागार

### ● हवामान, पीक व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण ते बाजारभाव ● एका क्लिकवर उपलब्ध कृषी मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वाढता वापर शेतकऱ्यांसाठी नवी संधी निर्माण करीत आहे. बदलते हवामान, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारपेठेतील चढउतार आणि कीड-रोगांच्या समस्यांमुळे शेती अधिक आव्हानात्मक बनत असताना अचूक व वेळेवर माहिती मिळणे अत्यंत आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना शेतीविषयक इत्यंभूत माहिती सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने विकसित केलेले 'महाविस्तार एआय' ॲप प्रभावी डिजिटल माध्यम म्हणून पुढे येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या साहाय्याने कार्य करणारे हे ॲप शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नांची तत्काळ उत्तरे उपलब्ध करून देते. पीक लागवड, खत व्यवस्थापन, सिंचन, कीड व रोग नियंत्रण, हवामान बदलाशी संबंधित उपाययोजना, पशुसंवर्धन, कृषी योजना तसेच बाजारभाव यांसारख्या विविध विषयांवरील माहिती या ॲपच्या माध्यमातून मिळू शकते.

विशेष म्हणजे, शेतकरी आपल्या स्थानिक भाषेत प्रश्न विचारू शकतात. त्यामुळे तांत्रिक माहिती समजून घेणे अधिक सोपे होते. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि अद्ययावत माहितीच्या आधारे हे ॲप शेतकऱ्यांना योग्य निर्णय घेण्यास मदत करते.

सध्या हवामानातील अनिश्चितता आणि एल निनोसारख्या परिस्थितीमुळे पीक नियोजनाचे महत्त्व वाढले आहे. अशा वेळी योग्य वाणांची निवड, पेरणीचा कालावधी, जलव्यवस्थापन, मृदसंधारण आणि कीड-रोग नियंत्रण यासंदर्भातील शिफारशी शेतकऱ्यांना वेळेवर मिळणे आवश्यक असते. महाविस्तार एआय ॲप ही गरज प्रभावीपणे पूर्ण करत आहे.

कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदान, प्रशिक्षण कार्यक्रम आणि तांत्रिक सल्ला यांची माहिती देखील या ॲपद्वारे उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ झाले आहे. माहितीच्या अभावामुळे होणारे नुकसान टाळून शास्त्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यामध्ये हे ॲप महत्त्वाची भूमिका बजावत आहे. डिजिटल युगात माहिती हेच सर्वात प्रभावी साधन बनले असून, महाविस्तार एआय ॲप शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणारा विश्वासार्ह दुवा ठरत आहे. जिल्ह्यातील तालुकानिहाय नोंदणीमध्ये रिसोड तालुका १०,२४० नोंदणीसह आघाडीवर असून त्यापाठोपाठ मालेगाव ९,७३७, वाशिम ९,३८५, मंगरूळपीर ६,८९६, कारंजा ६,६८८ आणि मानोरा ४,१३४ शेतकऱ्यांनी ॲपवर नोंदणी केली आहे.अश्या एकुण ४७ हजार ८० शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

शेती अधिक उत्पादक, शाश्वत आणि हवामान बदलाशी सुसंगत करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने या ॲपवर नोंदणी करून त्याचा नियमित वापर करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## वाल्हई येथे तक्षशिला आयुर्वेद कॉलेजतर्फे मोफत आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न वाल्हई



■ प्रतिनिधी | कारंजा ■

तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा यांच्या वतीने ग्राम पंचायत कार्यालय, वाल्हई येथे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा किर्तीताई अर्जुन मॅडम, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस व प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिराचे उद्घाटन सरपंच दीपक कडू, उपसरपंच भागवत गजानन इंगळे व कर्मचारी जितेंद्र अटक यांच्या हस्ते करण्यात आले. या आरोग्य शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह तपासणी, विविध आजारांवरील आयुर्वेदिक सल्ला तसेच मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या वैद्यकीय चमूने रुग्णांची सखोल तपासणी करून आवश्यक उपचारांसह आहार-विहाराबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज पानभरे, डॉ. शिवानी कोल्हे, प्रणव टेवरे, अश्विनी घुले, योगिता मनवर, प्रयोगशाळा कर्मचारी गोकुळा डोंगरदिवे, पांडुरंग घोडसड तसेच अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## मालेगांव तालुक्यात ३५ ग्रामपंचायत सदस्य पदासाठी

### आज होणार आरक्षण जाहीर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

सन २०२५-२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागातील सदस्य पदाचे आरक्षण सोडत आज १२ जून २०२६ रोजी असून यासाठी संबंधित ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभा आयोजित करून सदस्य पदाचे आरक्षण काढल्या जाणार आहे तालुक्यात एकूण ३५ गावांमध्ये ग्रामपंचायत सदस्य पदाचे आरक्षण ग्राम सभेतून काढले जाणार असल्याने या ग्रामसभेला गावकऱ्यांनी राहण्याचे उपस्थित आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आली आहे राज्य निवडणूक पत्रानुसार आयोगाच्या मालेगाव तालुक्यात ग्रामपंचायत प्रभाग निह आरक्षण कार्यक्रम जाहीर झाला असून येत्या १२ जून २०२६ रोजी एकूण ३५ ग्रामपंचायत मध्ये आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर करण्यात आले आहे तर या संबंधित गावात सदस्य पदाच्या आरक्षणासाठी ग्रामसभा आयोजित करण्यात आली आहे यासाठी अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून अधिकारी हे ग्रामसभेला उपस्थित असणाऱ्या गावकऱ्यांच्या उपस्थितीत आरक्षण जाहीर करणार आहे. आरक्षण सोडत ही १२ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता व दुपारी दोन वाजता आयोजित करण्यात आली आहे या आरक्षण ग्रामसभेला गावातील नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आली आहे.

मालेगाव तालुक्यात अमाना, कुतरडोह, मुसळवाडी, खडकी इजारा, पांगरी नवघरे ,उमरदरी वरदरी ,उमरवाडी काळा कामठा , एकांबा, डही, वारंगी, चिवरा, कळंबेश्वर, मुंगळा, किन्ही राजा, जोडगव्हाण , कोळदरा, वाकलवाडी, शिरपूर, बोराळा जहांगीर, इत्यादी गावातील ग्रामपंचायत सदस्य पदासाठी आरक्षण काढल्या जाणार आहे.

## एमपीएससी गट-ब पूर्व परीक्षा २०२६

### १५ परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) आयोजित महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत वाशिम जिल्ह्यातील १५ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. परीक्षा सुरळीत, पारदर्शक व शांततापूर्ण वातावरणात पार पडावी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर (भा.प्र.से.) यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (३) अन्वये परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. वाशिम येथील आर. ए. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रेखाताई राष्ट्रीय विद्यालय, श्रीमती मालतीबाई सरनाईक विद्यालय, श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, श्री बाकलीवाल विद्यालय व श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतन आदी केंद्रांवर परीक्षा होणार आहे.

## वाशिम जिल्ह्यातील आयटीआय प्रवेश प्रक्रिया सुरू

### ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील वाशिम, मालेगाव, रिसोड, मंगरूळपीर, कारंजा आणि मानोरा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची प्रवेश प्रक्रिया २१ मेपासून सुरू झाली आहे. यावर्षी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसोबतच दहावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनाही विविध व्यवसायांमध्ये प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाने इच्छुक विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

विद्यार्थ्यांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर admission.dvet.gov.in वर ऑनलाइन अर्ज भरावेत. अर्ज भरल्यानंतर जवळच्या आयटीआय केंद्रावर जाऊन अर्जाची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी व्यवसायांचे पर्याय निवडता येणार आहेत. जिल्ह्यातील सहा आयटीआय संस्थांमध्ये एकूण १८ व्यवसायांसाठी सुमारे १,७५२ जागा उपलब्ध आहेत. आयटीआय वाशिम येथेच १२ विविध व्यवसायांमध्ये ५४० जागांवर प्रवेश दिला जाणार आहे. यामध्ये मेकॅनिक डिझेल, वेल्डर, ड्रेस मेकिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग टेक्निशियन, मेकॅनिक मोटार व्हेईकल, फूड प्रोडक्शन, फिटर, कॉस्मेटोलॉजी, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट (ण्र्ढ्ढ), वूड वर्क टेक्निशियन तसेच मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स या व्यवसायांचा समावेश आहे.

## माळवी सुवर्णकार मंडळची कार्यकारणी गठीत

**अकोला :** महानगरातील माळवी सुवर्णकार मंडळाची कार्यकारणी नुकतीच गठीत करण्यात आली असून मंडळाच्या अध्यक्षपदी समाजाचे सेवाभावी मेजर रामरतन बुळुकले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.दाबकी रोड येथील कार्यालयात समाजाचे आराध्य संत नरहरी महाराजाच्या प्रतिमा पुजन नंतर संपन्न झालेल्या बैठकीत मंडळाची उर्वरित कार्यकारणी बुळुकले यांनी घोषित केली.नूतन कार्यकारणीत उपाध्यक्ष ॲड. प्रविण सोनी,अरुण शेरेकर,सचिव प्रकाश हिरुडकर, सहसचिव गोपाल मांडळे,कोषाध्यक्ष बाळकृष्ण शेरेकर सदस्य श्रीकृष्ण धरमकर, सागर दनोरीकर, अनिल काटोले, आदी कामकाज बघणार आहेत.


### जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार हरी निवृत्ती मार्गे रा. कार्ली ता.जि.वाशिम यांनी मौजे कारली येथिल गट नं. २९० मधिल क्षेत्र २.५२ हे आरहे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील साधे कुळ या रकान्यात शिवराम गंगाराम गोघळी हि कुळाची नोंद कमी करण्यात यावी असा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

तरी सदर प्रकरणात मौजे कारली येथिल गट नं.२९० मधिल २.५२ हे आर या जमिनितील ७/१२ मधिल इतर अधिकारातील साधे कुळ या रकान्यात शिबराम गंगाराम गोधळी हि कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत प्रकरणात कोणाचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक- ९.६.२०२६
ठिकाण-वाशिम

शिक्का

**तहसिलदार,
वाशिम**


## जिल्हाधिकाऱ्यांचा तेल्हाऱ्यात धडक दौरा; प्रशासनाला फटकारले!

### रुग्णालय, क्रीडा संकुल, नगरपरिषदेच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी; नागरिकांच्या तक्रारींची गंभीर दखल

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■



तेल्हारा शहर व तालुक्यातील रखडलेली विकासकामे, ग्रामीण रुग्णालयातील गैरसोयी, क्रीडा संकुलाची दुरवस्था आणि नगरपरिषदेच्या संथ कारभाराबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गुरुवारी तेल्हाऱ्यात धडक दौरा केला. कोणतीही पूर्वसूचना न देता झालेल्या या भेटीमुळे तहसील कार्यालयासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी तहसील कार्यालयात विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर थेट नागरिकांशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनी शहर व तालुक्यातील अनेक प्रलंबित प्रश्न त्यांच्या समोर मांडले. उपाधीक्षक कार्यालयाकडे जाणाऱ्या चितळवाडी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था, नगरपरिषदेच्या रखडलेल्या विकासकामांमुळे नागरिकांना होत असलेला त्रास, क्रीडा संकुलातील अपुऱ्या सुविधा आणि ग्रामीण रुग्णालयातील अनेक गैरसोयी याबाबत नागरिकांनी संतप्त भावना व्यक्त केल्या.

नागरिकांच्या तक्रारी केवळ ऐकून न घेता जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ ग्रामीण रुग्णालयात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयातील स्वच्छता, औषधांची उपलब्धता, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती तसेच रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधांची त्यांनी सखोल तपासणी केली. काही बाबींमध्ये समाधानकारक परिस्थिती नसल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत जाब विचारला. त्यानंतर त्यांनी क्रीडा संकुलाची पाहणी केली. लाखो रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या सुविधांची झालेली दुरवस्था पाहून त्यांनी नाराजी व्यक्त केली. खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि संकुलाची दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाला आदेश देण्यात आले.

नगरपरिषदेच्या विविध रखडलेल्या कामांबाबतही जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे समजते. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित ठेवणे गंभीर बाब असून, यापुढे हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. 'जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आहे. नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. शासकीय यंत्रणांनी जबाबदारीने काम केले पाहिजे,' असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती आहे.

#### ▶▶ धडक दौऱ्याने उडाली खळबळ

जिल्हाधिकाऱ्यांच्या अचानक भेटीमुळे अनेक विभागांमध्ये धावपळ सुरू झाली. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आता संबंधित विभाग कितपत कार्यवाही करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागणार की पुन्हा आश्वासनांचीच खैरात होणार, याची उत्सुकता नागरिकांना लागली आहे.

#### ▶▶ जनतेच्या अपेक्षा वाढल्या

जिल्हाधिकाऱ्यांच्या धडक दौऱ्यामुळे प्रशासनातील सुस्तावलेल्या यंत्रणांना जाग येईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. मात्र, प्रत्यक्षात रस्ते, रुग्णालय, क्रीडा सुविधा आणि नगरपरिषदेची कामे किती वेगाने पूर्ण होतात, यावरच या दौऱ्याचे खरे यश अवलंबून राहणार आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९५ ■ शुक्रवार, १२ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# गांधींच्या विचारांच्या सावलीत निष्काळजीपणाची राख

## सौंदर्यीकरणाचे विद्रूपीकरण; पाण्याअभावी झाडे करपली, वर्धा रेल्वे प्रशासनावर संताप

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी यांच्या ऐतिहासिक मिठाच्या सत्याग्रहाच्या स्मृती जपण्यासाठी शासनाने लाखो रुपयांचा निधी खर्च करून वर्धा रेल्वे स्थानक परिसरात उभारलेले आकर्षक शिल्प आणि हरित सौंदर्यीकरण आज रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे करपलेल्या वास्तवात उभे ठाकले आहे. उन्हाळ्यात पाण्याचा थेंब न मिळाल्याने परिसरातील विविध प्रजातींची झाडे पूर्णपणे सुकून गेली असून 'सौंदर्यीकरण' आता 'विद्रूपीकरणात' बदलल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.

सेवाग्रामच्या भूमीतून महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यलढ्याला दिशा दिली. त्या ऐतिहासिक वारशाची जाणीव कायम राहावी म्हणून वर्धा रेल्वे स्थानक परिसरात गांधीजी व त्यांच्या सहकाऱ्यांचे शिल्प उभारण्यात आले. परिसर हरित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणही करण्यात आले. मात्र उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये या झाडांकडे रेल्वे प्रशासनाने अक्षरशः पाठ फिरवल्याचे चित्र दिसून येत आहे.





### अहिंसेच्या शिल्पाशेजारी निष्काळजीपणाची राख

स्थानक परिसरातील गांधी शिल्प हे विविधतेतील एकता आणि ब्रिटीशांविरुद्धच्या अहिंसक संघर्षाचे प्रतीक मानले जाते. मात्र त्याच शिल्पाशेजारी पाण्याअभावी करपलेली झाडे प्रशासनाच्या उदासीनतेची साक्ष देत उभी आहेत.

गांधींच्या विचारांना अभिवादन करणाऱ्या भूमीतच संवेदनशीलतेचा दुष्काळ पडल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

### पंप आहे, पाणी आहे मग बगीचा का करपला

वर्धा रेल्वे स्थानकासाठी पवनार नदीवर स्वतंत्र पंप हाऊसची व्यवस्था असतानाही 'पंप बंद'चे कारण पुढे करून खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची चर्चा रंगली आहे. दुसरीकडे स्थानकातील तिकीट घरासमोरील सौंदर्यीकरण बगीच्याला वेळेवर पाणी न मिळाल्याने अनेक झाडे करपून गेली आहेत. एवढी पाणी व्यवस्था उपलब्ध असताना सौंदर्यीकरणासाठी लावलेली झाडे वाचविण्यात रेल्वे प्रशासन अपयशी का ठरले, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. टँकरसाठी पैसा आहे, पण झाडांसाठी पाणी नाही का अशी बोचरी प्रतिक्रिया उमटत असून या निष्काळजीपणाला जबाबदार कोण, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

आज या परिसरात हिरवाईऐवजी वाळलेल्या फांद्या, करपलेली रोपे आणि दुर्लक्षाचे भयाण वास्तव दिसत आहे. गांधी विचारांचे प्रतीक असलेल्या या स्थळाची अशी दुरवस्था पाहून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून रेल्वे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर उलट-सुलट चर्चा रंगत आहेत.

# जलवाहिनी फुटली अन् प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फवारा उडाला

## प्रशासनाच्या निष्काळजीपणाने जलवाहिनी फुटली; २० फूट उंच फवाऱ्यात लाखो लिटर पाणी वाया



**वर्धा जनमाध्यम :** पाण्यासाठी नागरिकांचे हाल सुरू असताना प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गुरुवारी येळाकेळी परिसरात पाण्याची अक्षरशः उधळण झाल्याचा संतापजनक प्रकार घडला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जुनी मुख्य जलवाहिनी अचानक फुटल्याने तब्बल २० फूट उंच पाण्याचा फवारा उसळला आणि शेकडो लिटर पाणी रस्त्यावर वाहून गेले. या घटनेमुळे पिपरी (मेघे)सह १३ गावांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला.

धाम नदीतून पाणी उचलून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या गावांना पिण्याचे पाणी पुरवते. मात्र वर्षानुवर्षे जीर्ण झालेली जलवाहिनी बदलण्याकडे दुर्लक्ष केल्याने हा प्रकार घडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पाणीटंचाईच्या काळात प्रशासनाला जाग येणार तरी कधी असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

घटनास्थळी काही काळ प्रचंड वेगाने पाण्याचे कारंजे उडत होते. अनेकांनी हा प्रकार मोबाईलमध्ये कैद करत प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त केला. नागरिकांना थेंब-थेंब पाण्यासाठी झगडावे लागते आणि इथे लाखो लिटर पाणी वाहून जाते, अशी तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने युद्धपातळीवर दुरुस्ती हाती घेत सुमारे पाच तासांत जलवाहिनी दुरुस्त केली. मात्र वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे जुनी जलवाहिनी तातडीने बदलण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# जंगल तहानले... अन् गावावर वराहाचा हल्ला

## लोकवसाहतीत घुसलेल्या रानडुकराने दोघांना केले जखमी; भिडीत भीतीचे वातावरण

**भिडी जनमाध्यम :** जंगलातील नैसर्गिक पाणवठे आटल्याने वन्यप्राण्यांचा मोर्चा आता थेट लोकवस्तीकडे वळू लागला असून गुरुवारी भिडी गावात धक्कादायक प्रकार घडला. पाण्याच्या शोधात गावात शिरलेल्या एका जंगली वराहाने दोन नागरिकांवर हल्ला करून त्यांना जखमी केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राजेंद्र काळे (६८) व लता महल्ले (५६) अशी जखमींची नावे आहेत. सकाळी सुमारे ८ वाजताच्या सुमारास हा जंगली वराह अचानक गावात घुसला. सैरावैरा धावत असताना त्याने घराच्या अंगणात उभ्या असलेल्या राजेंद्र काळे यांच्यावर हल्ला चढवला. त्यानंतर दुसऱ्या बोळीत जाऊन लता महल्ले यांनाही जखमी केले.

घटनेनंतर गावात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तत्काळ धाव घेत दोन्ही जखमींना भिडी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, ऐरणी जंगल परिसरातील माकडांचा उपद्रव, रोही आणि नीलगायींचा शेतात वाढता वावर यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

# दारूमाफियांना देवळीतून कडक इशारा

## ११ लाखांच्या देशी-विदेशी दारूवर रोड रोलर



**देवळी जनमाध्यम :** अवैध दारू व्यवसायाविरोधात देवळी पोलिसांनी गुरुवारी धडाकेबाज कारवाई करत तब्बल ११ लाख १६ हजार रुपयांच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्यांवर रोड रोलर चालवून संपूर्ण साठा नष्ट केला. पोलिसांच्या या कारवाईमुळे दारूमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२१ पासून आजपर्यंत विविध कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेल्या दारूसाठ्याबाबत न्यायालयाने नाश करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुरुवारी निर्जनस्थळी ही कारवाई करण्यात आली. यामध्ये १०१ गुन्ह्यांतील ५ हजार ४१६ देशी-विदेशी दारूच्या बाटल्या, किंमत ८ लाख ६२ हजार ६० रुपये तसेच १४ गुन्ह्यांतील १ हजार ९८० बाटल्या, किंमत २ लाख ५४ हजार २०० रुपये असा एकूण ११५ गुन्ह्यांतील ११ लाख १६ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभाग वर्धा तसेच देवळी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली. अवैध दारू व्यवसाय खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

# जुनापाणी परिसरात महिलेचा कुजलेला मृतदेह आढळला

## दुर्गंधीमुळे प्रकार उघड; परिसरात खळबळ

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील जुनापाणी परिसरात एका घरात महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने बुधवारी सायंकाळी परिसरात खळबळ उडाली. घरातून येणाऱ्या तीव्र दुर्गंधीमुळे हा प्रकार उघडकीस आला. भारती विजय वातीले असे मृत महिलेचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले.

माहितीनुसार, जुनापाणी परिसरातील एका घरातून गेल्या काही वेळेपासून तीव्र दुर्गंधी येत होती. त्यामुळे शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी तत्काळ रामनगर पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घराचे दार उघडून पाहणी केली असता महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर उत्तरिय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नसून उत्तरिय तपासणी अहवालानंतरच कारण समोर येणार आहे. या घटनेमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून रामनगर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# कुंभार समाजाचा लढा अखेर जिंकला

**७०० ब्रासपर्यंत रॉयल्टी माफ : पारंपरिक कारागिरांना मोठा दिलासा**



**वर्धा जनमाध्यम :** वर्षानुवर्षे शासन दरबारी हेलपाटे मारणाऱ्या कुंभार समाजाच्या संघर्षाला अखेर मोठे यश मिळाले आहे. सकल कुंभार समाज विकास परिषदेच्या आक्रमक पाठपुराव्यानंतर राज्य शासनाने पारंपरिक कुंभार बांधवांसाठी ऐतिहासिक निर्णय जाहीर केला असून वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती काढण्यासाठी रॉयल्टी माफ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो कुंभार कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

२२ फेब्रुवारी २०२६ रोजी वर्ध्यात झालेल्या भव्य राज्यस्तरीय मेळाव्यात समाजाच्या विविध मागण्या पालकमंत्री डॉ पंकज भोयर यांच्याकडे मांडण्यात आल्या होत्या. त्यानंतर सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या नेतृत्वाखाली शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर मंत्रालयातील बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत समाजाच्या महत्त्वाच्या मागण्यांना हिरवा कंदील मिळाला. या शासन निर्णयानुसार पारंपरिक कुंभारांना ओळखपत्र, एक खिडकी योजना, कुंभार क्लस्टर, गाळ-मातीवरील सवलत तसेच वीटभट्ट्यांसाठी विविध सुविधा उपलब्ध होणार आहेत. मातीशी नाळ जोडलेल्या कारागिरांना अखेर न्याय मिळाला, अशी भावना समाज बांधवांनी व्यक्त केली. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री व पालकमंत्र्यांचे समाजाच्या वतीने जाहीर आभार मानण्यात आले.

## देवही सुरक्षित नाहीत

# सेवा येथील हनुमान मंदिर फोडले; चांदीचा ऐवज अन् दानपेटीतील रोकड लंपास

**आंजी (मोठी) जनमाध्यम :** परिसरात चोरीच्या घटनांनी डोके वर काढले असतानाच आता चोरट्यांनी देवस्थानालाच लक्ष्य केल्याने संताप व्यक्त होत आहे. नजीकच्या सेवा येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरात अज्ञात चोरट्याने धाडसी चोरी करीत चांदीचा ऐवज व दानपेटीतील रोकड असा मोठा मुद्देमाल लंपास केला. ही घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली.

माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर मूर्तीच्या





डोक्यावरील चांदीचा टोप, चांदीची छत्री तसेच चांदीची मूर्ती चोरून नेली. एवढ्यावरच न थांबता चोरट्याने मंदिरातील दानपेटी बाहेर नेऊन फोडली व त्यातील सुमारे ७० हजार रुपयांची रोकड पळविली.

सकाळी मंदिर उघडण्यासाठी गेलेल्या नागरिकांना चोरीचा प्रकार लक्षात येताच एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. ठसे तज्ज्ञ आणि श्वान पथकालाही पाचारण करण्यात आले होते. या घटनेमुळे परिसरातील भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून देवस्थानही चोरट्यांच्या विळख्यात गेल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

# २८ जुन ला महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेमार्फत येत्या २८ जुन रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. परिक्षा सुरळीत, सुरक्षित, पारदर्शकपणे व गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षेच्या नियोजनाबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.जयश्री घारफळकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी सीमा पाटील, उप शिक्षणाधिकारी प्राथमिक रुपेश काबंळे, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर पानसरे व देवानंद एकापुरे आदींची उपस्थिती होती.

येत्या २८ जुन रोजी आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा जिल्ह्यातील ११ परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. या परीक्षेत पेपर एकसाठी २ हजार १४५ तर पेपर दोनसाठी २ हजार ८१८ विद्यार्थी परीक्षेला बसणार असून, एकूण ४ हजार ९६३ परीक्षार्थी सहभागी होणार आहे.

बैठकीत परीक्षा केंद्रावरील भौतिक सुविधा, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य सुविधा, परीक्षा साहित्याची सुरक्षित साठवणूक, वाहतूक व वितरण, नियंत्रण कक्षाची कार्यपद्धती तसेच भरारी पथकांच्या नियुक्तीचा आढावा घेण्यात आला. केंद्रसंचालक, सहाय्यक केंद्रसंचालक, केंद्र परिरक्षक, कक्ष निरीक्षक व इतर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. उमेदवारांची ओळख निश्चित करण्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर फिंगर प्रिंट व फेस स्कॅनिंगद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी सर्व उमेदवारांची फ्रिस्किंग (शारीरिक तपासणी) केली जाणार आहे.

कोणत्याही प्रकारची तोतयेगिरी, अनुचित साधनांचा वापर अथवा इतर गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हास्तरीय सनियंत्रण पथके, भरारी पथके, नियंत्रण कक्ष व पोलिस यंत्रणा सतर्क राहणार आहेत. मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, ब्लूटूथ उपकरणे व इतर प्रतिबंधित साहित्य परीक्षा केंद्रात नेण्यास सक्त मनाई राहणार आहे. जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग, पोलिस विभाग, आरोग्य विभाग तसेच इतर संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून महाटेट-२०२६ परीक्षा यशस्वीपणे पार पाडावी, असे निर्देश देण्यात दिले.

यावेळी उमेदवारांनी प्रवेशपत्र व वैध फोटो ओळखपत्रासह नियोजित वेळेपूर्वी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे व परीक्षा परिषदेच्या सर्व सूचनांचे पालन करावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सीमा पाटील यांनी केले. अधिक माहितीसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयाशी संपर्क साधावा, असे शिक्षणाधिकारी यांनी कळविले आहे.

# नोंदणीकृत शेतकऱ्यांसाठी तुती लागवड पुर्व प्रशिक्षण

## तुती लागवड करण्यासाठी नाव नोंदणी सुरु

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात रेशीम उद्योग वाढीस चालना देण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाच्यावतीने नोंदणीकृत असलेल्या शेतकऱ्यांसाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यात तुती लागवड पुर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

रेशीम कार्यालयात तुती लागवडीसाठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांसाठी सेलू, देवळी, हिंगणघाट व आष्टी येथे जुन्या प्रगतीशी शेतकऱ्यांच्या तुती बागेमध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणास रेशीम विकास अधिकारी रजनी बनसोड यांनी तुती लागवड करण्यापुर्वी घ्यावयाची काळजी, जमीनीची पुर्वतयारी, लागवड पध्दत आणि आधुनिक तंत्रज्ञान याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. केवळ माहिती न देता शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष भेट देऊन प्रात्याक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी शेतकरी बांधवानी विचारलेल्या विविध तांत्रिक शंका व प्रश्नांचे प्रत्यक्ष समाधानकारक निराकरण करण्यात आले.

आगामी खरीप हंगामात पाऊस सुरु झाल्यानंतर लगेचच शेतकऱ्यांनी तुती रोपाद्वारे प्रत्यक्ष शेतात लगावड सुरु करावी. पावसाळ्यात केलेली लागवड ही रोपांच्या उत्तम वाढीसाठी आणि रुजवणीसाठी अत्यंत फायदेशिर ठरते, असे रजनी बनसोड यांनी सांगितले. ज्या शेतकऱ्यांना यापुर्वी नोंदणी करता आली नाही, त्यांनी पुढील प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी करुन घ्यावी. नाव नोंदणी आणि अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधावा, प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी कार्यालयातील क्षेत्र सहाय्यक संगीता मुकुर्णे, शुभम ताकोते यांनी परिश्रम घेतले, असे जिल्हा रेशीम कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## दारू पिऊन स्टेअरिंग पकडणाऱ्यांनो सावधान

# वर्धा वाहतूक शाखेची धडक कारवाई; मद्यधुंद स्विफ्ट चालकाला पकडले, वाहन जप्त



**वर्धा जनमाध्यम :** वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वर्धा वाहतूक नियंत्रण शाखेने गुरुवारी शहरात विशेष नाकाबंदी मोहीम राबवत मद्यधुंद वाहन चालकांवर धडक कारवाई केली. बजाज चौक परिसरात तपासणी दरम्यान दारूच्या नशेत भरधाव कार चालविणाऱ्या एका चालकाला पोलिसांनी पकडून वाहन जप्त केले.

मिळालेल्या माहितीनुसार, मार्शल पेट्रोलिंगदरम्यान पोलिस अंमलदार मुकेश राऊत, चंद्रकांत तपासे व दिलीप कामडी यांनी एमएच ३१ डीव्ही ७४६१ क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कारची तपासणी केली. चालक अब्दुल अनिस अब्दुल सत्तार (वय ४२, रा. यवतमाळ) हा मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे आढळले. अल्कोहोल आढळल्याने मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

वाहतूक शाखेने त्याचा वाहन परवाना निलंबनासाठी आरटीओकडे प्रस्तावित केला आहे. दरम्यान, २०२६ मध्ये जिल्ह्यात ड्रंक अँड ड्राईव्हच्या १५२ कारवाया करण्यात आल्या असून हेल्मेट नसलेल्या १३८६ वाहनचालकांवरही कारवाई करण्यात आली आहे.

दारू पिऊन वाहन चालवू नका, नियम पाळा अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा वाहतूक नियंत्रण शाखेने दिला आहे.

**जाहीर नोटीस**

माझे अशील श्री. चेतन सुधाकर घोडखांदे हे मौजा – वडगाव (काळा), ता. सेलू, जि. वर्धा येथील ग्रामपंचायत वडगाव (काळा) हद्दीतील, मौजा क्र. १४८, पी.एच. क्र. १४, वॉर्ड क्र. ०१, मालमत्ता क्र. २६१ (असेसमेंटप्रमाणे), क्षेत्रफळ १३९.४५ चौ. मी. (१५००.४८ चौ. फूट) असलेल्या मिळकतीचे मालक आहेत. सदर मिळकतीवर निवासी घर बांधलेले आहे.

सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :-

पूर्वेस : ग्रामपंचायत रस्ता,

पश्चिमेस : श्री. किशोर बाळाजी घोडखां देयांची खाजगी जागा,

उत्तरेस : श्री. मधुकर घोडखांदे यांचे घर, दक्षिणेस : श्री. चंद्रशेखर घोडखांदे यांची खाजगी जागा श्री. सुधाकर शंकरराव घोडखांदे यांनी मालमत्ता क्र. २६१ (असेसमेंटप्रमाणे), क्षेत्रफळ १३९.४५ चौ. मी. (१५००.४८चौ. फूट) ही मिळकत दिनांक २६/०५/२०२६ रोजी दस्त क्र. १९५२/२०२६ अन्वये श्री. चेतन सुधाकर घोडखांदे यांना विक्री केली आहे.मात्र माझ्या अशिलांचे सदर मालमत्तेशी संबंधित मूळ लिंक विक्रीखत दिनांक २८/०६/२००० चे दस्त क्र. ७०८/२००० हे हरवलेले आहे.तसेच माझ्या अशिलांनी इंडिया शेल्टर फायनान्स कंपनीकडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणाचा काही दावा, हक्क, हरकत, आक्षेप किंवा स्वारस्य असल्यास अथवा हरवलेले वरील मूळ विक्रीखत कोणास मिळाल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा - ४४२००१**
**मो. क्र. ९९२२४२६१६८**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# विकसित महाराष्ट्र -२०४७ साठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरणासह सर्वसमावेशक मानवी विकासासाठी राज्याचे विशेष प्रयत्न-मुख्यमंत्री

- नीती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या प्रगतीचा रोडमॅप सादर
- पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे राज्याचे उद्दिष्ट
- आकांक्षित जिल्हे-तालुक्यांच्या शाश्वत विकासावर विशेष भर
- युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी देण्याचे नियोजन







**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोडमॅप सादर केला. या बैठकीस केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोककुमार लाहिडी आणि सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित होत असल्या तरी सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिक हीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे. या पार्श्वभूमीवर विकसित महाराष्ट्र - २०४७ हे व्हिजन डाक्युमेंट जाहीर करण्यात आले असून २०३० पर्यंत एक ट्रिलियन डालर, २०३५ पर्यंत दोन ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डालरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील सर्व विभागांनी २०२९-३० पर्यंतच्या कालावधीसाठी कृती आराखडे तयार केले असून शाश्वत विकास उद्दिष्टांची वेळेत पूर्तता करण्यावर राज्याचा भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आकांक्षित जिल्ह्यांची संख्या चारवरून दहापर्यंत आणि आकांक्षित तालुक्यांची संख्या २७ वरून १७७ पर्यंत वाढविण्यात आली असून या भागांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

**पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत व्यापक सुधारणा-**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची सर्वसमावेशक अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, बहुविद्याशाखीय शिक्षण, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट प्रणाली, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप तसेच एआय, रोबोटिक्स, डेटा सायन्स आणि ब्लाकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात देशातील पहिली जागतिक दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी आकर्षण केंद्र ठरेल, असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पूर्व प्राथमिक शिक्षण मजबूत करण्यासाठी पोषण भी पढाई भी, आरंभ, स्मार्ट अंगणवाडी आणि सक्षम अंगणवाडी यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. बालस्नेही शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर आणि अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू आहे. शालेय शिक्षणात महाराष्ट्राची परफार्मन्स ग्रेडिंग इंडेक्समध्ये प्रचेस्टा-१ कडे वाटचाल सुरू आहे. राज्यात २ कोटी आठ लाखांपेक्षा अधिक अपार आयडी तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणणे, डिजिटल वर्ग, व्यावसायिक शिक्षण तसेच मुली, आदिवासी व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवले आहे.

**कौशल्य विकास, स्टार्टअप आणि नवसंशोधनाला चालना-** राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून राज्यात ३ लाख ३० हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी नोंदणीकृत आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवसंशोधन धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत १ लाख २५ हजार उद्योजक घडविणे आणि ५० हजार स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एआय, डीप-टेक, फिनटेक आणि शाश्वतता या क्षेत्रांवर विशेष भर दिला जात असून महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी विकसित करण्यात येत आहे. तसेच कुशल युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र एजन्सी फार होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी' ही संस्था स्थापन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

**आरोग्य क्षेत्रात व्यापक विस्तार-** आरोग्यसेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचार पॅकेजेसची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्यात ४५३७ रुग्णालये या योजनांशी संलग्न करण्यात आली आहेत.

शहरी भागांसाठी स्वतंत्र शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून ११ नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे काम सुरू आहे. मेडिसिटी संकल्पनेद्वारे वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तृतीयक आरोग्यसेवा आणि आयुष प्रणाली यांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**लखपती दिदींची संख्या १ कोटींवर नेण्याचा मानस**-महिला सक्षमीकरण हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उमेद अभियानाअंतर्गत राज्यात ५० लाख लखपती दिदी झाल्या असून ही संख्या एक कोटीपर्यंत नेण्याचा मानस आहे. बचत गटांच्या उत्पादनांसाठी १३ जिल्हास्तरीय उमेद मॉल्स उभारण्यात येत आहेत. लाडकी बहीण योजनेंतर्गत सध्या १.६६ कोटी महिला लाभार्थी असून या योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता आणि आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

**सर्वसमावेशक विकासावर भर-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून संधी निर्माण करण्यावर राज्याचा भर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांसाठी १०० नवीन वसतिगृहे उभारण्यात येत असून त्यात २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची व्यवस्था होणार आहे.

**१० हजार कोटी गुंतवणूक; १.५ रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट-**मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने ८०० हून अधिक नागरिक आणि व्यवसाय सेवांची प्रक्रिया पुनर्रचना केली आहे. महासारथी आणि महाडीबीटी २.० द्वारे नागरिक सेवा अधिक सुलभ करण्यात येत आहेत. अर्जातील रकाने आणि कागदपत्रांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आली आहे. महाराष्ट्र एआय धोरण २०२६ अंतर्गत १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे आणि १.५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी महाॲग्री-एआय धोरण महाॲगएक्स आणि महाट्रेस यांसारखे डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

**गडचिरोलीसाठी विशेष विकास आराखडा-**गडचिरोली जिल्ह्यासाठी नक्षलग्रस्त भागोत्तर विकास कार्ययोजना राबविण्यात येत असून पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीवर भर दिला जात आहे. गडचिरोलीला भारतातील पहिले मोठे इंटिग्रेटेड स्टील हब म्हणून विकसित करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**पर्यटन आणि औद्योगिक विकासाला चालना-**एक राज्य, एक जागतिक पर्यटन स्थळ योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग आणि नाशिक या ठिकाणांचा जागतिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यात येणार आहे. राज्यभरात १०० पर्यटन उप-परिपथ विकसित करण्याचे उद्दिष्ट असून धार्मिक, वारसा, जल, बेट आणि अनुभवात्मक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यात ६३.८५ लाखांहून अधिक एमएसएमई कार्यरत असून २.५ कोटींहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. भारतातील एकूण एफडीआयपैकी सुमारे ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत असल्याचे नमूद करून महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत २०.३ लाख कोटींच्या गुंतवणुकीची पाइपलाईन तयार झाली आहे.

## दंत पर्यटनाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** विकसित महाराष्ट्र २०४७ या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेच्या अनुषंगाने राज्यात दंत पर्यटन (डेंटल टुरिझम) क्षेत्राला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए) यांच्यात सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. राजशिष्टाचार, परकीय गुंतवणूक, डायसपोरा आणि आउटरीच विभागाच्या पुढाकाराने हा करार करण्यात आला.मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनातर्फे सचिव डॉ. राजेश गवांदे आणि उप सचिव अविनाश सोलावट तसेच इंडियन डेंटल असोसिएशनतर्फे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्ष-या केल्या. राज्यात पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण करणे, विविध क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील आरोग्यसेवा केंद्र म्हणून विकसित करणे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या कराराद्वारे महाराष्ट्राला दंत आरोग्य आणि उपचारांसाठी सुरक्षित, पारदर्शक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक केंद्र म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत देश-विदेशातील रुग्णांना महाराष्ट्रातील दंत उपचार सुविधा, टेलि-कन्सल्टेशन सेवा आणि अन्य आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.



## ‘कृषी मित्र’ भरतीच्या नावाखालील बोगस जाहिरातींपासून सावध राहा-कृषी मंत्री भरणे

### फसवणूक करणा-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करणार

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबई, दि. ११ : राज्यात कृषी मित्र भरतीच्या नावाखाली सोशल मीडिया आणि इतर माध्यमांद्वारे काही व्यक्तींकडून बोगस जाहिराती प्रसारित करून शेतकरी, युवक व नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा कोणत्याही खोट्या जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणीही याला बळी पडून नये, असे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या कोणत्याही भरती प्रक्रियेची माहिती केवळ शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर, अधिकृत प्रसिद्धी माध्यमांद्वारे किंवा संबंधित कार्यालयांमार्फतच जाहीर केली जाते. त्यामुळे सोशल मीडियावर प्रसारित होणा-या अप्रमाणित जाहिराती, अर्जासाठी शुल्क भरण्याच्या सूचना, वैयक्तिक बँक खात्यावर पैसे जमा करण्याचे आवाहन किंवा संशयास्पद लिंक यांना बळी पडू नये. यासंदर्भात माहिती देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, ‘कृषी मित्र भरतीच्या नावाखाली शेतकरी, युवक आणि नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करणा-या कोणतीही गय केली जाणार नाही. खोट्या व दिशाभूल करणा-या जाहिराती प्रसारित करून फसवणूक करणा-या व्यक्ती अथवा संबंधितांवर कृषी विभागामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. नागरिकांनी अशा बोगस जाहिरातींपासून सावध राहून भरतीसंदर्भातील माहितीची खातरजमा अधिकृत माध्यमांतूनच करावी.‘ नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद जाहिराती किंवा संदेश आढळल्यास तात्काळ संबंधित कृषी विभागाच्या कार्यालयास अथवा स्थानिक पोलीस प्रशासनास माहिती द्यावी, असेही आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.




## अन्न सुरक्षा पथकावर जीवघेणा हल्ला


**छ. संभाजीनगर /प्रतिनिधी-**अवैध गुटख्यावर कारवाई करायला गेलेल्या अन्न व औषध विभागाच्या पथकावर गुटखा माफियांनी जीवघेणा हल्ला केला आहे आहे. ही घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालक्यातील रहीमपूर येथे घडली. कारवाई करताना गुटखा माफियांनी अधिकारी आणि कर्मचा-यांना घेराव घालत शिवीगाळ करत धमक्या दिल्या.गुटखा माफियांनी महिला अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांच्या अंगावर भरधाव वाहन घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी गुटख्याने भरलेला ट्रकही पळवून नेला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल मंत्री नरहरी झिरवळ आणि आयुक्त तुकाराम मुंढे यांनी घेतली आहे.याप्रकरणी अधिकची माहिती अशी की, मंगळवारी सहाय्यक आयुक्त विवेक पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी, प्रज्ञा सुरसे, नमुना सहाय्यक अमोल कांबळे यांचे पथक रहिमपुरात गेले होते. तेथे उभ्या असलेल्या एमएच-१६-सीडी-८२९६ क्रमांकाच्या ट्रकच्या तपासणीत त्यात गुटखा व पानमसाल्याची २५ ते ३० मोठी पोती आढळली. पथकाने तातडीने कारवाई सुरू करून पोलिस मदतीची मागणी केली. मात्र, पोलिस घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच काळ्या रंगाचे विना क्रमांकाचे वाहन भरधाव वेगाने तेथे दाखल झाले. जीपमधून उतरलेल्या आरोपींनी अधिका-यांना शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने वाळूज पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली, त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 700 रुपयांत बांगलादेशी बनतायेत भारतीय

**बंगळुरू** : केरळमध्ये सुमारे १०,००० बांगलादेशी नागरिक बनावट ओळखपत्रांच्या आधारे स्थलांतरित मजूर म्हणून राहत असल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. केवळ ७०० रुपयांत बनावट आधार, पॅन आणि मतदार ओळखपत्र तयार करून देणा-या बंगळुरू स्थित रॅकेटचा पर्दाफाश झाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.केरळमधून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक माहिती समोर आली आहे. एका अलीकडील मीडिया अहवालानुसार, राज्याच्या विविध भागांत जवळपास १०,००० बांगलादेशी नागरिक बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय नागरिक असल्याचा आव आणून राहत आहेत. या मोठ्या अवैध जाळ्याचा उलगडा तेव्हा झाला, जेव्हा पोलिसांनी कोल्लम जिल्ह्यातील कोट्टारक्करा येथे १० बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले. या व्यक्ती अनेक वर्षांपासून केरळमध्ये भारतीय नागरिकांप्रमाणे राहत होत्या. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, त्यांनी अगदी कमी पैशांत बनावट भारतीय ओळखपत्रेही मिळवली होती.तपास अधिका-यांच्या माहितीनुसार, ही घुसखोरी प्रामुख्याने बांगलादेश सीमेलगतच्या भागांतून सुरू होते. हे लोक प्रथम पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादसारख्या भागांत पोहोचतात आणि तेथे सुरुवातीची बनावट कागदपत्रे तयार करून घेतात. त्यानंतर रोजगाराच्या शोधात ते देशातील इतर भागांमध्ये, विशेषतः केरळमध्ये जातात. पश्चिम बंगालमधील स्थलांतरित मजूर असल्याचे भासवून ते केरळमध्ये पोहोचतात आणि स्थानिक पत्त्यांचा वापर करून पूर्णपणे भारतीय ओळख प्राप्त करतात.केरळमध्ये या बांगलादेशी नागरिकांना केवळ ७०० रुपये देउन आधार कार्ड, रेशन कार्ड यांसारखी अत्यंत महत्त्वाची सरकारी कागदपत्रे मिळत होती. या बनावट कागदपत्रांच्या आधारे ते स्वतःला भारतीय नागरिक म्हणून सादर करत होते. पोलिसांना संशय आहे की या बनावट कागदपत्रांच्या मागे बेंगळुरू मधून कार्यरत असलेले मोठे रॅकेट असू शकते. ही कागदपत्रे इतकी अचूक बनवली जातात की खरी आणि बनावट यामध्ये फरक करणे कठीण होते.

## नोकरीसाठी गेलेले 20 भारतीय रशियात अडकले

**मॉस्को** : फिश पॅकिंग आणि टेलरिंगची नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली गुजरातमधून ३३ लोकांना रशियाला पाठवले. रशियात नोकरी करण्यासाठी दीड ते दोन लाख पगार मिळेल असे आमिष दाखवले, परंतु रशियात गेल्यानंतर त्यांना केवळ १० हजार रुपये पगार दिला गेला. फसवणूक झाल्याने या सर्वांना पुन्हा भारतात यायचे आहे, परंतु परत येण्याचा मार्ग खडतर झाला आहे. आणंद आणि वडोदरा येथील २० तरुण-तरुणी रशियात अडकले असून या सर्वांची पेटलाद येथील रहिवासी रिम्पल पटेल याने फसवणूक केली आहे. रशियाला घेउन जाण्याच्या बदल्यात रिम्पल पटेल याने तरुणांकडून ७८ लाख रुपये उकळल्याचे समोर आले आहे. पीडित व्यक्तींनी सांगितले की, ज्या कंपनीसोबत करार झाला आहे, त्या कंपनीने आमचे पासपोर्ट जप्त केले आहेत. भारतात परत जायचे असेल तर प्रत्येक व्यक्तीने ५०० डॉलर म्हणजेच जवळपास ४८ हजार रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. खोलीत बंद केले जाते. बाहेर जाण्यास बंदी आहे. जेवणही दिले जात नाही, असे पीडिताने म्हटले आहे.



## राज्यातील सर्व आस्थापनांची पॉश अधिनियमानुसार तपासणी करण्याचे महिला व बाल विकास आयुक्तांचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी पॉश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील अधिका-यांबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांचेसह १२ संवर्गातील ४००० पेक्षा जास्त अधिका-यांनी राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये अधिनियमाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्तयांनी दिले आहेत. आयुक्त डॉ.जगदीश मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली. बैठकीला राज्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, मुख्यसेविका यांचेसह सर्व १२ संवर्गातील अधिकारी उपस्थित होते. राज्यातील १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी-कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांच्या तपासणी बरोबरच १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त यांनी दिले. ज्या कार्यालये अथवा आस्थापनांमध्ये योग्य अंमलबजावणी होत नाही, त्यांचेवर अधिनियमातील कलम २६ नुसार दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व विभागप्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये पॉश अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आवाहन केले आहे. केंद्र शासनाच्या शी बॉक्स पोर्टल वरील नोंदींनुसार महाराष्ट्र देशातील इतर राज्ये व केंद्र शासित प्रदेश यांच्या तुलनेत अग्रेसर आहे. राज्यातील १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी-कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये पॉश अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

## संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

- अशोक पत्की, आनंद भाटे, अरुण नलावडे यांच्यासह
- महाराष्ट्रातील दिग्गज व युवा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणा-या संगीत नाटक अकादमीच्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित संगीत नाटक अकादमी फेलोशिप, संगीत नाटक अकादमी पुरस्कार; तसेच उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज; तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे. वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे. अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे; तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे.

## राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसाठी मंत्री आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (एनएचएम) केंद्रीय अतिरिक्त सचिव व व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (भाप्रसे.) यांची कर्तव्य भवनमध्ये भेट घेतली. २०२६-२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (पीआयपी) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) काक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वत? मान्यता देण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील अधिकाधिक मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. आरोग्य सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या दैनंदिन कामकाजातील विविध ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण व आरोग्यविषयक माहितीचे डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी आशा स्वयंसेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आशा स्वयंसेविकांचे प्रोत्साहनपर मानधन वेळेत वितरित करण्यासाठीही केंद्र शासनाकडून निधी वेळेवर मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलनासाठी निक्षय योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण वेळेत मिळण्यासाठी आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून देण्याची; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या नावीन्यपूर्ण आरोग्यविषयक प्रस्तावांना मंजूरी देण्याची मागणी करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांचे मानधन अदा करण्यासाठी अनुदान वेळेवर उपलब्ध करून देणे, तसेच पायाभूत सुविधा कक्ष अंतर्गत प्रलंबित देयके तातडीने मंजूर करण्याबाबत यावेळी आग्रह धरण्यात आला. या बैठकीत महाराष्ट्रातील निदान सेवा अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर विचारविनिमय झाला . तसेच पीएम एभीम अंतर्गत क्रिटिकल केअर व एकात्मिक सार्वजनिक प्रयोगशाळा साठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत चर्चा झाली. ‘महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून लोकाभिमुख योजना राबवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामध्ये समन्वय वाढवण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी केंद्र शासन सकारात्मक असून, आवश्यक ते सहकार्य मिळेल असा विश्वास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.



काक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेची वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत वाढविण्यास तत्त्वतः मान्यता

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# गुंतागुंतीचे कटकारस्थान

सध्या या संघर्षातील सर्वात मोठी अडचण लष्करी कारवाईची नसून, शांतता कराराच्या मसुद्याची आणि अटींची आहे. अमेरिका आणि इराण या दोघांपैकी कोणाचाही या युद्धात पूर्ण विजय झालेला नाही आणि कोणीही पूर्णपणे हरलेले नाही. दोन्ही देशांना आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे हा करार हवा आहे. पण खरी कोंडी अशी आहे की, हा करार अशा पद्धतीने तयार करायचा आहे, जेणेकरून दोन्ही बाजूंना स्वतःचा 'विजय' म्हणून आपापल्या देशातील जनतेला आणि कट्टरपंथीय नेत्यांना तो दाखवता येईल. दोन्ही देशांमधील अंतर्गत राजकारण, तिथल्या नेत्यांचे स्वभाव आणि परस्परविरोधी मागण्या यामुळे करारावर स्वाक्षरी होण्यास अडथळे येत आहेत. इराणचे नेतृत्व सध्या मोज्तावा खामेनी यांच्याकडे आहे. आपले वडील अमेरिका-इस्त्रायली हल्ल्यात मारले गेल्यामुळे ते सुरक्षित स्थळी असून, त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी मध्यस्थांना 'कुरिअर यंत्रणेचा' वापर करावा लागत आहे. यामुळे करारातील साध्या बदलांना उत्तर यायलाही अनेक दिवस लागत आहेत. खामेनी यांच्यावर त्यांच्याच देशातील 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्प्स'च्या कट्टरपंथीयांचा मोठा दबाव आहे. अमेरिकेने आमचे अनेक मोठे नेते मारले असल्याने त्यांच्यासमोर इराणने अजिबात झुकू नये, अशी या लष्करी अधिकाऱ्यांची भूमिका आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा लहरी स्वभाव या चर्चेला वारंवार खिळ घालत आहे. ट्रम्प यांनी आपल्याच दूतांनी ठरवलेल्या अटी अचानक बदलल्या आहेत. एप्रिलमधील चर्चेत अणू कार्यक्रमाला १० वर्षांची स्थगिती देण्याचे मान्य करून नंतर ट्रम्प यांनी अचानक २० वर्षांची अट लादली, ज्यामुळे पाकिस्तानमधील बोलणी फिसकटली होती. इराणचा प्रदीर्घ काळापासून असलेला अविश्वास आणि ट्रम्प यांच्या या अनपेक्षित अटीमुळे हा करार सध्या 'ना युद्ध, ना शांतता' अशा चक्रव्यूहात अडकला आहे. या अंतर्गत राजकीय वादामुळे आणि अनिर्णित अवस्थेमुळे 'हॉर्मुझची खाडी' जागतिक अर्थव्यवस्थेसाठी एक आव्हान ठरत आहे. जगातील एकूण तेल आणि वायू पुरवठ्याचा तब्बल पाचवा हिस्सा याच अत्यंत महत्त्वाच्या जलमार्गावरून वाहून नेला जातो. अमेरिका इराणच्या बंदरांची नाकेबंदी करून स्वतःचे पारडे जड करण्याचा प्रयत्न करत आहे, तर इराणने या खाडीचे शस्त्रास्त्रीकरण करून जागतिक वाहतूक रोखली आहे. या 'वाटाघाटीच्या आत सुरू असलेल्या पडद्याआडच्या युद्धामुळे' जागतिक पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित झाल्यामुळे इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत आणि वाहतूक खर्च वाढल्याने जगभरात महागाईचा भीषण भडका उडाला आहे. या जागतिक आर्थिक संकटाची थेट आणि गंभीर झळ भारतासारख्या विकसनशील देशालाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. देशांतर्गत तेल कंपन्यांना आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढत्या ऊर्जा खर्चाचा सामना करावा लागत आहे. याचा परिणाम म्हणून, भारतात अवघ्या तीन महिन्यांत घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत झालेली दुसरी वाढ हे याचेच स्पष्ट आणि ज्वलंत उदाहरण आहे. पश्चिम आशियातील हा तणाव आपल्यापासून भौगोलिकदृष्ट्या दूर असला, तरी सामान्य भारतीय नागरिकांच्या खिशावर आणि कौटुंबिक बजेटवर त्याचा थेट परिणाम होत आहे. इराणचा राजनैतिक कयास असा आहे की, अमेरिकेतील पेट्रोल पंपांवरील वाढते दर आणि ढासळती जागतिक अर्थव्यवस्था यामुळे शेवटी ट्रम्प यांनाच माघार घ्यावी लागेल. ट्रम्प काही आठवडे तग धरू शकतील, पण आंतरराष्ट्रीय निर्बंधांचा चार दशकांहून अधिक काळ सामना करणारा इराण मात्र पुढील अनेक महिने लढा सुरू ठेवू शकतो, या आत्मविश्वासावर ते आपली भूमिका ताणून धरत आहेत. या संपूर्ण आंतरराष्ट्रीय समीकरणात सर्वात महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा ठरत आहे तो म्हणजे अमेरिका आणि इस्त्रायलमधील वाढते मतभेद. ट्रम्प यांना या वर्षाच्या अखेरीस अमेरिकेत मध्यावधी निवडणुकांचा सामना करायचा आहे, त्यामुळे त्यांना इंधन दर नियंत्रणात आणण्यासाठी हा करार लवकरात लवकर हवा आहे; परंतु इराणची गोठवलेली २४ अब्ज डॉलर्सची मालमत्ता मुक्त करण्याची अट ट्रम्प यांच्यासाठी देशांतर्गत राजकारणात कमालीची अडचणीची ठरू शकते, कारण त्यांचे राजकीय विरोधक त्यांच्यावर 'कमकुवत' असल्याचा आणि इराणसमोर झुकल्याचा आरोप करू शकतात. दुसरीकडे, अमेरिकेचा सर्वात मोठा मित्रदेश असलेला इस्त्रायल मात्र पूर्णपणे वेगळ्या धोरणात्मक पातळीवर काम करत आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू हे आपल्या देशातील कट्टर-उजव्या विचारसरणीच्या आघाडी सरकारमुळे आणि राजकीय अस्तित्वासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यास तयार नाहीत. अमेरिकेचा मुख्य उद्देश इराणला केवळ अण्वस्त्रे मिळवण्यापासून रोखणे आणि स्वतःचे सार्वभौम सुरक्षा हित जपणे हा आहे. याउलट, इस्त्रायलला लेबनॉनमधील हिजबुल्लाहचा प्रादेशिक धोका समूळ नष्ट करायचा आहे, गाझा आणि सीरियामध्ये लष्करी मोहिमा तीव्र ठेवायच्या आहेत आणि 'ग्रेटर इस्त्रायल'चे स्वप्न पूर्ण करायचे आहे. इराणने युद्धबंदीसाठी लेबनॉनमधील इस्त्रायली कारवाया थांबवण्याची अट घातली आहे, जी इस्त्रायलला पूर्णपणे अमान्य आहे. या परस्परविरोधी धोरणांमुळे अमेरिका आणि इस्त्रायलच्या हितसंबंधांमध्ये उघडपणे दरी निर्माण झाली आहे. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हॉन्स यांनीही हे मान्य केले आहे की, अनेक बाबतीत साम्य असले तरी काही परिस्थितीमध्ये अमेरिका आणि इस्त्रायलचे हितसंबंध एकमेकांपासून वेगळे आहेत. जर ट्रम्प प्रशासन आपल्या मित्रदेशाला म्हणजेच इस्त्रायलला शांत करण्यात आणि इराणसोबतच्या या शांतता करारावर स्वाक्षरी करण्यात अपयशी ठरले, तर हा प्रादेशिक वणवा वेळेतच विझवता येणार नाही. परिणामी, संपूर्ण जागतिक पुरवठा साखळी कोलमडून पडेल आणि जग एका आर्थिक मंदीच्या आणि विनाशाच्या गर्तेत लोटले जाईल.

---

डॉ. सचिन मांडवगणे

# शेतीवरील ब्राउन बायोरिफायनरी

**शेती विज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर शेतातून बाहेर पडणारे उत्पादन केवळ पीकएवढेच नसते. प्रत्येक पिकासोबत मोठ्या प्रमाणात काड, पेंढा, पाचट, खोड आणि इतर अवशेष निर्माण होत असतात. हीच तपकिरी जैवसंपत्ती भविष्यातील बायोरिफायनरीची कच्ची सामग्री ठरणार आहे.**

हरित क्रांतीने देशाला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनवले, तर श्वेत क्रांतीने दूध उत्पादनाला उद्योगाचे स्वरूप देत ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली. आज शेतीसमोर उभी असलेली पुढील मोठी संधी म्हणजे 'ब्राउन रिव्होल्यूशन', शेतात निर्माण होणाऱ्या कृषी अवशेषांचे मूल्यवर्धन करून संपत्ती निर्माण करण्याची क्रांती. आपण आजपर्यंत शेतीची उत्पादकता मुख्यतः विक्रीयोग्य उत्पादनाच्या आधारावर मोजत आलो आहोत. परंतु शेतातून तयार होणाऱ्या काड, पेंढा, पाचट, खोड, पाने आणि इतर जैवभाकडे केवळ कचरा किंवा समस्या म्हणून पाहिले गेले. मात्र विज्ञानाच्या दृष्टीने हे अवशेष म्हणजे कार्बन, ऊर्जा, पोषकद्रव्ये आणि जैवरसायनांचा प्रचंड साठा आहे. याच साठ्याचे मूल्यवर्धन करणारी संकल्पना म्हणजे ऑन फार्म ब्राउन बायोरिफायनरी.

प्रत्येक पिकासोबत मोठ्या प्रमाणात काड, पेंढा, पाचट, खोड आणि इतर अवशेष निर्माण होत असतात. हीच तपकिरी जैवसंपत्ती भविष्यातील बायोरिफायनरीची कच्ची सामग्री ठरणार आहे. विविध पिकांमध्ये धान्य किंवा आर्थिक उत्पादन आणि त्यापासून निर्माण होणारा काडी कचरा यांचे गुणोत्तर साधारणपणे ०.७ ते १.४ दरम्यान असते. म्हणजेच एका टन मुख्य उत्पादनासोबत जवळपास तेवढ्याच प्रमाणात किंवा काही वेळा त्याहून अधिक जैवभार तयार होतो. उदाहरणार्थ, एका एकर भात शेतीतून सुमारे २ टन पेंढा तयार होतो. कापूस पिकातून सुमारे १ टन पऱ्हाटी आणि तूर पिकातून साधारण १ टन तुहाटी मिळते. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्रात प्रत्येक हंगामात लाखो टन कृषी अवशेष निर्माण होतात. त्यासाठी स्वतंत्र जमीन, अतिरिक्त पाणी किंवा स्वतंत्र उत्पादन खर्च लागत नाही. तो मुख्य उत्पादनासोबत नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणाऱ्या या घटकाकडे दुसरे उत्पादन म्हणून पाहण्याची गरज आहे. आजपर्यंत आपण पहिल्या उत्पादनाचे मूल्यांकन केले. आता दुसऱ्या उत्पादनाचे मूल्य ओळखण्याची वेळ आली आहे.

### तपकिरी जैवसंपत्ती

भारतातील बहुतांश लहान व अल्पभूधारक शेतकरी पीक निवडताना बाजारातील अनिश्चिततेपेक्षा हमीभावाला अधिक महत्त्व देतात. त्यामुळे भात, गहू, तूर, हरभरा, मका, कापूस आणि इतर किमान आधारभूत किंमत असलेली पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. 'एमएसपी'मुळे शेतकऱ्यांना मुख्य उत्पादनासाठी




**कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर : मूल्यवर्धनातील मोठा अडथळा**

- तपकिरी जैवसंपत्तीचे मूल्यवर्धन करताना सर्वात मोठा अडथळा म्हणजे तिचे उच्च कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर. कृषी अवशेषांमध्ये कार्बनचे प्रमाण जास्त आणि नायट्रोजनचे प्रमाण अत्यल्प असते. अनेक पिकांच्या अवशेषांमध्ये कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर ५०:१ ते १००:१ किंवा त्याहून अधिक असू शकते.
- मातीतील सूक्ष्मजीवांना कोणताही सेंद्रिय पदार्थ विघटित करण्यासाठी कार्बनबरोबर नायट्रोजनचीही आवश्यकता असते. जेव्हा कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर खूप जास्त असते, तेव्हा सूक्ष्मजीवांना आवश्यक नायट्रोजन उपलब्ध होत नाही. परिणामी, विघटन प्रक्रिया मंदावते आणि अवशेष दीर्घकाळ तसेच पडून राहतात. यामुळे अनेक व्यावहारिक समस्या निर्माण होतात. शेतातील काड-कचरा लवकर कुजत नाही, पुढील पेरणीस अडथळा निर्माण होतो, पोषकद्रव्यांचे पुनर्चक्रण मंदावते आणि अनेकदा शेतकरी अवशेष जाळण्याचा मार्ग स्वीकारतो.
- जाळल्यामुळे कार्बन वातावरणात सोडला जातो, सेंद्रिय पदार्थांचे नुकसान होते, उपयुक्त सूक्ष्मजीव नष्ट होतात आणि वायू प्रदूषण वाढते. म्हणजेच समस्या अवशेषांच्या उपलब्धतेची नसून त्यांच्या रचनेची आहे. म्हणूनच ब्राउन बायोरिफायनरीची पहिली पायरी म्हणजे कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर कमी करणे. एकदा हे गुणोत्तर २० च्या खाली आले की जैवभार अधिक जैवसक्रिय बनतो आणि त्यापासून चारा, जैववायू, कंपोस्ट, जैवखते आणि इतर मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याचे अनेक मार्ग खुले होतात. याच टप्प्यापासून कृषी अवशेषांचा प्रवास कचऱ्यापासून संसाधनाकडे सुरू होतो.

आर्थिक सुरक्षितता मिळते. मात्र या व्यवस्थेतील एक महत्त्वाचा पैलू अनेकदा दुर्लक्षित राहतो. ज्या पिकांना 'एमएसपी'चा आधार आहे, त्याच पिकांमधून मोठ्या प्रमाणात तपकिरी कृषी अवशेषही निर्माण होतात. भातासोबत पेंढा, गव्हासोबत पेंढा, कापसासोबत खोड, तुरीसोबत काड, मक्यासोबत देठ आणि कणसाचे अवशेष उपलब्ध होतात. म्हणजेच एमएसपी असलेली पिके केवळ अन्नधान्य किंवा नगदी उत्पादनच देत नाहीत, तर बायोरिफायनरीसाठी आवश्यक कच्चा मालही निर्माण करता सुरक्षा करतात. आज एमएसपी ही मुख्य उत्पादनासाठीची आर्थिक सुरक्षा आहे. उद्याच्या काळात ब्राऊन बायोरिफायनरी या अवशेषांचे मूल्यवर्धन करून त्याच पिकातून दुसरा उत्पन्न स्त्रोत निर्माण करू शकते. विशेषतः लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ही संकल्पना अधिक महत्त्वाची आहे. त्यांच्याकडे अतिरिक्त जमीन नसते, नवीन उद्योग उभारण्यासाठी मोठी गुंतवणूक नसते आणि जोखीम घेण्याची क्षमता मर्यादित असते. अशा परिस्थितीत आधीपासूनच शेतात निर्माण होणाऱ्या अवशेषांमधून अतिरिक्त उत्पन्न मिळणे ही आर्थिकदृष्ट्या अत्यंत आकर्षक संधी ठरू शकते. हरित क्रांतीने शेतकऱ्यांना उत्पादन दिले, 'एमएसपी'ने बाजारातील आधार दिला. आता ब्राऊन बायोरिफायनरी शेतकऱ्यांना तिसरा आधार देऊ शकते. तंत्रज्ञानाच्या चर्चेतून एक गोष्ट स्पष्ट होते, की भारतात तपकिरी जैवसंपत्तीची कमतरता नाही. उलट प्रत्येक हंगामात शेतातून लाखो टन जैवभार निर्माण होतो. या जैवसंपत्तीमागे शेतकऱ्यांची जमीन, पाणी, श्रम आणि वेळ गुंतलेला असतो. मात्र त्यातील मोठा भाग आजही आर्थिक मूल्यसाखळीच्या बाहेर राहतो. दुसरीकडे, या जैवसंपत्तीमध्ये सेल्युलोज, हेमिसेल्युलोज आणि लिग्निन यांच्या स्वरूपात प्रचंड कार्बन व ऊर्जा साठलेली असते. परंतु उच्च कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर आणि गुंतागुंतीची रचना यामुळे हे संसाधन एका कुलूपबंद पेटीसारखे बनते. संपत्ती आत आहे, पण तिच्यापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.

प्रफुल्ल दाढे
आदित्य पोटोडे

शेतीतील पुढील आर्थिक क्रांती उत्पादन वाढविण्यात नसून, आधीपासून निर्माण होत असलेल्या या जैवसंपत्तीचे मूल्य ओळखण्यात आहे. ज्या प्रकारे हरित क्रांतीने धान्याला आणि श्वेत क्रांतीने दुधाला आर्थिक मूल्यसाखळी दिली, त्याच प्रकारे तपकिरी जैवसंपत्तीला मूल्यसाखळी मिळाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी नवीन संधी निर्माण होऊ शकतात. कृषी अवशेषांना कचऱ्यापासून कच्च्या मालात आणि कच्च्या मालापासून मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये रूपांतरित करण्यासाठी विज्ञानाने अनेक मार्ग विकसित केले आहेत. पुढील भागात तपकिरी जैवसंपत्तीच्या मूल्यवर्धना साठी उपलब्ध असलेल्या यांत्रिक, उष्णता रासायनिक आणि जैविक या तीन प्रमुख मार्गांचा आढावा घेऊ. तसेच कृषी अवशेषांचे कार्बन-नायट्रोजन गुणोत्तर कमी करून त्यांना चारा, जैववायू, जैवखते आणि इतर मूल्यवर्धित उत्पादनांसाठी उपयुक्त बनविणाऱ्या तंत्रज्ञानांची माहिती करून घेणार आहोत. शेतातील काड, पेंढा आणि पाचट हे प्रत्यक्षात उत्पन्नाच्या नव्या स्त्रोतामध्ये कसे रूपांतरित होऊ शकतात, याची चर्चा पुढील भागात करू. कारण शेतातून मिळणारे उत्पन्न हेच अंतिम उत्पादन नसते. उत्पन्नापलीकडेही उत्पादन असते.

### तपकिरी जैवसंपत्तीची रचना

- शेतात निर्माण होणारा काड, पेंढा, पाचट किंवा खोड याकडे वरवर पाहता साध्या सेंद्रिय पदार्थाप्रमाणे पाहिले जाते. मात्र सूक्ष्म पातळीवर त्याची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते. म्हणूनच हा जैवभार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असूनही त्याचे मूल्यवर्धन सहजपणे होत नाही.
- बहुतेक कृषी अवशेष हे लिग्नोसेल्युलोसिक स्वरूपाचे असतात. त्यांच्या रचनेत मुख्यतः सेल्युलोज, हेमिसेल्युलोज आणि लिग्निन हे तीन घटक असतात. सेल्युलोज हा वनस्पतींच्या पेशीभित्तीचा मुख्य सांगाडा असतो. तो ग्लुकोजच्या लांब साखळ्यांनी बनलेला असून जैवभारातील सर्वाधिक प्रमाणात आढळणारा घटक आहे. अनेक कृषी अवशेषांमध्ये त्याचे प्रमाण ३० ते ५० टक्क्यांपर्यंत असू शकते. जैवइंधन, जैवरसायने आणि जैवआधारित पदार्थांच्या निर्मितीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा कच्चा माल आहे. हेमिसेल्युलोज हा दुसरा महत्त्वाचा घटक आहे. विविध प्रकारच्या शर्करांनी बनलेला हा घटक औद्योगिक प्रक्रियेद्वारे अनेक मूल्यवर्धित रसायनांचा स्त्रोत ठरू शकतो. या दोन्ही घटकांना वेढून ठेवणारा तिसरा घटक म्हणजे लिग्निन. वनस्पतींना मजबुती, कणखरपणा आणि नैसर्गिक संरक्षण देण्याचे काम तो करतो. म्हणूनच ऊस पाचट, कापसाचे खोड किंवा तुरीचे काड नैसर्गिकरीत्या विघटित होण्यासाठी बराच कालावधी लागतो.
- एक प्रकारे पाहिले तर सेल्युलोज आणि हेमिसेल्युलोज हे संपत्तीचे स्त्रोत आहेत, तर लिग्निन त्या संपत्तीभोवतीचे संरक्षण कवच आहे. या कवचामुळेच जैवभाराचा त्वरित उपयोग करता येत नाही.

९०२८३ ८६७९८
९८३४९ ०२३५०
swaha@vnit.ac.in
(लेखक स्वाहा सेंटर ऑफ एक्सलन्स, विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था

---

## 'लाचारपणा'चा कळस !

राज्यात उन्हाचा तडाखा जरी कमी झाला असला तरी, राज्याच्या राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषद निवडणुकीचे राजकारण मात्र चांगलेच तापले आहे. १७ जागांसाठी होत असलेली ही निवडणूक 'बिनविरोध' आणि 'घोडेबाजार' या मुद्यांवरुन मात्र चांगलीच चर्चेत आली आहे. सत्ताधारी 'महायुती'ने साम-दाम-दंड- भेद आणि घोडेबाजार या पंचसूत्रीचा वापर करत, आतापर्यंत ६ जागा 'बिनविरोध' म्हणून पदरात पाडून घेतल्या आहेत. अमरावतीच्या जागेसाठीही तसे प्रयत्न चालू आहेत, असो.

या निवडणुकीत सर्वात जास्त 'हायलाईट' झाले ते नाशिक आणि जळगाव मतदार संघ. नाशिकची जागा शिवसेनेसाठी सोडण्यात आली होती. नरेंद्र दराडे हे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार आहेत. परंतु, भाजपच्या बंडखोर कैलास गितेंनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरून बंडखोरीचे निशाण फडकवले आहे. त्यांनी माघार घ्यावी, म्हणून मंत्री सावंत आणि गिरीश महाजन आठवडाभर नाशकात तळ ठोकून आहेत. पण, गितेंच्या 'नाकदु-या' काढण्यात त्यांना अजूनही यश आले नाही. शेवटी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यासाठी दिल्ली दरबारी धाव घ्यावी लागली.

निवडणूक आहे, संविधान आणि लोकशाही विचारात घेता, कोणालाही निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. उमेदवाराने स्वइच्छेने माघार घेतली तर ठीक. पण, आपल्या उमेदवारासाठी दोन मंत्र्यांनी आठ दिवस नाशकात तळ ठोकणे आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिल्ली दौरा करणे, हा किळसवाणा 'लाचारपणा' तर आहेच, पण, लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. निवडणूक आहे, ती होऊ द्या. जो निवडून यायचा तो निवडून येईल. तुम्ही मतदारांचा हक्क का हिरावून घेता? समजा आज गोकुळ गितेंनी 'घोडेबाजार' करत, माघार घेतली. उद्या ते गद्दारी करणार नाही, याची काय गॅरंटी?

केवळ आपल्या स्वार्थासाठी दोन मंत्र्यांनी आणि एका उपमुख्यमंत्र्याने इतके लाचार व्हावे, हा लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थेचा घोर अपमान आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**प्रदीप व्ही. खोलमकर**, नाशिक.
मो-८७६७५९२९८०

## ही तर 'मध्यप्रदेश' पॅटर्नची पुनरावृत्ती?

मध्यप्रदेशसारखीच गंभीर आणि आत्मघातकी स्थिती सध्या महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने अमरावती विधान परिषद निवडणुकी दरम्यान पाहायला मिळत आहे. स्थानिक पातळीवर सक्षम नेतृत्व आणि इच्छुक उमेदवार उपलब्ध असताना, स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना पायदळी तुडवून नागपूर येथील नेत्याला अमरावतीतून तिकीट देण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे, सदर उमेदवार सध्या प्रकृती अस्वास्थामुळे रुग्णालयात दाखल असल्याचे सांगण्यात येत आहे.

एका बाजूला आजारी उमेदवार आणि दुसऱ्या बाजूला स्थानिक नेत्यांची उपेक्षा, यामुळे पक्षांतर्गत असंतोषाचा स्फोट झाला आहे. तिवसा मतदारसंघातील माजी आमदारांनी या उमेदवारीवर अत्यंत गंभीर आणि खळबळजनक आरोप केले आहेत.

यासंदर्भात प्रदेशाध्यक्षांकडे रीतसर तक्रारही करण्यात आली आहे. जेव्हा स्वतःच्याच पक्षाचे नेते उमेदवाराच्या गुणवत्तेवर आणि हेतूवर जाहीरपणे संशय व्यक्त करतात, तेव्हा पक्षाची उरलीसुरली विश्वासार्हताही धोक्यात येते. काँग्रेसच्या या धोरणात्मक कमजोरीचा दुसरा अंक मध्यप्रदेशात आमदारांच्या पळवापळवीवरून पाहायला मिळाला. आपल्याच आमदारांवर विश्वास नसल्यामुळे त्यांना भोपाळवरून थेट बंगळुरूला हलवण्याची काँग्रेसची कृती त्यांच्या अंतर्गत असुरक्षिततेचे जाहीर प्रदर्शन करते.

एक मूलभूत प्रश्न नेहमी उपस्थित होतो, ज्या राजकीय पक्षाला आपल्याच आमदारांना स्वतःच्या राज्यात सुरक्षित ठेवता येत नाही, तो पक्ष लोकशाहीच्या आणि विचारसरणीच्या मोठ्या लढाईत विरोधकांसमोर सक्षमपणे उभा कसा राहणार? आपले लोकप्रतिनिधी टिकवून ठेवण्यासाठी 'रिसॉर्ट पॉलिटिक्स'चा आसरा घ्यावा लागणे, ही पक्षाची नैतिक पीछेहाट दर्शवते. विरोधकांच्या आक्रमक खेळींना तोंड देण्याऐवजी स्वतःचे घर सांभाळण्यातच पक्षाची संपूर्ण शक्ती खर्च होत आहे.

अमरावतीमध्ये उमेदवारावर पक्षांतर्गत नेत्यांनीच ठेवलेला भ्रष्टाचाराचा ठपका आणि मध्य प्रदेशातील ढिसाळ नियोजन, या दोन्ही घटना एकाच मोठ्या आजाराची लक्षणे आहे. 'केंद्रीय आणि प्रदेश नेतृत्वाचा स्थानिक वास्तवाशी तुटलेला संपर्क'. जोपर्यंत काँग्रेस पक्ष तिकीट वाटपात पारदर्शकता आणत नाही, 'हाय कमांड'च्या नावाखाली लादले जाणारे निर्णय थांबवत नाही आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या मनगटातील ताकदीवर विश्वास ठेवत नाही, तोपर्यंत अशी राजकीय दुरवस्था, नाचक्की आणि अंतर्गत बंडखोरी थांबवणे अशक्य आहे. आगामी निवडणुका जिंकण्यापूर्वी काँग्रेसला आधी स्वतःच्या अंतर्गत व्यवस्थापनाची निवडणूक जिंकावी लागेल, हेच या घडामोडींवरून स्पष्ट होते.

**अविनाश देशपांडे**

## 'ॲमेझॉन'च्या खोडकरपणा !

हिंदू देवता आणि श्रद्धास्थाने यांना नेहमीच गृहीत धरून त्यांचा अवमान करणाऱ्या 'ॲमेझॉन' या ऑनलाईन वस्तूंची विक्री करणाऱ्या संकेतस्थळाने पुन्हा एकदा भारतीयांना डिवचण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले आहे.

शून्याचा शोध लावून साऱ्या जगाला महान अशी देणगी देणाऱ्या थोर विभूती आर्यभट्टांचा आपल्या जाहिरातीसाठी अवमानकारकरित्या वापर करून अमेझॉनने पुन्हा एकदा भारतीयांचा रोष ओढवून घेतला आहे. ॲमेझॉनच्या एका जाहिरातीत महान भारतीय गणिततज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट आधुनिक युगात पुन्हा अवतरित झालेले दाखवण्यात आलेले आहेत. त्यांना पाहून लहान मुले त्यांना 'कोण आहेस तू, चाचा कोणते साहित्य आणले आहेस?' असे विचारताना दाखवले आहे. मानवाच्या दृष्टीने शून्याचे महत्व कसे हे पाहण्यासाठी आर्यभट्ट अत्यंत व्याकुळ झालेले या जाहिरातीत दाखवण्यात आले आहेत.

आर्यभट्ट यांच्या शून्याच्या शोधाचा संबंध ॲमेझॉनने त्यांच्या 'झिरो डिलिव्हरी फी', 'झिरो सर्च फ्री' आणि 'झिरो हँडलिंग फी' या योजनांशी जोडला आहे. थोडक्यात ॲमेझॉनने आपल्या योजनांची जाहिरात करण्यासाठी महान गणिततज्ञ आर्यभट्टांचा कार्टूनसारखा वापर केला आहे.

यापूर्वीही ॲमेझॉनच्या संकेतस्थळावर हिंदू देवतांचे चित्र असलेल्या पायपुसण्या आणि टॉयलेट सीट्स विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. आता तर थेट आर्यभट्टांचा वापर आपल्या व्यवसायवृद्धीसाठी अवमानकारकरित्या करण्याचा घृणास्पद प्रकार ॲमेझॉनने केला आहे.


**मोक्षदा घाणेकर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# स्ट्रेचर नसल्याने जखमी महिलेला उचलून नेण्याची वेळ..!

**यवतमाळ, दि. ११ : यवतमाळ जिल्ह्यातील प्रमुख शासकीय आरोग्य केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील एका धक्कादायक घटनेने आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या छायाचित्र आणि व्हिडिओमध्ये पायाला गंभीर दुखापत झालेल्या एका महिलेला तिच्या नातेवाईकाने हातावर काखेत उचलून रुग्णालय परिसरात ने-आण करत असल्याचे दिसून येत आहे.**

## वसंतराव नाईक रुग्णालयाची व्यवस्था कोमात?



रुग्णालयात स्ट्रेचर, व्हीलचेअर, रुग्ण सहाय्यक कर्मचारी आणि सुरक्षा यंत्रणा उपलब्ध असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असताना प्रत्यक्षात जखमी महिलेला अशा अवस्थेत उचलून नेण्याची वेळ का आली, हा प्रश्न नागरिक विचारत आहेत. जिल्हाभरातून उपचारासाठी दररोज शेकडो रुग्ण येथे दाखल होत असताना मूलभूत सुविधांचा अभाव दिसून येणे ही अत्यंत चिंताजनक बाब मानली जात आहे. रुग्ण व नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, वेळेवर स्ट्रेचर किंवा व्हीलचेअर उपलब्ध न झाल्याने अनेकदा रुग्णांना स्वतःच्या जबाबदारीवर विविध विभाग फिरवावे लागते. विशेषतः वृद्ध, महिला व गंभीर रुग्णांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे. संबंधित प्रकाराची माहिती प्रशासनाला यापूर्वीही देण्यात आल्याचा दावा होत असला तरी परिस्थितीत कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाकडून आरोग्य सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. मग रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच जखमी महिलेला उचलून नेण्याची वेळ का यावी? रुग्ण सहाय्यक कर्मचारी कुठे होते? उपलब्ध सुविधांचा लाभ रुग्णांपर्यंत का पोहोचला नाही? अशा प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक झाले आहे. या घटनेची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच रुग्णांना तत्काळ स्ट्रेचर, व्हीलचेअर व सहाय्यक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशी जोरदार मागणी नागरिक व रुग्णांच्या नातेवाईकांकडून होत आहे. ही घटना केवळ एका महिलेची नाही, तर जिल्ह्यातील शासकीय आरोग्य व्यवस्थेच्या संवेदनशीलतेची आणि उत्तरदायित्वाची कठोर परीक्षा ठरत आहे.

# ढाणकीत गॅस सिलेंडर स्फोटाने भीषण अग्नितांडव..!

## अग्निशामक यंत्रणा कागदावरच, नागरिकांचा संताप!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**ढाणकी, दि. ११ :** ढाणकी शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत शेख आलम शेख हुसेन यांचे घर पूर्णतः जळून खाक झाले. मंगळवारी (१० जून) सायंकाळी साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांवर आलेल्या विवाह सोहळ्यासाठी घरात साठवून ठेवलेले साहित्यही आगीत भस्मसात झाल्याने कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पीडित कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, या घटनेने ढाणकी नगरपंचायतीच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नगरपंचायतीकडे अग्निशामक वाहन उपलब्ध असतानाही ते घटनास्थळी पोहोचले नाही. आग विझविण्यासाठी उमरखेड येथून अग्निशामक दलाला पाचारण करावे लागले. स्थानिक अग्निशामक वाहनासाठी आवश्यक कर्मचारी नियुक्त नसल्याची माहिती समोर आली असून, नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, याच दिवशी दुपारी शहरातील पॉप्युलर जनरल स्टोअर्स आणि लगतच्या गोदामालाही आग लागली होती. ती आग स्थानिक नागरिकांनीच प्रयत्न करून आटोक्यात आणली. एका दिवसात दोन आगीच्या घटना घडूनही प्रशासनाची तयारी अपुरी असल्याचे स्पष्ट झाले आहे. कराच्या रूपाने नागरिकांकडून महसूल गोळा करणाऱ्या नगरपंचायतीने आता तरी अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करून भविष्यातील संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# डॉ. प्रियांका गायकवाड यांना आंतरराष्ट्रीय आऊटस्टँडिंग वुमन सायंटिस्ट अवॉर्ड २०२६ प्रदान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**पुसद, दि. ११ :** फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथील गणित विभागाच्या सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक डॉ. प्रियांका बी. गायकवाड यांना बँकॉक (थायलंड) येथे आयोजित १० व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रतिष्ठेचा 'Outstanding Women Scientist Award २०२६' प्रदान करण्यात आला. पर्यावरण, गणित व शाश्वत विकास क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधन व योगदानाची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.

दि. ५ ते ८ जून २०२६ दरम्यान एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (AIT), बँकॉक येथे आयोजित "Climate Smart Natural Resources Management for Sustainable Agriculture and Allied Sciences" या आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध देशांतील शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. यावेळी डॉ. गायकवाड यांनी तांत्रिक सत्राच्या अध्यक्ष (Session Chair) म्हणूनही जबाबदारी पार पाडली. पुरस्कार वितरण समारंभात विविध देशांतील नामवंत शास्त्रज्ञांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्यांच्या या यशामुळे फुलसिंग नाईक महाविद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जय नाईक, मार्गदर्शक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद वावरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. व्ही. एन. कांबळे, सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# आरक्षणाच्या तोंडावर चातारीत 'पाण्याचे राजकारण'?

## कालव्याचे पाणी गावात घुसल्याने संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ११ :** मान्सून अद्याप दाखल झालेला नसताना आणि परिसरात कोणताही मोठा पाऊस न पडता चातारी गावात अचानक कालव्याचे पाणी शिरल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पाटबंधारे विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार अज्ञात व्यक्तीने कालव्याचे गेट उघडल्याने मोठ्या प्रमाणात पाणी तळ्यात व त्यानंतर गावाच्या काही भागात पोहोचले.

झोपडपट्टीसह काही घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. विशेष म्हणजे, नदीकाठावर वसलेल्या चातारी गावात पिण्याच्या पाण्याची समस्या कायम असताना अचानक आलेल्या या पाण्यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे. गावातील उंचवडद पांदण, खरूस पांदण व साखरापांदण परिसरातील पावसाचे पाणी दरवर्षी मुख्य रस्त्यालगतच्या ७० ते ९० घरांमध्ये शिरते. अनेक तक्रारी करूनही या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नाही. दरवर्षी पूरग्रस्तांना मिळणाऱ्या मदतीभोवती राजकारण रंगत असल्याचीही ग्रामस्थांची भावना आहे. यंदा ग्रामपंचायत निवडणूक व आरक्षण प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी कोणी आणि का सोडले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ग्रामस्थांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, पिण्याच्या पाण्यासह पूरप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## थोडक्यात




### फुलसावंगी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती

**फुलसावंगी :** भारतीय जनता पार्टी फुलसावंगी मंडळाच्या वतीने आज दिनांक १० जून २०२६ रोजी सांयकाळी ६.०० वाजता येथील श्री संत साधू महाराज मंदिरात भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी सलग सर्वाधिक काळ (४३९९ दिवस) देशाची सेवा करणारे पंतप्रधान म्हणून विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल त्यांच्या दीर्घायुष्य,उत्तम आरोग्य व निरंतर राष्ट्रसेवेसाठी विशेष पूजा-अर्चना व महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच त्यांच्या उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.पूजा-अर्चना व महाआरतीनंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष योगेश वाजपेयी,प्रमोद शेळके,डॉ.गजानन वैद्य,प्रवीण जिल्हावार,तानाजी शिंदे,गजानन शिंदे,आशिष शर्मा,गणेश भगत,आनंद वीर,प्रमोद महाजन,नथू पराते,संदीप शेळके,जांबुवता आडे,रमेश पाचखंडे,अरविंद राठोड,सुमित वैद्य,निशांत पराते,राहुल कुकडे,आकाश कवाने,अभय जांबुतकर,अर्जुन बागडे,चेतन जाधव,मोहन गोभेकर हे उपस्थित होते.

### सहस्त्रकुंड येथील कुंडात पडून महिलेचा मृत्यू

**ढाणकी, दि. ११ :** येथील महिला गं.भा. सुमन प्रभाकर अलकटवार यांचा



दि. १० जून रोजी सहस्त्रकुंड येथील कुंडात पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सूत्रांच्या माहितीनुसार, सहस्त्रकुंड येथील मंदिरात देवाला धोंडे वाहण्याकरिता त्या गेल्या होत्या. शहरातील प्रतिष्ठित नागरिक लक्ष्मण अलकटवार, गजानन, बालाजी आणि आनंद अलकटवार यांच्या त्या मातोश्री होतं. अंगणवाडी सेविका म्हणून अत्यंत चोख कर्तव्य बजावत त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या.

### मुकुटबन येथे उष्माघाताने सलून कर्मचाऱ्याचा मृत्यू..!

**झरी , दि. ११ :** तालुक्यातील मुकुटबन–वणी मार्गावरील एका बारसमोर



रस्त्याच्या कडेला पळसाच्या झाडाखाली एका युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार उष्माघातामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.मृत युवकाचे नाव प्रकाश पेंदोर (वय ४५, रा. खडकी) असे असून, ही घटना बुधवारी दुपारी सुमारे अडीच वाजताच्या दरम्यान उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच संबंधित नातेवाईकांना कळविण्यात आले. प्रकाश पेंदोर हे मुकुटबन येथे एका सलूनच्या दुकानात काम करत होते. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. घटनेची माहिती मुकुटबन पोलीस ठाण्यात देण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी वणी येथील रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असले तरी, सध्या उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# फेरीवाला कायदा लागू न करता अतिक्रमण हटाव अन्यायकारक..!

## मोहीम थांबवा, अन्यथा महाविकास आघाडीचा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ११ :** पथ विक्रेत्यांचे हक्क संरक्षित करणारा फेरीवाला (पथ विक्रेता) कायदा २०१४ पूर्णपणे अमलात न आणता राबविण्यात येत असलेली अतिक्रमण हटाव मोहीम तात्काळ स्थगित करावी, अशी ठाम मागणी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यासंदर्भात गुरुवारी (दि. ११ जून) उपविभागीय अधिकारी तसेच पुसद नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी सांगितले की, शहरातील हातगाडीधारक, फेरीवाले, फळ-भाजी विक्रेते आणि लघु व्यावसायिक यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे निर्माण झाला आहे. केंद्र शासनाच्या कायद्यानुसार टाउन व्हेंडिंग कमिटीची स्थापना, पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण, नोंदणी, ओळखपत्रांचे वितरण आणि विक्री क्षेत्रांचे नियोजन ही प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. या सर्व प्रक्रिया अपूर्ण असताना विक्रेत्यांना हटविणे हे कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणारे असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रशासनाने सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून न्याय्य, पारदर्शक व सर्वसमावेशक धोरण आखावे, अशी मागणीही करण्यात आली. निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नगरसेवक ॲड. भारत जाधव, शिवसेनेचे मोहन विश्वकर्मा, सय्यद इस्तियाक, नगरसेवक ॲड. वसीम अहमद, झिया शेख, विजय बाबर, तहेसीन खान, गाझी उसामा, फिरोज खान, प्रकाश नेमायते यांच्यासह फळ-भाजी विक्रेते व रास्ता किरकोळ विक्रेता संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# यवतमाळ विधान परिषद प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा..!

## शिफारस करणाऱ्यांवरही कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** यवतमाळ-वर्धा-चंद्रपूर विधान परिषद निवडणुकीतील घडामोडींची उच्चस्तरीय चौकशी करून केवळ उमेदवारावर नव्हे तर त्यांची शिफारस करणाऱ्या नेते व पदाधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी नई परवाज मूव्हमेंट (विदर्भ) चे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेस कार्यकर्ते मोहम्मद आसिम अली यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांना सविस्तर पत्र पाठविले आहे.

काँग्रेसचे अधिकृत उमेदवार साहेबराव कामरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या असून उमेदवार निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. उमेदवारी कोणी दिली, शिफारस कोणी केली आणि नाव पक्ष नेतृत्वाकडे कोणी पाठवले, याचीही चौकशी करून संबंधितांची नावे जाहीर करावीत, अशी मागणी त्यांनी केली. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर संघटनात्मक कारवाई करावी, अन्यथा अशा घटना पुन्हा घडतील, असा इशाराही त्यांनी दिला. पक्षात पारदर्शकता,जबाबदारी व उत्तरदायित्व वाढवून नव्या नेतृत्वाला संधी देण्याची गरज असल्याचे सांगत, प्रामाणिक कार्यकर्त्यांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमण्याची मागणी त्यांनी केली. "काँग्रेस वाचवा, कार्यकर्त्यांचा सन्मान करा," असे आवाहनही त्यांनी केले.

# अतिक्रमण हटावावरून नगराध्यक्षा-काँग्रेस आमनेसामने..!

## दुजाभाव थांबवा, अन्यथा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेत लहान व्यावसायिक, टपरीधारक, हातगाडी चालक व फेरीवाल्यांवर होत असलेल्या कारवाईच्या विरोधात शहर काँग्रेस कमिटीने गुरुवारी नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरले. प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने उपमुख्याधिकारी राकेश भोयर यांना निवेदन देऊन पुनर्वसनाशिवाय कारवाई थांबविण्याची मागणी केली.

यानंतर नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्या दालनात झालेल्या भेटीत शाब्दिक चकमक उडाली. "ही खुर्ची जनतेची असून नागरिकांच्या प्रश्नांसाठी आम्हाला येण्याचा पूर्ण अधिकार आहे," असे प्रत्युत्तर देत देशमुख यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेसने अतिक्रमण हटाव मोहिमेत गरीबांवर कारवाई होत असताना प्रभावशाली व्यक्तींची अनधिकृत होर्डिंग्ज व बांधकामांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. मोहीम पावसाळाभर सुरू राहणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. दुजाभाव कायम राहिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रेसने दिला.

# रामनगर (तांडा) व पारधी (बेडा) येथे ११ दिवसांपासून अंधार..!

## ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. ११ :** तालुक्यातील घोटी ग्रामपंचायत अंतर्गत रामनगर (तांडा) व पारधी (बेडा) येथील वीज वितरणाचा ट्रान्सफॉर्मर जळाल्याने मागील ११ दिवसांपासून दोन्ही वस्त्यांचा वीजपुरवठा खंडित आहे. दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून पिण्याच्या पाण्याची टंचाईही निर्माण झाली आहे.

वीजपुरवठा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून शेतकरी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ग्रामस्थांनी अनेकदा महावितरणकडे तक्रारी करूनही ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती अथवा बदलण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप केला आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी उपकार्यकारी अभियंता, घाटंजी यांना निवेदन देत तातडीने नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे. तसेच लवकरात लवकर दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेची नवी धुरा..!

## विजयानंद भुतडा अध्यक्ष, डॉ. दिनेश चांडक सचिव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ११ :** यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेच्या २०२६ ते २०२९ या कालावधीसाठीच्या नव्या जिल्हा कार्यकारिणीची घोषणा उमरखेड येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. सेठ गो.से. सारडा राजस्थानी भवन येथे झालेल्या सभेत सर्व पदांसाठी एकमेव नामांकन प्राप्त झाल्याने संपूर्ण कार्यकारिणीची निर्विरोध निवड झाली.

अध्यक्षपदी विजयानंद भुतडा तर सचिवपदी डॉ. दिनेश चांडक यांची निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी निवर्तमान अध्यक्ष मनोहरलाल लड्ढा होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रशांत मोदानी उपस्थित होते. प्रदेश माहेश्वरी संघटनेचे सचिव अजय मोदानी, निवडणूक अधिकारी अरुण अटल, ॲड. श्याम भट्टड, मनोज माहेश्वरी व विनोद तेला यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन व महेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी दिनेश लड्ढा (दिग्रस), कोषाध्यक्षपदी सतीश भंडारी (पुसद), प्रचार-प्रसार मंत्रीपदी राजेश माहेश्वरी, सहसचिवपदी प्रीतम राठी आणि संघटन मंत्रीपदी संजय मंत्री यांची निवड झाली. यावेळी जिल्ह्यातील यवतमाळ, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड व बाभूळगाव येथील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप भट्टड यांनी तर आभार प्रदर्शन गोपाल भराडे यांनी केले.

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/५२५/२०२६**
**तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड**
**दिनांक:- २९/०५/२०२६**

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद तहजीर सय्यद हमीद रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दि-१४/०५/१९७४ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/ हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १५.०६.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावयात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# मुरमा अभावी पांदन रस्त्याची कामे ठप्प

## पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर पांदण रस्त्यांच्या कामांना वेगात सुरुवात झाली होती. मात्र, गेल्या १५ दिवसांपासून मुरूम उपलब्ध नसल्याने ही सर्व कामे अचानक ठप्प झाली आहेत. पावसाळा उंबरठ्यावर असताना कामे अर्धवट राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, प्रशासनाने तात्काळ मुरमाची व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

तालुक्यातील अनेक पांदण रस्त्यांचे मातीकाम पूर्ण झाले आहे. रस्ता तयार करण्यासाठी आता त्यावर मुरुम टाकणे आवश्यक आहे. परंतु, गेल्या पंधरा दिवसांपासून मुरमाचे 'पास' (परवाने) मिळत नसल्याने कंत्राटदार आणि प्रशासनापुढे पेच निर्माण झाला आहे. मुरुम न टाकल्यास झालेल्या



मातीकामाचा पावसात चिखल होऊन रस्ता पूर्णपणे निकामी होण्याची भीती आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतात येण्या-जाण्यासाठी मोठा मनस्ताप सहन करावा लागणार आहे. 'मुरमाचे पास का मिळत नाहीत?' असा सवाल आता शेतकरी विचारत आहेत. वेळेत कामे पूर्ण न झाल्यास पावसाळ्यात पेरणी आणि इतर शेतीकामांसाठी बैलगाड्या किंवा ट्रॅक्टर नेणे अशक्य होईल. ही परिस्थिती लक्षात घेता शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ मुरमाची उपलब्धता करून द्यावी, अशी मागणी शेतकरी युवराज पवार व इतर शेतकऱ्यांनी केली आहे.या मागणीसाठी युवराज पवार यांच्यासह चरणदास बारब्दे, मंगेश ठाकरे, गोवर्धन सोनटक्के, अजय सोनटक्के, विलास नागे, प्रभाकर पाटील, प्रशांत खाजणे, चंद्रकांत मुरतकर, मनोज सोनटक्के, रविकिरण मोरे, प्रमोद सोनटक्के, दिलीप सोनटक्के, विलास खलोकर, अजय फुलारी आणि भूषण पवार या शेतकऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.आता पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रशासन यावर काय तोडगा काढते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी विशेष मोहीम

**अमरावती**- महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त



नितीन बोबडे झोन क्र. ३ यांच्या मार्गदर्शनाखाली रुक्मिणी नगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी विशेष मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेदरम्यान एकूण १६ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीत काही ठिकाणी कापडी व कागदी पिशव्यांचा तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळून आला. मात्र, एका आस्थापनात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्याबद्दल आर्चिस पान सेंटर या आस्थापनास ५,००० दंड आकारण्यात आला. तसेच विजय काळे, शुभम आदमने व अभिजीत आदमने यांच्याकडून प्रत्येकी १,००० दंड वसूल करण्यात आला. अशाप्रकारे मोहिमेत एकूण ८,००० दंडाची वसुली करण्यात आली.ही मोहीम यशस्वीरित्या पार पडली असून, नागरिकांनी व व्यावसायिक आस्थापनांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले.सदर मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक कुंदन हडाले तसेच स्वास्थ्य निरीक्षक विनोद टांक, सुनील चोरपगार, सचिन सैनी, मनीष हडाले, निलेश तंबोले, प्रसाद कुलकर्णी, संजय माहूरकर आणि शैलेश डोंगरे यांनी सहभाग घेतला.

### हरिना फाउंडेशनतर्फे जनजागृती अभियान

**अचलपूर**- जागतिक नेत्रदान दिनाच्या औचित्यावर परतवाडा शहरात हरिना फाउंडेशन तर्फे विविध शासकीय कार्यालयात भेट देऊन जनजागृती अभियान राबविण्यात आले



.यामध्ये परतवाडा शहरातील नगर परिषद कार्यालय ,परतवाडा पोलिस स्टेशन,अभिनंदन बँकेचा समावेश आहे .यावेळी हरिना फाउंडेशन तर्फे वर्ष भर राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रम ,शिबिराची माहिती ही देण्यात आली .यावेळी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने,परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरेश म्हस्के,नगरसेवक अभय माथने, हरिना फाउंडेशन परतवाडयाचे अध्यक्ष पंकज गुप्ता,सामाजिक कार्यकर्ते राजेश अग्रवाल,पंकज शर्मा, आकाश श्रीवास्तव,श्याम मांडेकर,जय तिवारी आदी उपस्थित होते.

## शिवसेनेच्या पाठपुराव्याला यश

## धामोरी मार्गे अमरावती -खोलापूर एसटी बससेवा सुरू

**अमरावती/ का.प्र.**

धामोरी (ता. भातकुली, जि. अमरावती) व परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी अखेर शिवसेनेच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे पूर्ण झाली असून अमरावती-खोलापूर मार्गावरील साधी (ऑर्डिनरी) एसटी बससेवा सुरू करण्यात आली आहे.

वलगाव, खारतळेगाव, बैलमारखेड फाटा, धामोरी, झांझी, मधलापूर, म्हैसपूर व खोलापूर या गावांतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना वाहतुकीची मोठी अडचण निर्माण होत होती. ही समस्या लक्षात घेऊन शिवसेना तालुका प्रमुख अमोल वारघडे यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागीय कार्यालयात निवेदन देत सातत्याने पाठपुरावा केला. शिवसेना जिल्हाप्रमुख आशिषभाऊ धर्माळे व सहसंपर्क प्रमुख श्यामभाऊ देशमुख यांनीही या मागणीसाठी प्रशासनाकडे जोरदार भूमिका मांडली.शिवसेनेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे व पाठपुराव्यामुळे प्रशासनाला सकारात्मक निर्णय घ्यावा लागला आणि धामोरी मार्गे खोलापूर बससेवा मंजूर



करण्यात आली. त्यामुळे परिसरातील हजारो नागरिकांचा प्रवासाचा प्रश्न मार्गी लागला आहे.

बससेवेच्या शुभारंभप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, सहसंपर्क प्रमुख श्याम देशमुख, शिवसेना तालुका प्रमुख अमोल वारघडे, शाखाप्रमुख नारायण सखे, गोपाळभाऊ जामनेकर, निलेश गाळे, वैभव खर्चान, रोशन गोहत्रे, अविनाश ढोके,विशाल गुल्हाने, नाझीम खान, बाबाखान, जफरभाई, मोहम्मद जहेद, संतोष गादे, विठ्ठल मेहरे, चेतन खर्चान, गोलू गाळे, पवन भिडेकर,नामदेव खरबडे, राजा पठाण, नरेश ढवळे, प्रभाकर खरबडे, प्रल्हाद गाळे, गोलू ढोलवाडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.ज्येष्ठ नागरिक विठ्ठल मेहरे यांच्या हस्ते फीत कापून बससेवेचा शुभारंभ करण्यात आला.

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्कूल बस चालक-मालकांची कार्यशाळा

**अमरावती/ का.प्र.**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी स्कूल बस चालक व मालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून सुरक्षित वाहनचालना हीच अपघातमुक्त प्रवासाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेत केले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक संजय खताळे, ग्रामीण पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, अग्निशमन दलाचे प्रमुख सय्यद अन्वर,अमित ददगाळ, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संजय पेंढारकर,, मोटार वाहन निरीक्षक सतीश राठोड, यशवंत रामटेके उपस्थित होते.

यावेळी शहर व परिसरातील स्कूल बस चालक व मालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यशाळेत शालेय विद्यार्थी वाहतूक नियमावली, मोटार वाहन कायद्यातील तरतुदी, वाहतूक चिन्हांचे महत्त्व, रस्ते सुरक्षा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेमुळे चालक व मालकांमध्ये



### वाहतूक नियम, अग्निसुरक्षा व अपघात प्रतिबंधक उपायांबाबत मार्गदर्शन चालक-मालकांचा सहभाग

वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले.

■ अग्निशमन दलाचे प्रमुख सय्यद अन्वर यांनी वाहनामध्ये आग लागल्यास घ्यावयाची तातडीची उपाययोजना आणि बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.

■ ग्रामीण पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी दृकश्राव्य माध्यमातून विविध वाहतूक चिन्हे, त्यांचे अर्थ आणि त्यांचे पालन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

पोलीस उपअधीक्षक संजय खताळे यांनी अपघातांची प्रमुख कारणे विशद करताना वेगमर्यादेचे पालन, वाहन चालविताना सतर्कता आणि नियमांचे पालन यामुळे अपघातांना प्रभावीपणे आळा घालता येऊ शकतो, असे सांगितले.

■ अध्यक्षीय भाषणात प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी स्कूल बस वाहनांसाठी शासनाने निर्धारित केलेले सुरक्षा निकष, वाहनांची नियमित तपासणी, चालकांची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची आवश्यकता यावर भर दिला.

## अचलपूरच्या सिंचन व पुनर्वसन प्रश्नांसाठी मंत्रालयात चर्चा

### प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे जलसंपदा मंत्र्यांचे निर्देश

**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर मतदारसंघातील विविध प्रलंबित सिंचन व पुनर्वसन प्रश्नांबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या मंत्रालयातील दालनात आमदार प्रवीण तायडे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण व सकारात्मक बैठक पार पडली. बैठकीत विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती देणे, भूसंपादन आणि प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भातील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत वासनी, भगाडी, बोर्डी नाला, राजना पूर्णा, राजुरा, करजगाव या प्रकल्पांसह भूगाव पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या भूगाव, बोरगाव पेठ, बोरगाव तळणी, बोरगाव दोरी आणि राजुरा येथील नागरिकांच्या पुनर्वसन, भूसंपादन तसेच अपूर्ण प्रकल्पांची सद्यस्थिती यांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार प्रवीण तायडे,



विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक सोनटक्के, अमरावती जिल्हाधिकारी आशिष येरेकर तसेच मुख्य अभियंता टाले हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित होते. तसेच प्रधान सचिव एकनाथ डवले, सचिव डॉ. बेलसरे, कार्यकारी अभियंता सौ. अश्विनी राऊत राजभोग, अधीक्षक अभियंता आणि संबंधित विभागांचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या, पुनर्वसन प्रक्रिया, भूसंपादनाची स्थिती आणि विविध सिंचन प्रकल्पांची रखडलेली कामे मार्गी लावण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाली.

राज्याचे जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करून प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले.

आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर मतदारसंघातील प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या विविध अडचणी बैठकीत मांडत, रखडलेल्या सिंचन व पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्याची मागणी केली.

या बैठकीमुळे मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## डॉ. अमोल ब्राह्मणकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

### ५१ दात्यांनी बजावले सामाजिक कर्तव्य

**अंजनगाव सुजी/ वार्ताहर**

'रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' हा संदेश जपत, डॉ. अमोल ब्राह्मणकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अंजनगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

माऊली ग्रुप, माऊली फाउंडेशन आणि श्री ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ५१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपले सामाजिक दायित्व पूर्ण केले.

सध्या संपूर्ण देशासह स्थानिक पातळीवर रक्ताचा मोठा तुटवडा भासत आहे. विशेषतः अमरावती, अकोला आणि नागपूर सारख्या मोठ्या शहरांमधील रक्तपेढ्यांमध्येही रक्ताची कमतरता जाणवत आहे.

मेळघाटसारख्या दुर्गम भागात थॅलेसेमिया आणि सिकलसेल सारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांची संख्या मोठी असून, त्यांना नियमित रक्ताची गरज



भासते.ही निकड लक्षात घेऊन गेल्या पाच वर्षांपासून माऊली फाउंडेशन, श्री ग्रुप,आणि माऊली ग्रुपसह संलग्न संघटना आरोग्यविषयक विविध उपक्रम राबवत आहेत.डॉ. कौस्तुभ पाटील यांच्या 'कल्पतरू हॉस्पिटल' येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मेळघाट ब्लड बँक, अचलपूरचे संचालक डॉ. दत्ता मानवतकर यांच्या मार्गदर्शनाखाली रक्त संकलनाची प्रक्रिया पार पडली. डॉ. अमोल ब्राह्मणकर यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून तरुणांनी मोठ्या संख्येने पुढे येत ५१ पिशव्या रक्त जमा केले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माऊली फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शोण देशमुख आणि माऊली ग्रुपचे अध्यक्ष अतुल पाटील येवले यांनी विशेष पुढाकार घेऊन मोलाचे योगदान दिले. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## अधिक ज्येष्ठ मास अमावस्या निमित्त चंदन उटी

**चांदुर रेल्वे**- तालुक्यातील पवित्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे अधिक ज्येष्ठ मास अमावस्या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने १५ जून २०२६रोजी सायंकाळी ५. ०० वाजता संस्थान परिसरात भक्तिमय वातावरणात चंदन उटी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानंतर बाहेरगावाहून आलेल्या भाविक भक्तांसह समस्त ग्रामस्थांसाठी संस्थानच्या अन्नदान



समितीच्या नियोजनात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.६ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा वाढवा १६ जून मंगळवार रोजी सकाळी ९ वाजता महाराजांच्या अरज व आरतीने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत भजनाच्या गजरात संपन्न होणार आहे.या मांडी मध्ये दैनंदिन दिवस पाळीत निस्वार्थ भावनेने सेवा दिली अशा सेवाधारी भजनकार भाविकांचा संस्थानचे वतीने सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात येत आहे.

## सानिका सोलव हिची आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

**अचलपूर/ वार्ताहर**

भूतान येथे गेल्या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या आशियाई आट्यापाट्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला आट्यापाट्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्ण पदक पटकावून देशाचा गौरव वाढविला. या विजेत्या भारतीय संघामध्ये



जिल्ह्याची कन्या सानिका सोलव समावेश असून, उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण अमरावती जिल्हा व महाराष्ट्र राज्य अभिमानाने भारावून गेले आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील काळातही ती भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.मान्यवरांनी सानिका सोलव हिचे विशेष अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्राचार्य डॉ. दीपक काविश्वर, सचिव, आट्यापाट्या फेडरेशन ऑफ इंडिया प्रा.डॉ. चकोले सचिव, महाराष्ट्र राज्य आट्या पाट्या महा मंडळ, नागपूर प्रा.डॉ .धाकुलकर सचिव, अमरावती जिल्हा आट्यापाट्या संघटना तसेच उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नागपूर शिंगाणे मार्गदर्शक व प्रशिक्षक ग्राउंडवर खेळाडूंची नियमित सराव व प्रशिक्षण जबाबदारी भुरे व धंडारे क्रीडा मार्गदर्शक व प्रशिक्षक ,मुख्याध्या पक व शिक्षक वृंद आदर्श विद्यालय भुगाव समस्त गावकारी मंडळी भुगांव,रामापूर, नाबाबपूर ,मेघनाथपूर आणि नगरसेवक मिलिंद बांबल यांचा समावेश आहे.

## नेत्रदान व अवयव दानाचा संकल्प करणाऱ्यांचा सत्कार

### हरिना फाऊंडेशन आणि हरिना नेत्रदान समितीच्यावतीने

**अमरावती/ का.प्र.**

जागतिक नेत्रदान दिनाच्या निमित्ताने हरिना फाऊंडेशन आणि हरिना नेत्रदान समितीच्यावतीने नेत्रदान जनजागृती रॅली काढण्यात आली. तसेच नेत्रदान व अवयव दानाचा संकल्प करणाऱ्यांचा सत्कार सुध्दा करण्यात आला.

जागतिक नेत्रदान दिनाच्या निमित्ताने जनजागृती करण्यासाठी हरिना फाऊंडेशन व हरिना नेत्रदान समितीच्यावतीने यंदा 'मेरे जिवन का अंतिम उपहार राष्ट्र के नाम' या थीम खाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. डिजीटल माध्यमांव्दारे नेत्रदान संकल्प अभियान राबविण्यात आले. त्यासाठी शहरातील विविध भागात सेल्फी पाईंट उभारण्यात आले होते. ज्या ठिकाणी क्युआर कोड वापरून नागरीक ऑललाईन पध्दतीने नेत्रदानाचा संकल्प केला. नेहरू मैदान येथुन नेत्रदान



### जनजागृती रॅलीत मान्यवरांची उपस्थिती

जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी आ. रवि राणा, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकुर, माजी खासदार अनंत गुढे, विलास इंगोले, माजी महापौर रिना नंदा, अविनाश मार्डीकर, प्रदिप हिवसे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी नेत्रदान व अवयवदानावर जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.श्याम चौक, बापट चौक, प्रभात टॉकीज, जवाहर रोड, सरोज चौक, जयस्तंभ चौक, शहर कोतवाली, मार्गे राजकमल येथे रॅलीचा समारोप आला. त्यानंतर सिताराम बाबा संकुलासमोर आयोजित कार्यक्रमात नेत्रदान, अवयव दानाचा संकल्प करणाऱ्यांचा सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या

कार्यक्रमाला महापौर श्रीचंद तेजवानी, भारत गणेशपुरे यांच्यासह आयोजन समितीचे अध्यक्ष पुरणलाल हबलानी, संयोजक निलेश चिठोरे, हरिना फाऊंडेशनचे अध्यक्ष मनोज राठी, कार्यकारी अध्यक्ष चंद्रकांत पोपट, उपाध्यक्ष रामप्रकाश गिल्डा, सचिव राजेंद्र वर्मा, कोषाध्यक्ष राजेंद्र भंसाली, सहसचिव अर्पण करण्यात आली. संजय भुतडा आदी प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. यावेळी मरणोप्रांत नेत्रदान व अवयवदान करणाऱ्या मृत दात्यांना सामुहिक श्रध्दांजली देण्यात आली.

हा संपुर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी आयोजन समितीचे अध्यक्ष पुरणलाल हबलानी आणि समन्वयक निलेश चिठोरे यांच्या मार्गदर्शनाखालील समितीचे सदस्य डॉ. डी.जी अडवाणी,नंदकिशोर राठी, जयराज बजाज, प्रफुल्ल राऊत, दिनेश सेठिया, कैलाश गिरोडकर, जय हेमराजानी, समीर कुबडे, रवींद्र इंगळे, प्रवीण ढवळे, अनिकेत देशमुख, सीए अंकित राजभूत, डॉ. माधुरी चेंडके, सुरेंद्र पोपली, शरणपालसिंग अरोरा, प्रा. मुकेश लोहिया, ओमप्रकाश, खेमचंदानी प्रदीप चड्डा, शरद कासट,पूजा जोशी, बरखा बोज्जे,माजी आयोजन समिती अध्यक्ष सुरेश जैन, गिरधारीलाल बजाज, जुगलकिशोर गट्टानी, चंद्रकांत जाजोदिया, किरण पातुरकर, डॉ. नितीन घोडे, सारंग राऊत, डॉ. सय्यद अबरार, ॲड. आर.बी. अटल, नानक राम नेमनानी, चरणजीत कौर नंदा, पुरुषोत्तम मुंधडा, सुरेश रतावा, मनीष सावला, नरेशभाऊ सोनी, मुश्ताक खान, अशपाक अहमद, काजी आहद अली, जुगलकिशोर मालानी, संजय लड्डा, कवरीलाल ओस्तवाल आदी मान्यवर उपस्थीत होते.

# ...इतिहास ठसा मोजतो!



✍ अ‍ॅड. धनंजय देशमुख

आज देशात एक वेगळीच चर्चा रंगवली जात आहे. सांगितले जात आहे की नरेंद्र मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचा पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ सत्तेवर राहण्याचा विक्रम ओलांडला. समर्थक आनंद साजरा करत आहेत. सोशल मीडियावर अभिनंदनाचे संदेश फिरत आहेत. पण या सगळ्या उत्साहात एक मूलभूत प्रश्न हरवतो आहे.इतिहासाला दिवस महत्त्वाचे असतात की कार्य?

कारण इतिहास कधीही घड्याळाच्या काट्यांनी लिहिला जात नाही. इतिहास लिहिला जातो विचारांनी, संस्थांनी, निर्णयांनी आणि समाजावर पडलेल्या परिणामांनी.नेहरूंना मिळाला होता एक जखमी भारत. फाळणीच्या रक्तरंजित वेदना, लाखो निर्वासित, दारिद्र्य, अशिक्षित समाज, उद्योगांचा अभाव आणि जगाच्या नकाशावर स्वतःचे स्थान निर्माण करण्याचे आव्हान. त्या काळात भारताकडे ना पैसा होता, ना संसाधने होती, ना जागतिक प्रतिष्ठा.

मात्र नेहरूंनी भारताला फक्त शासन दिले नाही, तर दिशा दिली. त्यांनी देशाला वैज्ञानिक दृष्टिकोन दिला. धरणे, कारखाने, संशोधन संस्था, IIT, AIIMS, DRDO, ISRO ची पायाभरणी, अणुऊर्जा कार्यक्रम यांसारख्या अनेक गोष्टींची सुरुवात त्यांच्या काळात झाली.

आज भारत अवकाशात झेप घेतो, जगातील महासत्तांशी स्पर्धा करतो, विज्ञान आणि तंत्रज्ञानात स्वतःचे स्थान निर्माण करतो; त्यामागे अनेक दशकांपूर्वी रोवलेली ती बीजे आहेत.

दुसरीकडे मोदी यांना मिळाला तो आधीच उभा असलेला भारत. अण्वस्त्रधारी भारत, माहिती तंत्रज्ञानात प्रगत भारत, जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक भारत, मजबूत लोकशाही व्यवस्था असलेला भारत. परंतु गेल्या काही वर्षांत एक वेगळीच राजकीय संस्कृती उदयास आली. पूर्वी सरकार काम करत असे आणि माध्यमे त्याची माहिती देत असत.आता अनेकदा असे वाटते की माध्यमे आधी वातावरण तयार करतात आणि नंतर काम दाखवले जाते.

राजकारणात प्रतिमानिर्मिती नवीन नाही.

पण आज तीच मुख्य धोरण बनली आहे. उद्घाटनांपेक्षा उद्घाटनाचे फोटो जास्त चर्चेत असतात. प्रकल्पांपेक्षा त्याच्या जाहिराती मोठ्या असतात. निर्णयांपेक्षा त्यांचे व्हिडिओ जास्त व्हायरल होतात.पूर्वी एखादे धरण बांधले की पाणी शेतात पोहोचल्यावर लोकांना विकास दिसत असे. आज विकासाचे मोजमाप अनेकदा ड्रोन कॅमेऱ्यांनी आणि सोशल मीडियाच्या ट्रेंडने होताना दिसते.

लोकशाहीत माध्यमांची भूमिका सत्तेला प्रश्न विचारण्याची असते. परंतु जेव्हा माध्यमांचा मोठा भाग सत्तेचे कौतुक करण्यात व्यस्त होतो, तेव्हा प्रश्न विचारणाऱ्यांची संख्या कमी होते. पत्रकार परिषदांमध्ये कठोर प्रश्न विचारले जाणे ही लोकशाहीची ताकद असते. सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणारे प्रश्न विचारणारे पत्रकार हे लोकशाहीचे खरे पहारेकरी असतात. आज अनेकदा अशी टीका होते की प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही, विरोधक किंवा नकारात्मक म्हणून रंगवले जाते. पण लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नसतो; ती नागरिकांची जबाबदारी असते.

नेहरूंच्या काळात त्यांच्यावर कठोर टीका झाली. संसदेत विरोधक कमी होते, पण टीका भरपूर होती. तरीही त्यांनी मतभेदांचा अधिकार जपला. कारण त्यांना माहीत होते की व्यक्तीपेक्षा संस्था मोठी असते.

आज मात्र अनेकदा व्यक्तीच संस्था बनल्याचे चित्र निर्माण होते. प्रत्येक यश एका व्यक्तीशी जोडले जाते आणि प्रत्येक अपयशासाठी इतरांना जबाबदार धरले जाते.पण राष्ट्रनिर्मिती ही एका व्यक्तीची नव्हे तर पिढ्यानपिढ्यांच्या योगदानाची प्रक्रिया असते.

इतिहासाचा आणखी एक नियम आहे.तो प्रचाराने लिहिला जात नाही.जगातील अनेक हुकूमशहांनी स्वतःच्या प्रतिमा उभ्या केल्या, स्वतःचे गौरवगीत गाऊन घेतले, माध्यमांवर प्रभाव टाकला. पण काळ पुढे गेला आणि त्यांच्या प्रचाराचे फुगे फुटले. उरले ते फक्त त्यांचे वास्तविक काय. इतिहासाला जाहिराती समजत नाहीत.इतिहासाला भाषणे समजत नाहीत. इतिहासाला फक्त परिणाम समजतात.

एखाद्या नेत्याने किती सभा घेतल्या, किती फोटो काढले, किती ट्रेंड चालवले याची नोंद इतिहास ठेवत नाही. पण त्याने किती संस्था निर्माण केल्या, किती लोकांचे जीवन बदलले, किती पिढ्यांना दिशा दिली याची नोंद मात्र कायम राहते.म्हणूनच पंतप्रधानपदावर सर्वाधिक काळ बसणे हा नक्कीच एक विक्रम असू शकतो. परंतु तो महानतेचा पुरावा नसतो.

महानता ही कालावधीत नसते, तर योगदानात असते.

देशाला संस्था देणारा नेता आणि संस्थांचे श्रेय घेणारा नेता यांच्यात फरक असतो.देशाला विचार देणारा नेता आणि केवळ प्रतिमा देणारा नेता यांच्यात फरक असतो. देश घडवणारा नेता आणि देशाला सतत स्वतःकडे पाहायला लावणारा नेता यांच्यात फरक असतो.तो फरक प्रचाराला कदाचित दिसणार नाही. पण इतिहासाला नक्कीच दिसतो.कारण इतिहास दिवस मोजत नाही...इतिहास ठसा मोजतो!

मो.९२८४३८२१०२

# गीताचार्य श्री तुकाराम दादा भूसकडे

✍ हभप प्रा. श्रीकांत भूसकडे



महान कर्मयोगी श्री तुकाराम दादा भूसकडे म्हणजे समर्पण, साधना आणि समाजपरिवर्तनाची अखंड गाथा. ८ जून २०२६, तुकाराम दादा भूसकडे गीताचार्य यांच्या २० व्या पुण्यस्मरण दिन झाला.

९ डिसेंबर १९१४, मार्गशीर्ष शुद्ध एकादशी - गीता जयंती दिनी, कुऱ्हा (बहिरम) येथे त्यांचा जन्म झाला.त्यांचे कुळ मुळचे राजस्थानातील मालवा प्रांतातील भारद्वाज गोत्रोत्पन्न सूर्यवंशीय क्षत्रिय फुलमाळी भूषणकुळे. पुढे मुंगी-पैठण येथे स्थलांतर, नंतर विदर्भात पूर्णा नदीकाठी. 'भूषणकुळे'चे 'भूसकडे' झाले.

गीताचार्य नामसार्थकता: गीता जयंतीला जन्म व वंदनीय तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांनाच निवडले. त्यामुळे जन्मतः व कर्मतः 'गीताचार्य'.कुशाग्र बुद्धी, पहाडी आवाज, सामुदायिक प्रार्थनेची आवड. चांदूरबाजार परिसरात वंदनीय तुकडोजी महाराजांच्या संपर्कात आले. महाराजांनी हे बालरत्न कायमचे जवळ ठेवले.

बालपणी तुळजापूर गडी येथे विवाह झाला, पण राष्ट्रकार्यासाठी पत्नी,कुटुंबाचा त्याग केला. धर्मपत्नीने आयुष्यभर सौभाग्यव्रत पाळले, पण दादांनी 'विश्वचि माझे घर' मानले.चंद्रपूरजवळील अड्याळ टेकडी ही त्यांची तपोभूमी. कोणतीही सुविधा नसताना १२ वर्षे कठोर मौनसाधना केली. ही साधना आत्मोन्नतीसाठी नव्हे, तर मानवजातीच्या कल्याणासाठी होती.

'ग्रामगीता' हा केवळ धार्मिक ग्रंथ नाही, तर आदर्श ग्रामरचनेचा, राष्ट्रनिर्मितीचा मार्गदर्शक आहे, ही जाणीव जनमानसात रुजवली. हिंदी, संस्कृत, तेलगू भाषांमध्ये अनुवाद घडवून आणले.सामान्यांपर्यंत पोहोचावी म्हणून अत्यल्प किमतीत उपलब्ध केली.ग्रामगीता जीवनपद्धती बनली. व्यसनमुक्ती, श्रमदान, स्वावलंबन यासाठी हजारो युवक प्रेरित झाले. नागपूर विद्यापीठ नामकरणाकरीता 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ' हे नाव मिळवण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे होते.

त्यांनी श्री गुरुदेव आत्मानुसंधान भू-वैकुंठ, अड्याळ टेकडी - साधना व संस्कारांचे केंद्र, ग्रामगीता सक्रिय दर्शन मंदिर, पंढरपूर - राष्ट्रसंतांच्या विचारांचे सजीव स्मारक उभारले. 'जनता जनार्दन की जय' हा जयघोष देऊन सत्तेचे खरे मालक जनता आहे. आमदार-खासदार हे जनतेचे सेवक आहेत. लोकप्रतिनिधींनी सेवावृत्तीने राहावे व जनतेने वारंवार जाब विचारावा.

९२ वर्षे निरोगी, साधनामय जीवन जगून ८ जून २००६ रोजी महानिर्वाण झाले. अड्याळ टेकडीवरील त्यांचे समाधीस्थळ आज श्रद्धा, चिंतन व प्रेरणेचे केंद्र आहे. स्वतःसाठी काहीही न साठवता समाजासाठी विचारांचे, संस्कारांचे अक्षय भांडार निर्माण करणे म्हणजे खरे संतत्व.

हिरुर पूर्णा-चांदुर बाजार,
जि-अमरावती


# बालपणाला मुक्त श्वास देऊ या!

✍ राजेंद्र बगाटे

बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच आजच्या बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.



भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते.

बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही.

# आयला रे लडकी मस्त मस्त तू...

✍ गुरूदत्त वसंत सोनसूरकर



१९९३ मध्ये शिल्पा बाजीगर मधून आली तेव्हा काजोलचे लंबुळक व्हर्जन वाटलेली. शिल्पा पेक्षा तिची आई जास्त सुंदर वाटायची. सुनंदा शेट्टी. ठसठशीत शेट्टी सौंदर्य. चेम्बुरची अश्विनी शेट्टी नंतरची शिल्पा,शाळेत व्हॉलीबॉल खेळायची.त्यामुळे लाभलेली दणकट शरीरयष्टी आणि दणदणीत उंची.बाजीगर मध्ये तिने शाहरुखला गच्चीवरून आरामात खाली फेकून दिले असते तरी प्रेक्षकांना खोटे वाटले नसते. बाजीगर प्रचंड मोठा हिट झाला आणि शाहरुख, काजोल बरोबरच शिल्पाची इंडस्ट्रीमध्ये चर्चा सुरु झाली. 'फिल्मफेअर न्यू फेस ऑफ द इयर' साठी ती नॉमिनेट झाली होती.पुढच्याच वर्षी १९९४ मध्ये शिल्पाचे तीन चित्रपट आले.त्यापैकी आग गोविंदाबरोबर आणि 'मै खिलाडी तू अनाडी'अक्षय कुमार बरोबर होते. आगची कथा मस्त होती आणि शिल्पाची भूमिका सुद्धा. तिला त्यात गाणी सुद्धा चांगली मिळाली होती. 'ये कन्या कुंवारी हैं' आणि 'अंगिया में अंगना' आठवा. 'आग' ठीक ठाक चालला.'मै खिलाडी'सुपरहिट झाला आणि शिल्पाला एक एपिक गाणे देऊन गेला.'चुरा के दिल मेरा...'

शिल्पाची गाडी जोरात निघाली होती. पण आग आणि मै खिलाडी सारख्या भूमिका तिला पुढे मिळाल्या नाहीत. पुढच्या दोन तीन वर्षात तिचे हथकडी, गॅम्बलर, मिस्टर रोमिओ (तमिळ - प्रभुदेवा), छोटे सरकार, हिम्मत काही खास चालले नाहीत. शिल्पा मात्र प्रत्येक चित्रपटात खासच दिसायची.पैकी मिस्टर रोमिओ मधले प्रभुदेवा बरोबरचे तिचे पास आ जा बालम रे बघा.मग थर्मामीटरने टेम्परेचर तपासा इतकी हॉट दिसतेय शिल्पा. १९९७ मध्ये अण्णा शेट्टी बरोबर पृथ्वी, अक्षयबरोबर इन्साफ डयाच काळात तिचे अक्षय बरोबर प्रकरण चालू होते.संजय कपूर बरोबर जमीर, सल्लूबरोबर औजार सगळे फ्लॉप झाले.

हळूहळू शिल्पा फ्लॉप नायिकांमध्ये गणली जाऊ लागली. १९९८ मध्ये गोविंदांबरोबर तिचा परदेसी बाबू चांगला होता पण त्यात रवीना सुद्धा होती.परदेसी बाबू गोविंदाच्या हिट सिनेमात बसत नाही.सुनील शेट्टीबरोबरचा आक्रोश,अक्षय बरोबरचा जानवर फ्लॉप गेले.तरीही तिला थेट बच्चन बरोबर लाल बादशाह मिळाला.मात्र त्या पेक्षा त्याच वर्षी आलेल्या शूल मधले तिचे 'मैं आयी हूँ यूपी बिहार लूटने' जास्त चालले. बॉलिवूडमधल्या प्रत्येक नायिकेचा एक खास चित्रपट असतो जसा करिश्मा कपूरचा राजा हिंदुस्तानी, करीना कपूरचा 'जब व्ही मेट' तसा शिल्पाला तीचा खास असा चित्रपट मिळाला २००० साली आलेला 'धडकन'. आज मीम मटेरियल असलेला 'धडकन' त्या काळात छोट्या शहरात एक इमोशन बनला होता. वितरकांच्या भाषेत 'ए सेंटर्स'ना बरा चालला होता हा सिनेमा. पण दोन्ही शेट्टींना हा सिनेमा एक ओळख देऊन गेला.

त्याच वर्षी तिचा संजय दत्त बरोबर 'जंग' आला. ज्यात तिला अजून एक तुफान गाणे मिळाले 'आयला रे लडकी मस्त मस्त तू आयला रे..' (यातली शिल्पा कातिल आहे.) खरं म्हणजे हिट चित्रपटांच्या व्यस्त प्रमाणात शिल्पाची हिट गाणी आहेत. सनी देओल बरोबरचा इंडियन चालला पण त्यात तिचे लक्षात राहील असे काम नाही. अनिल कपूरबरोबर आलेल्या 'रिश्ते'मध्ये ती कोळिणीच्या गेट अप मध्ये असली मारू दिसली आहे कि क्या बात. 'डरना मना हैं' मधली तिची गायत्री मस्तच.

त्या काळात तिचा एक सुंदर सिनेमा आला फिर मिलेंगे. एड्स सारख्या विषयावर रेवतीने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाने शिल्पाला एक वेगळी ओळख,आदर मिळवून दिला. पण शिल्पा हळूहळू हिंदी सिनेमाच्या चंदेरी पडद्यापासून दूर जाऊ लागली. ती टीव्हीवर आली. झलक दिखला जा च्या पहिल्या सीझनमध्ये ती फराह खान आणि संजय लीला भन्साळी बरोबर परिक्षक बनली.

२००७ मध्ये ती देओल खानदानाच्या ते अपने मध्ये होती आणि एका सुरेख सिनेमात होती.'लाईफ इन ए मेट्रो' यातली तिची विवाहित शिखा जी एका परपुरुषाच्या प्रेमात पडली, आणि जवळपास त्याला शरीर अर्पण करायला तयार झालीय पण त्या नात्यातला फोलपणा उमजून वेळीच बाजूला होणारी शिखा ... शिल्पाने सुंदर रंगवली आहे. एका प्रसंगात ती एकटा असलेल्या शायनी अहुजाच्या घरातून बाहेर पडते. थोड्या अंतरावर येऊन परत त्याच्या घरात शिरते आणि दोघे एकमेकांच्या जवळ येतात तो प्रसंग हिंदी सिनेमाधल्या अत्युच्च इरॉटिक प्रसंगापैकी एक आहे. फरेब नावाच्या पडेल सिनेमात शिल्पा आणि शमिता शेट्टी बहिणींनी 'बरस जा ऐ सावन बरस जा' मध्ये उधम मचवला आहे.

तिथून ती थेट इंग्लंडला पोहोचली. २००७ च्या युकेच्या बिग बॉस मध्ये ती स्पर्धक म्हणून गेली. त्या शो मध्ये इतर स्पर्धकांकडून तिला एक भारतीय आणि ब्राउन स्किन म्हणून वंश द्वेषाचा सामना करावा लागला. शिल्पा त्या शो मध्ये तुटली पण टिकून राहिली. तिच्या बरोबर भेदभाव करणाऱ्या स्पर्धकांना जगभरातून टीकेचा सामना करावा लागला. काही स्पर्धकांनी तिची जाहीर माफी मागितली आणि शिल्पाने ते बिग बॉस चक्क जिंकले. भारताचे नाव रोशन केले.

२००८ मध्ये करण जोहरच्या दोस्ताना मध्ये ती सुरुवातीच्या गाण्यात दिसली इतकीच. नंतर राज कुंद्रा नावाच्या इंग्लंड स्थित व्यावसायिकाशी लग्न केलं. नच बलिये, जरा नच के दिखा, सुपर डान्सर, इंडियाज गॉट टॅलेंट अशा टीव्ही शो मधून ती परीक्षक म्हणून दिसू लागली. चर्चगेट ते विरार ओठ पसरवून हसू लागली. शिल्पा धमाल होतीच. टीव्ही शोज मध्ये तिची पर्सनॅलिटी अजून खुलून आली. तिचे योगा व्हिडिओज गाजले. जवळपास तेरा वर्षांनी ती हंगामा २ मधून हिंदी सिनेमात दिसली. पण ती गेलीय असे कधी जाणवले नव्हतेच. कारण ती टीव्ही मधून कित्येक करोड लोकांपर्यंत पोहोचली होती. बाई शांत बसणारी नाहीच.

हॉटेल सुरु केले. आयपीएलमध्ये एक टीम विकत घेतली. हल्लीच तिने इंडियन पोलीस फोर्स नावाची रोहित शेट्टीची वेब सीरिज केली. तोडफोड करताना बाईने कुठेही हात आखडता घेतला नाही. शेवटी शेट्टी जीन्स आहेत.

आजही शिल्पा कुठेही आपल्यावर बॉलीवूडने अन्याय केला किंवा नवऱ्याबरोबर झालेली लफडी या बद्दल जास्त ना बोलता आपल्या बिनधास्त वागण्याने मीडियाला गपगार करून टाकते. त्यात तिचे ते किलर स्माईल. उगाच नाही गियरांच्या रिचर्डने शिल्पाच्या पप्प्या घेतल्या होत्या.

# काळेगाव – भोकर रस्ता कामात 'डांबर'च गायब?

# शेड्युल 'बी'तील फेरफार, कोट्यवधींच्या अपहाराचा आरोप



■ प्रतिनिधी | अकोला ■

**तेल्हारा तालुक्यातील काळेगाव ते भोकर रस्ता व लहान पूल (स्लॅब ड्रेन) या १ कोटी ६४ लाख ६९ हजार ९३८ रुपयांच्या सार्वजनिक बांधकामात गंभीर आर्थिक आणि तांत्रिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणाने जिल्हा परिषद अकोल्याच्या बांधकाम विभागातील कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे केले आहे. तक्रारदार अरविंद पाटील यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला दिलेल्या नोटिशीत निविदा अटींमध्ये फेरफार, शेड्युल 'बी'मधील संशयास्पद बदल, डांबरीकरणाच्या कामाचा कथित बळी आणि शासन निधीच्या अपहाराचे गंभीर आरोप करत २२ जूनपासून बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.**

## ■ कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता आणि कंत्राटदाराविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची मागणी
## ■ कारवाई न झाल्यास २२ जूनपासून आमरण उपोषणाचा इशारा

विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात केवळ निकृष्ट कामाचा मुद्दा नसून मंजूर कामाचे स्वरूपच बदलून निधीचा लाभ विशिष्ट कंत्राटदाराला मिळवून देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे हा वाद आता केवळ प्रशासकीय त्रुटींच्या चौकटीत न राहता संभाव्य आर्थिक घोटाळ्याच्या दिशेने सरकत असल्याचे चित्र आहे.

### डांबरीकरण मंजूर, प्रत्यक्षात खडीकरण?

तक्रारीतील सर्वात गंभीर आरोप म्हणजे रस्त्याच्या मूळ मंजूर तांत्रिक आराखड्यात डांबरीकरणाशी संबंधित आयटम क्रमांक ७, ८ आणि ९ स्पष्टपणे समाविष्ट असताना प्रत्यक्षात त्या अटींची अंमलबजावणीच करण्यात आली नसल्याचा आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, मंजूर शेड्युल 'बी'मध्ये रस्त्यावर डांबराचा थर, सील कोट आणि अंतिम डांबरीकरणाची तरतूद होती. मात्र, नंतर तयार करण्यात आलेल्या कथित दुसऱ्या शेड्युल 'बी'मधून हे आयटम आणि त्यांच्याशी संबंधित अटी-शर्तीच वगळण्यात आल्या. परिणामी, प्रत्यक्ष कामात डांबराचा वापर न करता केवळ खडीकरण करून काम पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले. जर हा आरोप वस्तुस्थितीवर आधारित असेल, तर मंजूर निधी आणि प्रत्यक्ष काम यामधील तफावत ही गंभीर चौकशीचा विषय ठरू शकते. सार्वजनिक निधीतून डांबरीकरणासाठी मंजूर झालेला खर्च नेमका कुठे गेला, हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

### दोन शेड्युल 'बी'चा गूढ

संपूर्ण प्रकरणातील केंद्रबिंदू ठरलेला मुद्दा म्हणजे दोन वेगवेगळ्या शेड्युल 'बी' दस्तावेजांचे अस्तित्व. कोणत्याही सार्वजनिक कामासाठी मंजूर झालेल्या तांत्रिक अटी आणि अंदाजपत्रक हा त्या कामाचा आधारस्तंभ असतो. अशा परिस्थितीत दोन भिन्न दस्तावेजांमध्ये मूलभूत स्वरूपाचे बदल आढळणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जाते. तक्रारदाराने या बदलांमुळे शासनाची दिशाभूल झाली असून कंत्राटदाराला आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासकीय स्तरावर संगनमत झाले असावे, अशी शंका व्यक्त केली आहे.

### मातीकामात सातपट दरवाढीचा आरोप

रस्ते बांधकामातील मातीकामाच्या खर्चावरूनही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. तक्रारीनुसार, शासकीय जमिनीतून उपलब्ध होणाऱ्या मातीसाठी निर्धारित दर प्रति घनमीटर २२५ रुपये असताना, खाजगी स्त्रोतांमधून माती आणल्याचे दाखवून तब्बल १५६० ते १५७७ रुपये प्रति घनमीटर इतका खर्च मंजूर करण्यात आला.

माती उपलब्ध असताना अतिरिक्त वाहतूक खर्च आणि इतर बाबी दाखवून मूळ दराच्या अनेक पटींनी वाढ झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या दरवाढीमागील प्रशासकीय मंजुरी आणि त्यामागील तांत्रिक कारणमीमांसा काय होती, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

### प्रयोगशाळा अहवालांवरही प्रश्न

कामाच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी साहित्य चाचणी आणि गुणवत्ता नियंत्रण ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, या प्रकरणात अधिकृत शासकीय किंवा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रयोगशाळांऐवजी खाजगी प्रयोगशाळांचे अहवाल स्वीकारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. गुणवत्ता तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता पाळली गेली का, तसेच संबंधित चाचण्या नियमानुसार झाल्या का, याची पडताळणी करण्याची मागणीही पुढे आली आहे.

### दोषदायित्व कालावधीचा उल्लेख नाही?

रस्त्यांच्या कामांमध्ये ठरावीक कालावधीपर्यंत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कंत्राटदारावर असते. यालाच दोषदायित्व कालावधी म्हटले जाते. मात्र, संबंधित रस्त्यावरील माहिती फलकावर या कालावधीचा उल्लेख नसल्याचा मुद्दा तक्रारदाराने उपस्थित केला आहे.

निकृष्ट दर्जाच्या कामामुळे भविष्यातील जबाबदारी टाळण्यासाठी हा तपशील जाणीवपूर्वक वगळण्यात आला का, याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### प्रशासनासमोर विश्वासार्हतेचे आव्हान

सार्वजनिक बांधकामांतील कथित अनियमिततेबाबत वेळोवेळी प्रश्न उपस्थित होत असले तरी या प्रकरणात करण्यात आलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत.

### आमरण उपोषणाचा गंभीर इशारा



प्रशासनाकडे २९ मे रोजी सविस्तर तक्रार दाखल करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करत अरविंद पाटील यांनी आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. २२ जूनपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याची घोषणा त्यांनी केली आहे. या आंदोलनाद्वारे त्यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, कार्यकारी अभियंत्यांना निलंबित करणे, रस्त्याची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करणे, अंतिम बिले रोखणे आणि संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणे या मागण्या पुढे केल्या आहेत.

विशेषतः मंजूर डांबरीकरणाचे काम प्रत्यक्षात झाले नसल्याचा आरोप, दोन स्वतंत्र शेड्युल 'बी'मधील विसंगती आणि खर्चाच्या दरांमधील प्रचंड तफावत यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि तांत्रिक चौकशी अपरिहार्य ठरत आहे.

आता जिल्हा परिषद प्रशासन या आरोपांची दखल घेऊन चौकशीची प्रक्रिया सुरू करते की नेहमीप्रमाणे फाईलींच्या ढिगाऱ्यात हे प्रकरणही दडपले जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. कारण हा प्रश्न केवळ एका रस्त्याचा नाही; तर सार्वजनिक निधीच्या वापरातील पारदर्शकता आणि प्रशासनावरील जनतेच्या विश्वासाचा आहे.


## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ६६/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** भिमाशंकर शिव मंदिर ट्रस्ट, न्यू तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला

**अर्जदार : -** श्री. सुरज केशवराव मसनकर रा. श्री. कॉलोनी, न्यू तापडिया नगर, अकोला, ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** ७००/- रुपये श्री.सुरज केशवराव मसनकर यांचे जवळ जमा. **आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, शिक्कयानीशी आज दिनांक- ०९/०६/२०२६ रोजी दिली.

**प्र. अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

**CHANGE IN NAME**

I Have Changed My Name From
**SHAHJAHA A. JABBAR**
To New Name
**SHAHJAHA ABDUL RAZZAQUE**
Address- Zeera Baodi Lucky S.T.D., Sindhi Camp, Khadan, Akola - 444001

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

एस. आर. एन. क्रमांक : AKL/05387/1860/25 फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक ४९/२६/१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री माळी पंच मंडळ नंदिपेठ अकोट ता अकोट जि. अकोला बाबत

**न्यासाचा पत्ता :-** नंदिपेठ, अकोट, अकोला, अकोला, अकोट, अकोट

**अर्जदार -** श्री सुनिल रामराव टवळे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Membership fees | 4509.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.४५०९/- मात्र (अक्षरी रुपये चार हजार पाच शे नऊ मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

अ.क्र.शहर किंवा गांव सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.,क्षेत्र, मूल्यांकन, मुदत / कालावधी किंवा स्वरूप, अंदाजे मूल्य **१.** Kalewadi ५७ ३.२३ ३.२३ ०० २४००००००.००, **२.** Kalewadi १६१३.५३ ३.५३ ०० २४५००००.००, **३.** Kalewadi १६६ ०.११ १६६ ०० ५००००.००, **४.** Akot vibhag ३३०/१ ०.९० ३३०/१ ०० २००००००.००, **५.** Akot vibhag 2 ३९०/१ ०.९३ ३९०/१०० २००००००.०० ६ Akot vibhag 2 ३९०/२ ०.९४ ३९०/२ ०० २००००००.००, ७ Akot vibhag 2 ३६५/२ ०.५३ ३६५/२०० १०००००.००, ८ Akot १९ १९२.८६ ३६ D ०० १०००००.००, ९ Akot ३० १००.८० ३६ D ०० १५००००.००

(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. ११२५००००/- मात्र
(अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख पन्नास हजार मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ११-०६-२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# संदीप पाटील यांनी घेतली उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट

## अकोल्यातील पक्षबांधणीवर चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अकोला जिल्ह्यातील नेते संदीपदादा पाटील यांनी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. या भेटीत पक्षाच्या अलीकडील राजकीय यशाबरोबरच अकोला जिल्ह्यातील संघटनात्मक परिस्थिती आणि आगामी वाटचालीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकांमध्ये पक्षाला मिळालेल्या यशाबद्दल संदीपदादा पाटील यांनी समाधान व्यक्त केले. राज्यसभा सदस्य म्हणून राजेंद्र जैन तसेच विधान परिषद सदस्य म्हणून विक्रम काकडे आणि अनिकेत तटकरे यांची अविरोध निवड झाल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले.

जनतेचा विश्वास, कार्यकर्त्यांची मेहनत आणि पक्ष नेतृत्वाच्या दूरदर्शी धोरणांमुळे हे यश मिळाल्याचे सांगत संदीपदादा पाटील यांनी नवनिर्वाचित सदस्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या यशाबद्दल सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन करून त्यांच्यासोबत अकोला जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भविष्यातील नियोजनावर चर्चा केली.

यावेळी सुनेत्रा पवार यांनी अकोला जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक स्थितीचा आढावा घेतला. जिल्ह्यातील पक्षाची ताकद, कार्यकर्त्यांचे कामकाज, जनसंपर्क अभियान आणि आगामी राजकीय रणनीती याबाबत त्यांनी संदीपदादा पाटील यांच्याकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.


## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५९/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :-** सारनाथ बुद्ध विहार चॅरीटेबल ट्रस्ट, पिल कॉलोनी, मलकापूर, अकोला

**अर्जदार : -** कल्पना लक्ष्मन खंडारे रा. पिल कॉलोनी, मलकापूर, अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ)जंगम मिळकत (वर्णन) :- १००१/- रुपये कल्पना लक्ष्मन खंडारे यांचे जवळ जमा. आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-१०/०६/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५६/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :-** शिवराणा उदयान समिती कृष्ण नगरी कौलखेड अकोला ता.जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. गोपालसिंग गजाननसिंग शिरे रा. कौलखेड, अकोला ता.जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत .

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ)जंगम मिळकत (वर्णन) :-९०९/- रुपये श्री. गोपालसिंग गजाननसिंग शिरे यांचे जवळ जमा. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-११/०६/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
(शिक्का) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला


# अनु. जाती व अनु. जमातीच्या शेतकऱ्यांसाठी योजना

# यंत्र, अवजारांसाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यात केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान ,राष्ट्रीय कृषि विकास योजना कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प या योजना महाडीबीटी पोर्टलवर राबविल्या जात आहेत.

महाडीबीटी प्रणालीवर ट्रॅक्टर चलित औजारे,पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्र औजारे,पिक संरक्षण साधने मनुष्य व बैल चलित औजारे,प्रक्रिया युनिट.भाडे तत्वावर कृषि यंत्र व औजारे सेवा पुरवठा केंद्राची उभारणी (CHC) औजारे बँक,ईतर यंत्र सामुग्री करिता ५० टक्के अनुदान मर्यादा व मार्गदर्शक सुचनेनुसार जे कमी असेल ते या बाबीच्या लाभासाठी महाडीबीटी (https:// mahadbtmahait. gov.in) या वेबसाईटवर जाऊन अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.महाडीबीटी पोर्टलवरील लाभार्थी निवड सोडत लॉटरी ऐवजी प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य निवड लागू राहील असे आवाहन डॉ.मुरली इंगळे,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांनी केले आहे व अधिक माहितीकरिता कृषि विभागाच्या सहायक कृषी अधिकारी, उप कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## गोटपॉक्स लसीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

**अकोला :** पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागाने जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणेला दिले आहेत.लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे.


**CHANGE NAME**

I, NILOFAR FIRDOUS EJAZ KHAN (Old Name) R/o. Opp. Bhagatwadi, Galli No. 4, Raja Chowk, Khair Mohammad Plot, Akola, Tq. Dist. Akola, Passport No. Y6494673 hereby declare that, my said name is mistakenly and by typographical technical mistake mentioned as NILOFAR FIRDOUS EJAZ KHAN (Old Name). That, my name on all the documents are mentioned as
**"NILOFAR KHAN EJAZ KHAN"**
therefore, I have changed my name as
**"NILOFAR KHAN EJAZ KHAN"**
(New Name) as per Passport No. Y6494673 and Adhar Card No. 8225 3534 1489. I am the one and the same person of the above said two names and there is no any person of the said names other than me.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७०९/२०२६ प्रोसेस नं.७३६८/२०२६
चौ.ता. २४/०७/२०२६ दिनांक : ०९/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती लिलाबाई बाजीराव मेटांगे २. संजय बाजीराव मेटांगे मो. नं. ८०८७१०१९६५ ३. अरूण बाजीराव मेटांगे रा. पी. एल. ६३१, सेक्टर नं. १८, शिवतेज नगर, चिंचवड, पुणे शहर, ता. जि. पुणे. ४११०१९ ४. रविकुमार बाजीराव मेटांगे १, २ व ४ रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. जयश्री देवलाल काळमेघ रा. साई नगर, शेगाव रोड, शिवकृपा कॉम्प्युटर जवळ, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : बाजीराव रामचंद्र मेटांगे
**पत्ता :-** रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बाजीराव रामचंद्र मेटांगे यांचे दि. ११/०३/२०१४ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व क्रिटीकल केअर सेंटर अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार**
(शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# मान्सूनपुर्व रोगप्रतिबंधक लसीकरणाला मोहिम स्वरुपात प्रारंभ

■ प्रतिनिधी | अकोला ■

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे.

या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प व फऱ्या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले की, लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे. मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### पशुपालकांना आवाहन

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे.

# संविधानभवनमध्ये आज 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' जिल्हास्तरीय मेळावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत अकोला जिल्हास्तरीय मेळावा उद्या (१२ जून) सकाळी ११ वा. संविधानभवन येथे होणार आहे.

राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांच्यासह अनेक मान्यवर मेळाव्याला उपस्थित राहतील. मेळाव्यात अभियानाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, विविध विभागांची भूमिका, जिल्हास्तरीय अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

गावपातळीवर आरोग्यविषयक जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना, माता व बाल आरोग्य पोषण, स्वच्छता, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण, तसेच आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार यावर अभियानाद्वारे भर दिला जात आहे. या अभियानात विविध शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्थांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असून, अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी केले आहे.



# ...जिल्हाधिकारी मॅडम, ‘रेतीच्या डॉन’ला कोणाचा आशीर्वाद

## प्रशासन झोपेत, शहरात काळया सोन्याची खुलेआम साठेबाजी

**वर्धा/ रवींद्र लाखे**

शासनाने १० जूनपासून जिल्ह्यातील सर्व वाळूघाटांवरील उपशाला पूर्णविराम दिला असला, तरी रेतीमाफियांनी मात्र आधीच कोट्यवधींची तयारी करून ठेवली आहे. शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रेतीचे साठे उभे करण्यात आले असून, त्यामागे राजकीय वरदहस्त असल्याची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. विशेष म्हणजे हिंदी विश्वविद्यालया शेजारी उभा असलेला रेतीचा प्रचंड साठा आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. हा साठा आष्टी तालुक्यातून आणण्यात आल्याची माहिती समोर येत असून, पालकमंत्रींच्या जवळीक असलेल्या ‘सचिन’ नावाचा कथित रेती डॉन अधिकाऱ्यांचे हात ओले करून हा साठा उभा केल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

शासनाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर १० जून ते ३० सप्टेंबरदरम्यान वाळू उपशावर बंदी घातली आहे. मात्र बंदीपूर्वीच घाटधारकांनी अक्षरशः नदीचे पोट ओरबाडत वारेमाप उपसा केला. वाळूघाटांमधून बाहेर काढलेली रेती आता मोकळ्या भूखंडांवर, शेतात आणि शहरालगतच्या परिसरात डोंगरासारखी साठवण्यात आली आहे. प्रशासनाच्या नियमांनुसार घाटालगत मर्यादित साठ्यास परवानगी असली, तरी शहराच्या मध्यभागी आणि दूरवर केलेली साठेबाजी पूर्णपणे अवैध मानली जाते. तरीही अनेक ठिकाणी खुलेआम रेतीचे साम्राज्य उभे राहत असताना महसूल विभागाने डोळेझाक केल्याची चर्चा रंगली आहे.

जिल्ह्यातील ४२ वाळूघाटांच्या लिलावातून शासनाच्या तिजोरीत तब्बल १५ कोटी ४६ लाखांचा महसूल जमा झाला. पण सामान्य नागरिकांना स्वस्तात रेती मिळण्याचे स्वप्न मात्र पुन्हा धुळीस मिळाले आहे. आता पावसाळ्यात रेतीचा तुटवडा निर्माण करून हाच साठा दामदुप्पट दराने विकण्याची तयारी सुरू असल्याचा आरोप होत आहे. घरबांधणी करणाऱ्या सर्वसामान्यांच्या खिशावर याचा थेट परिणाम होणार आहे.विशेष म्हणजे, प्रशासनानेच स्पष्ट केले आहे की घाट परिसर सोडून इतरत्र साठवलेली रेती अवैध ठरू शकते आणि त्यासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक आहे.

मग हिंदी विश्वविद्यालया शेजारील हा प्रचंड साठा नेमका कोणाच्या परवानगीने उभा राहिला? संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी आणि महसूल यंत्रणा काय करत होती? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.दरम्यान, जिल्हाधिकारी मॅडम या संपूर्ण प्रकारावर कठोर कारवाई करणार का, की राजकीय दबावापुढे प्रशासन पुन्हा नमतं घेणार, याकडे आता संपूर्ण वर्धा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. पावसाळ्यात चोरटा उपसा, साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्याची जबाबदारी महसूल प्रशासनावर असताना रेतीमाफियांचे वाढते साम्राज्य अनेक प्रश्न निर्माण करीत आहे.

# पाण्यासाठी महिलांची पायपीट

## दहा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प; ग्रामपंचायत अधिकारी ‘नॉट रिचेबल’

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील बांबरडा व बोरखेडी या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा भीषण प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांना अक्षरशः पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. शासनाकडून नियमित पुरवठा होणारा पाण्याचा टँकर गेल्या दहा दिवसांपासून गावात फिरकलाच नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. एकीकडे उन्हाळ्याच्या झळा कायम असताना दुसरीकडे प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे गावकऱ्यांचे हाल होत असल्याचे चित्र समोर आले आहे.



गावातील विहिरी आणि हातपंपांची पाणीपातळी पूर्णपणे खालावली असून अनेक ठिकाणी पाण्याचे स्त्रोत कोरडे पडले आहेत. अशा परिस्थितीत टँकर हाच नागरिकांचा एकमेव आधार होता. मात्र तोही अचानक बंद झाल्याने महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल भटकावे लागत आहे. अनेक कुटुंबांचा दिवसाचा मोठा वेळ केवळ पाणी आणण्यात जात असून गावातील दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.विशेष म्हणजे, या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न केला. मात्र संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोबाईल क्रमांक सतत ‘नॉट रिचेबल’ लागत असल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला आहे. गावात पाणी नाही, टँकर नाही आणि अधिकारीही संपर्काबाहेर, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.दरम्यान, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावून नियमित टँकर सेवा सुरू करावी, अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे. सामाजिक कार्यकर्ते दिवाकर घटी, मारोती घटी, गणेश चेले, सुचिता धंडाळे, सरपंच लता कडताई आणि जोस्त्ना कडताई यांनी निवेदन देऊन प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## कारला चौकातून दुचाकी चोरी; अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरातील कारला चौक परिसरातून उभी असलेली दुचाकी चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

विशाल दिनकरराव खेडकर (५४, रा. गोंड प्लॉट, केजाजी चौक, वर्धा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते अभिकर्ता म्हणून काम करतात. रात्री साडेआठच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे डेली कलेक्शनसाठी कारला चौक परिसरात गेले होते. त्यांनी त्यांची काळ्या रंगाची होंडा शाईन दुचाकी क्रमांक एमएच ३२ व्ही ६४८६ उभाटे कॉम्प्लेक्ससमोर रस्त्याच्या कडेला उभी केली होती.काम आटोपून काही मिनिटांत परत आल्यानंतर त्यांना दुचाकी जागेवर दिसली नाही. परिसरातील नागरिकांकडे चौकशी करूनही कोणतीही माहिती मिळाली नाही. काही वेळ वाट पाहिल्यानंतर दुचाकी चोरीला गेल्याची खात्री झाल्याने त्यांनी शोधाशोध केली. मात्र गाडीचा मागमूस न लागल्याने त्यांनी रामनगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.चोरीस गेलेल्या दुचाकीची अंदाजे किंमत ३० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी भा.भ्या. संहिता कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रमोद जांभुळकर करीत आहेत.

## भरधाव ट्रकची दुचाकीला धडक; शेतकरी जखमी

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

शहरातील नांदगाव चौक परिसरात भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चालक अपघातानंतर पसार झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरज बंडू लोणारे (२५, रा. चिंचोली) यांनी दिलेल्या तक्रारीवरून १४ चाकी ट्रक क्रमांक एमएच ४० सीडी १०९७ च्या अज्ञात चालकाविरुद्ध भा.न्या.सं. कलम २८१, १२५(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी बाबाराव लोणारे (६५) हे त्यांच्या फॅशन प्रो दुचाकीने पिपरा येथे बहिणीकडे जात होते. सकाळी साडेदहा ते अकराच्या दरम्यान नांदगाव चौकात रस्ता ओलांडत असताना भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.या अपघातात बाबाराव लोणारे यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले. स्थानिकांनी त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली.अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला असून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अनिल केकतपुरे करीत आहेत.

# वणा नदीपात्रातून रेती चोरा

## पोलिसांची कारवाई, सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

वणा नदीपात्रातील अवैध रेती उत्खननाविरोधात हिंगणघाट पोलिसांनी मोठी कारवाई करत ट्रॅक्टर-ट्रॉलीसह सहा लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चालक आणि वाहन मालकाविरुद्ध रेती चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अवैध गौण खनिज तस्करीवर पोलिसांनी पुन्हा एकदा वचक निर्माण केला आहे.

पोलीस हवालदार अनुप टपाले हे पोलीस पथकासह अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंगवर होते. त्यावेळी मुखबिरामार्फत माहिती मिळाली की, बोरगाव येथील वणा नदीपात्रातून एक ट्रॅक्टर रेती भरून कोपरा मार्गे किनगावकडे जात आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन कोपरा चौकात नाकाबंदी केली.काही वेळातच संशयित ट्रॅक्टर येताना दिसताच पोलिसांनी वाहन थांबवले. चालकाने आपले नाव शंकर उत्तम खाडे (वय ४८, रा. कोपरा ता. हिंगणघाट) असे सांगितले. चौकशीत सदर ट्रॅक्टर प्रशांत देविदास वानखेडे (वय ५१, रा. कोपरा) यांचे असल्याचे उघड झाले. ट्रॉलीची पाहणी केली असता त्यामध्ये एक ब्रास म्हणजे सुमारे १२० फुट वाळू भरलेली आढळली.पोलिसांनी रेती वाहतुकीचा परवाना, वाहनाची कागदपत्रे व चालक परवाना विचारला असता आरोपींकडे कोणतीही कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. चौकशीत ही वाळू वणा नदीपात्रातून अवैधरित्या उत्खनन करून आणल्याची कबुली आरोपींनी दिल्याचे पोलिसांनी सांगितले. यानंतर पोलिसांनी महिंद्रा युवो ५७५ डीआय ट्रॅक्टर (एमएच ३४ एपी ४६०९), ट्रॉली आणि रेती असा एकूण ६ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात अप.क्र. ०९११/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम ३०३(२), ३(५) सह मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हिंगणघाट तालुक्यात वाढत्या रेती तस्करीविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार राकेश शिवणकर करीत आहेत.

# चिखलात जनता, राजकारणात समाजकंटक

## संत तुकडोजी वार्डात रस्ता बंद पाडण्याचा डाव उधळला; नागरिकांचा पालिकेवर मोर्चा

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

संत तुकडोजी वार्ड प्रभाग क्र.१६ मधील महाराणा प्रताप जिम ते वैष्णव नगरी या अत्यंत महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्याच्या विकासकामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न अखेर नागरिकांच्या संतापासमोर कोसळला. अनेक वर्षांपासून चिखल, खड्डे आणि दुर्दशेने त्रस्त असलेल्या नागरिकांना अखेर रस्त्याची मंजुरी मिळताच काही विकासविरोधी समाजकंटकांनी काम बंद पाडण्यासाठी कारस्थान सुरू केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. वैष्णव नगरी, श्रीहरी नगरी आणि माऊली नगरी परिसरातील हजारो नागरिकांसाठी हा रस्ता जीवनवाहिनी मानला जातो. पावसाळ्यात तर या मार्गाची अवस्था नरकयातनेपेक्षा भयंकर होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. शाळकरी विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढावी लागते, दुचाकीस्वारांना वाहन हातात धरून चालावे लागते, तर एखादा रुग्ण गंभीर अवस्थेत असेल तर त्याला



दवाखान्यात कसे न्यायचे हा प्रश्न उभा राहतो.या समस्येमुळे परिसरातील नागरिकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासन व आ.समीर कुणावार यांच्याकडे रस्ता दुरुस्तीची मागणी केली होती. अखेर सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाने रस्त्याला मंजुरी दिली. मात्र, एका स्थानिक माजी नगरसेविकेच्या पतीने या विकासकामालाच विरोध करत निवेदनबाजी सुरू केली. ज्यांना कधी या भागातील नागरिकांच्या वेदना दिसल्या नाहीत, तेच आता विकासाच्या आडवे येत आहेत, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला.नगरसेवक सौरभ पांडे यांच्या नेतृत्वात परिसरातील नागरिकांनी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांची भेट घेत प्रशासनाला ठाम पाठिंबा दर्शविला. समाजहिताच्या कामात अडथळा आणणाऱ्यांना जनता धडा शिकवेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.रस्त्याच्या कामाला विरोध करणाऱ्यांचा जाहीर निषेध करत नागरिकांनी विकास रोखणाऱ्यांना आता जनता उत्तर देईल असा निर्धार व्यक्त केला.

### जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका

# शरद पवारांच्या भेटीनंतर राजकीय हालचालींना वेग

**मुंबई/ वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील बदलत्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आगामी राजकीय रणनिती आखण्यास सुरुवात केली असून,त्यासाठी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांची महत्त्वपूर्ण सदिच्छा भेट घेण्यात आली. या बैठकीत वर्धा जिल्ह्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, पक्ष संघटन मजबूत करण्याची दिशा, युवकांना पक्षाशी जोडण्याचे प्रयत्न आणि जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी शरद पवार साहेबांनी तळागाळातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्याचे मार्गदर्शन केले. विकासाभिमुख राजकारण आणि जनतेशी थेट नाळ जोडणारा पक्षच भविष्यात मजबूत होईल, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली.वर्धा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नव्याने संघटनात्मक बांधणी करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात



आला. बूथस्तरापासून पक्ष मजबूत करण्यासाठी युवकांना मोठ्या प्रमाणावर संधी देण्याचा निर्णय यावेळी चर्चेत आला. आगामी काळात जिल्हाभर जनसंवाद अभियान, कार्यकर्ता मेळावे, संघटन विस्तार मोहीम आणि जनहिताच्या प्रश्नांवर आंदोलनात्मक भूमिका घेण्याची रणनीती आखण्यात येणार असल्याचेही समोर आले. पक्षाची ताकद वाढवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, प्रदेश महासचिव सुनिल राऊत, प्रदेश सचिव तथा प्रवक्ते नितेश कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर J9739512 वरील माझे SANDHYA MOREY असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील SANDHYA ANILSINGH MORE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-कीर्ती अपार्टमेंट कोठी रोड महाल नागपूर 440032**

**जाहीर सूचना**

माझे पती नानाजी व्यंकटराव बुटे यांचे दिनांक 10/08/ 2025 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या मालकीचे ट्रॅक्टर वाहन क्रमांक MH32 P 1701 चेचीस नंबर PY5104B019984

इंजिन PY3029D266854 हे आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव आशा नानाजी बुटे (वय-७६ ) रा. वार्ड नं १ जुनोना ता, सेलू जि, वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**आशा नानाजी बुटे (वय-७६)**
**वार्ड नं, १ जुनोना ता, सेलू जि, वर्धा**
**मो, ९५५२१४३०५९**

# वर्धा येथील कामगारांचा लढा मुंबईत पोहोचला

## प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे अधिकाऱ्यांना फटकारे

**मुंबई/ वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांनी अखेर मंत्रालय हादरले. नोंदणी, नूतनीकरण, शिष्यवृत्ती, अनुदान आणि ऑनलाईन यंत्रणेतील गोंधळामुळे त्रस्त झालेल्या कामगारांच्या न्याय हक्कासाठी मुंबई मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावत, बांधकाम कामगारांचे प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढा, अन्यथा जबाबदारी निश्चित केली जाईल, असा कडक इशारा दिला.

बैठकीला राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कामगार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री, यशवंत झाडे, मनीष गौरखेडे व अंकुश धुर्वे उपस्थित होते.बैठकीत उमेश अग्निहोत्री यांनी वर्धा जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या समस्या अत्यंत आक्रमक व ठाम भूमिकेतून मांडत प्रशासनाच्या कारभारावर थेट सवाल उपस्थित केले. अनेक महिन्यांपासून नोंदणी व नूतनीकरण अर्ज रखडल्यामुळे हजारो कामगार शासनाच्या



कल्याणकारी योजनांपासून वंचित राहत असल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी लावून धरला.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक बिघाडामुळे कामगार अक्षरशः हेलपाटे मारत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी अधिकाऱ्यांसमोर उघडी पाडली. शिष्यवृत्ती योजना, ई-०५ अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षण योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, प्रोफाईल दुरुस्ती, बँक खात्यांतील त्रुटी, प्रलंबित अनुदान अर्ज आणि सरल आयडी संदर्भातील गोंधळामुळे कामगारांचे हाल होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील कामगारांकडून काही ठिकाणी नियमबाह्य कागदपत्रांची मागणी करून त्यांना त्यांच्या हक्कांपासून दूर ठेवले जात असल्याचा संतापजनक प्रकारही बैठकीत समोर आला. यावर संतप्त प्रतिक्रिया देत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. कल्याणकारी मंडळाच्या कार्यपद्धतीत सुधारणा करून कामगारांना वेळेत लाभ मिळतील, यासाठी सकारात्मक पावले उचलण्याचे संकेतही बैठकीत देण्यात आले.बैठकीनंतर उमेश अग्निहोत्री यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, वर्धा जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या न्याय हक्कांसाठी आमचा लढा थांबणार नाही. कामगारांना त्यांच्या हक्काच्या योजना वेळेत मिळेपर्यंत शासन दरबारी संघर्ष सुरूच राहील.मंत्रालयातील या बैठकीमुळे वर्धा जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या असून, आता शासन खरंच जागं होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १९५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मान्सूनपूर्व पूर आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## मालखेड तलावावर रंगीत तालीम





**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उद्भवू शकणाऱ्या पूर परिस्थितीचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिष येरेकर यांच्या आदेशाने मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ ) नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथक, जिल्हाधिकारी कार्यालय , अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने या थरारक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संतोष काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड तलाव येथे जिल्हास्तरीय पूर आपत्ती व्यवस्थापन रंगीत तालीम (मॉकड्रिल) पार पडली. या रंगीत तालीमीदरम्यान पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांची सुरक्षित सुटका करणे, त्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवणे आणि पूर परिस्थितीमुळे घरांची पडझड किंवा इतर आपत्ती ओढवल्यास शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून जीवितहानी कशी टाळायची, याचे थेट सादरीकरण करण्यात आले. विशेषतः ग्रामीण भागात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास ती स्थानिक पातळीवर कशी हाताळावी, याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण एनडीआरएफ नागपूर आणि जिल्हा शोध व बचाव पथकातील तज्ज्ञांनी विविध प्रात्यक्षिकांद्वारे दिले. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत महसूल, पोलीस आणि आरोग्य विभागातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या काय असाव्यात, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या मोहिमेत चांदूर रेल्वे तालुक्यातील महसूल विभाग, गटविकास अधिकारी, संबंधित कर्मचारी आणि आरोग्य यंत्रणेने सक्रिय सहभाग घेतला.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, चांदूर रेल्वेचे नायब तहसीलदार अनिल चौरे, पोलीस निरीक्षक मिश्रा, पोलीस निरीक्षक यादव, एनडीआरएफ नागपूरचे डॉ. झा, मुंबई मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ अनुराग कचोरी, महसूल अधिकारी प्रमोद शिरसाठ, तलाठी दीपक चव्हाण, आरोग्य यंत्रणेचे डॉ. अविनाश पवार, प्रीती पवार, सौरव पाठक, मनोज माकोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सचिन धरमकर, विशाल लिमकर, आकाश निमकर, कौस्तुभ वैद्य, सुमित बांबल, प्रतिक कडू, नारायण दवंगे, अशोक निंबरते तसेच 'आपला मित्र' संस्थेचे तुषार गोंडाणे व अमोल गोंडाणे यांनी प्रत्यक्ष पाण्यात उतरून शौर्यपूर्ण बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी केले.

Format C-1

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate :** **PRAVIN RAMCHANDRA POTE**
101, Shriprasad, Post Shivajinagar, Rathinagar, Dist. Amravati-444603

**Name of political party :** **Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Amravati Local Authorities Constituency**

**Name of Constituency :** **Amravati Local Authorities Constituency**

I **PRAVIN RAMCHANDRA POTE,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(PRAVIN RAMCHANDRA POTE)**

Format C-2

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party :** **Bharatiya Janata Party**
***Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Amravati Local Authorities Constituency**
**Name of State/UT :** **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Amravati Local Authorities Constituency | PRAVIN RAMCHANDRA POTE | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Amravati Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# 'सारथी'तर्फे गाविलगड आणि असदगड किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम



**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठा, कुणबी व कुणबी-मराठा समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत असलेल्या 'सारथी' संस्थेच्या वतीने राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांवर विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नुकताच हा उपक्रम पार पडला. छत्रपती शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन करणे आणि शाहू महाराजांच्या लोककल्याणाचा विचार पुढे नेणे, हा यामागचा मुख्य उद्देश होता.

या मोहिमेत अमरावती विभागांतर्गत चिखलदरा येथील गाविलगड आणि अकोला येथील असदगड किल्ल्यावर 'सारथी'च्या संशोधन अधिछात्रवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गाविलगड येथे उपव्यवस्थापकीय संचालक सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी शंकर गोरे, रूपेश पडघन, सदाशिव आरसोड, योगेश भोयर, पवन मापारी आणि कर्मचारी किरण चाफाले, देवानंद सोळंके व कुलदीप सूरकर यांनी परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता मोहिमेसोबतच विद्यार्थ्यांनी स्थानिक प्रजातींच्या बिया, माती, शेण व बाविस्टीन पावडरचा वापर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केलेले 'सिडबॉल' चिखलदरा परिसरात टाकले, जेणेकरून पावसाळ्यात उत्तम वृक्षनिर्मिती होईल.

# ४० वर्षीय मजुर धरणातील पाण्यात बुडाला

**अमरावती/प्रतिनिधीः-** मासोद येथील गिट्टी खदान धरणातील पाण्यात एक मजूर बुडाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी उघडकीस आली. अब्दुल वाहिद (वय ४०) असे त्या मजूराचे नाव असून, त्याचा शोध सुरु होता.

मिळालेल्या माहितीनुसार, टाइल फिटिंगचे काम आटोपल्यानंतर अब्दुल वाहिद आपल्या तीन मित्र वसीम, सुफियान आणि मोहम्मद शोएब यांच्यासह धरणावर आंघोळीसाठी गेला होता. पाण्यात उतरल्यावर अचानक त्याचा पाय घसरला आणि तो खोल पाण्यात बुडाला. घटनेनंतर काही क्षणांतच मित्रांनी आरडाओरड करत मदतीसाठी धाव घेतली, मात्र वाहिद पाण्याच्या प्रवाहात दिसेनासा झाला. या घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे. धरण परिसरात स्थानिक नागरिकांची मोठी गर्दी झाली असून प्रशासनाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१०५५/२०२६
ज्योती व इतर व निरंक
पुढील ता.०१.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. **ज्योती संजय अग्रवाल,** वय ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. **शुभम संजय अग्रवाल,** वय ३३ वर्षे, व्यवसाय - व्यापार
दोघे रा. दुर्गा पॅलेस, पाठयपुस्तक मंडळा जवळ, किशोर नगर कॉलनी, विमवि, अमरावती
३. **गायत्री सारंग सिंघानिया,** वय ३० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा. १०६ ए, मिश्रा लाईन परतवाडा

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत संजय सिताराम अग्रवाल** हे दि.१०.०३.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार ज्योती व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे ०८.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**कि.दि.अ. क्र.११३/२०२६** **ने.ता.१३.०७.२०२६**

**अर्जदार :**
१. **मोहमद शादाब मोहमद,** वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.छाया नगर, अमरावता, ता.जि.अमरावती
२. **मेहरोज तबस्सुम मोहमद वासिम,** वय २६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.ताज नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. **शाहीन तबस्सुम अब्दुल शहीद,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.छाया नगर, अमरावती, ता. जि.अमरावती

ज्याअर्थी, अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम,१८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदारांनी खालीलप्रमाणे अर्ज दाखल केला आहे की,

अर्जदार क्र.१ व ३ यांचे वडिल व अर्जदार क्र.३ चे पती **अब्दुल शहीद अब्दुल अलीम**, रा.मुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती याचे **दिनांक २३/०१/२०२६** रोजी निधन झाल्याने त्यांचे कायदेशिर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता सदर अर्ज दाखल केला आहे.

तसेच अर्जदारांनी नमुद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

म्हणून, या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपली हरकती **दिनांक ०३.०७.२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकिलामार्फत लेखी स्वरुपात सादर करावयात. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहीरनामा दिनांक ११/०६/२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का

**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर),
नांदगाव खंडेश्वर

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
**आर.एम.जे.सी.क्र.७३४/२०२५** **ने.ता.०१.०१.२०२६**

**अर्जदार -**
१. **पद्मा नंदकिशोर औरंगपुरे,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.दाभेरी, पो.तळेगाव, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **स्नेहल नंदकिशोर औरंगपुरे,** वय २७ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.दाभेरी, पो.तळेगाव, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **संकेत नंदकिशोर औरंगपुरे,** वय २४ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.दाभेरी, पो.तळेगाव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**कोणीही नाही**

वरिल सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८), १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ व ३ चे वडील **नामे नंदकिशोर साहेबराव औरंगपुरे** हे **दि.१६.०९.२०२५** रोजी दाभेरी, ता.मोर्शी,जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक २८.११.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

Shri Shivaji Education Society, Amravati
**Matoshree Vimalabai Deshmukh Mahavidyalaya,**
Shivaji Nagar, Amravati - 444603

**WANTED**

Applications are invited for appointments of Candidates for teaching in the Junior College on Contributory (CHB) basis as under :-

**Junior College- Granted (C.H.B.)**

| S.N. | Subject | No. of Post | Eligibility |
|---|---|---|---|
| 01 | Economics | 01 | M.A. (Eco)-2nd Class (Mini 50%), B.Ed |
| 02 | Cooperation | 01 | M.Com. 2nd Class (Mini 50%), B.Ed |
| 03 | Physics | 01 | M.Sc. (Phy)- 2nd Class (Mini 50%), B.Ed |
| 04 | Chemistry | 01 | M.Sc. (Che)- 2nd Class(Mini 50%), B.Ed |
| 05 | Physical Edn. | 01 | M.P. Ed. 2nd Class (Mini 50%) |

**Junior College-Partially Granted (C.H.B.)**

| S.N. | Subject | No. of Post | Eligibility |
|---|---|---|---|
| 01 | English | 01 | M.A. (Eng)-2nd Class (Mini 50%), B.Ed |
| 02 | Marathi | 01 | M.A. (Mar)- 2nd Class (Mini 50%), B.Ed |
| 03 | Mathematics | 01 | M.Sc. (Math)- 2nd Class (Mini 50%), B.Ed |

**HSC Vocational Deptt. (C.H.B.)**

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | G.F.C. (Granted) | 01 | M.Com. -2nd Class or M.B.A. |

**N.B. :-** Eligible candidates should remain present in the college for the direct interview on **dated 22.06.2026 at 10.30 am. to 01.30 pm.** alongwith application, original documents, xerox copies of documents at their own expenses.
*The remuneration will be payable as per govt. G.R. No. Vetan-1214/191/TNT-3, Dtd. 30.04.2025

Shri. Harshavardhan P. Deshmukh
President
Shri Shivaji Education Society,
Amravati

Dr. Smita R. Deshmukh
Principal
Matoshree Vimalabai Deshmukh
Mahavidyalaya, Amravati

Shri Shivaji Education Society, Amravati
**Matoshree Vimalabai Deshmukh Mahavidyalaya,**
Shivaji Nagar, Amravati - 444603

**WANTED**

Applications are invited for appointments of Candidates for teaching in the College on Contributory (CHB) basis as under :-

**Vacancies for Science & Commerce Deptt. (Non-Grant)**

| S.N. | Subject | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 01 | Physics | 02 |
| 02 | Chemistry | 03 |
| 03 | Botany | 02 |
| 04 | Zoology | 02 |
| 05 | Mathematics | 02 |
| 06 | English | 01 |
| 07 | Marathi | 01 |
| 08 | Hindi | 01 |
| 09 | Commerce | 04 |

**Eligibility :-** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण 2018/(185/18) मशि-3, dt. 14.11.2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

**N.B. :-** Eligible candidates should remain present in the college for the direct interview on **dated 22.06.2026 at 10.30 am. to 01.30 pm.** alongwith application, original documents, xerox copies of documents at their own expenses.

Shri. Harshavardhan P. Deshmukh
President
Shri Shivaji Education Society,
Amravati

Dr. Smita R. Deshmukh
Principal
Matoshree Vimalabai Deshmukh
Mahavidyalaya, Amravati

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २७४**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# ४८ कोटींच्या दंडवसुलीला महसूल यंत्रणेतूनच अडथळे?

## चांडक प्रकरणात एसडीओ-तहसीलदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

## जनमाध्यमने काही तासांत शोधल्या मालमत्ता; प्रशासनाला महिन्यांपासून 'पत्ता' नाही!




**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात आकारण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीची प्रक्रिया आता महसूल प्रशासनाच्या भूमिकेमुळेच वादाच्या केंद्रस्थानी आली आहे. शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचा प्रश्न असताना संबंधितांकडून वसुली करण्याऐवजी कारवाई लांबविण्याचे प्रयत्न सुरू आहेत काय, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, 'संतोष चांडक यांच्या मालमत्तांचा शोध सुरू आहे' असा दावा महसूल विभागाकडून सातत्याने केला जात असताना जनमाध्यमने सार्वजनिक ऑनलाइन अभिलेख, जमीन नोंदी आणि उपलब्ध शासकीय माहितीच्या आधारे काही तासांतच अनेक मालमत्तांचा तपशील समोर आणला आहे. त्यामुळे महसूल विभागाची कार्यपद्धती आणि इच्छाशक्ती या दोन्हींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शासनाच्या तिजोरीत जमा होणे अपेक्षित असलेले ४८ कोटी रुपये अद्याप वसूल झालेले नाहीत. त्याहून गंभीर बाब म्हणजे या प्रकरणात प्रत्यक्षात कोणती कारवाई झाली, याची माहितीही प्रशासनाकडून स्पष्टपणे दिली जात नसल्याने संशय अधिकच वाढत आहे.

मार्च एंडिंगच्या काळात महसूल विभागाने अचानक हालचाली करत संतोष चांडक यांना नोटीस बजावली होती. त्यानंतर अकोटचे उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदारांना आरसीसी (ीनहल णीूर्ग्मीू णी) उघडून दंडवसुलीची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली होती.

मात्र त्यानंतर या प्रकरणाची फाईल नेमकी कुठपर्यंत पोहोचली, किती मालमत्ता जप्त करण्यात आल्या, वसुलीसाठी कोणती कारवाई झाली किंवा शासनाच्या खात्यात किती रक्कम जमा झाली, याबाबत प्रशासन मौन बाळगून आहे.

यामुळे आरसीसीची प्रक्रिया केवळ कागदोपत्री राहिली की प्रत्यक्ष वसुलीचा प्रयत्न झाला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### चौकशीचे आदेश; पण चौकशी करणार कोण?

जनमाध्यमच्या वृत्तमालिकेची दखल घेत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोटचे एसडीओ आणि तहसीलदार यांना चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र ज्यांच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत, त्यांच्याकडूनच चौकशी करून घेण्यात येत असल्याने निष्पक्षतेबाबत शंका व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात कर्तव्यात हलगर्जीपणा झाला का? दंडवसुलीची प्रक्रिया जाणीवपूर्वक लांबविण्यात आली का? शासनाचे आर्थिक नुकसान होईल असे निर्णय घेण्यात आले का? या सर्व मुद्द्यांची सखोल चौकशी होण्याची गरज व्यक्त होत आहे.

### ■ अपील प्रक्रियेवरही संशय-

या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक मुद्दा म्हणजे दंडाविरोधातील अपील प्रक्रिया. उपलब्ध माहितीनुसार उच्च न्यायालयाने निश्चित मुदतीत सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागण्याची मुभा दिली होती. मात्र ती मुदत उलटल्यानंतरही अपील स्वीकारण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. याशिवाय नियमानुसार आवश्यक रक्कम जमा न करताच अपील दाखल करून घेण्यात आल्याचा आरोप होत आहे. जर या आरोपांमध्ये तथ्य आढळले, तर तो केवळ प्रशासकीय दोष न राहता शासनाच्या आर्थिक हिताला धक्का पोहोचविणारा गंभीर प्रकार ठरू शकतो. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### आता जिल्हाधिकाऱ्यांच्या धडक दौऱ्याची मागणी

तेल्हारा तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केलेल्या अचानक पाहणीमुळे प्रशासनात खळबळ उडाली होती. त्याच धर्तीवर जिल्हाधिकाऱ्यांनी अकोट तालुक्यातील गाजीपूर आणि रुदाळी खाणींची अचानक पाहणी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या परिसरात अवैध उत्खनन, क्षमतेपेक्षा अधिक खनिज उपसा, रात्रीच्या वेळी होणारे ब्लास्टिंग, धुळीचे प्रदूषण, शेतीचे नुकसान आणि धरण सुरक्षेचे प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र कागदोपत्री अहवाल आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये मोठी दरी असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी थेट घटनास्थळी जाऊन पाहणी केल्यास अनेक प्रश्नांची उत्तरे समोर येऊ शकतात. विशेषतः ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीच्या प्रकरणात प्रशासनाने नेमकी कोणती भूमिका घेतली, हेही स्पष्ट होऊ शकते. सध्या संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर होणाऱ्या अहवालावर लागले असून, या प्रकरणात जबाबदार कोण आणि संरक्षित कोण, याचे उत्तरच महसूल प्रशासनाची विश्वासार्हता ठरविणार आहे.

### जनमाध्यमला सापडते, महसूलला का नाही?

वडाळी सटवाई, तांदुळवाडी, केमलापूर, लखमापूर आणि अंजनगाव परिसरातील विविध मालमत्तांचा उल्लेख सार्वजनिक अभिलेखांमध्ये असल्याची माहिती समोर आली आहे. या नोंदींची सत्यता तपासणे आणि मालकीची पडताळणी करणे ही महसूल विभागाची जबाबदारी आहे. मात्र अशा नोंदी सहज उपलब्ध असताना प्रशासनाकडून अद्याप 'मालमत्ता शोध सुरू आहे' असे सांगितले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यामागे अकार्यक्षमता आहे की जाणीवपूर्वक दुर्लक्ष, याबाबत चर्चा रंगू लागली आहे.

### ■ प्रतिसाद नाही ; प्रतिक्रियेपासून पलायन

या संदर्भात अकोटचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांची भूमिका जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्यात आला. मात्र वारंवार प्रयत्न करूनही दोन्ही अधिकाऱ्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. सरकारी अधिकाऱ्यांचे हे मौन अनेक प्रश्न निर्माण करणारे ठरत आहे. जनतेच्या पैशाचा आणि शासनाच्या महसुलाचा प्रश्न असताना संबंधित अधिकारी बोलण्यास का टाळाटाळ करीत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.

# काटेपूर्णा नदी पात्रात बुडाल्याने मायलेकाचा करून अंत

### -दोन महिला थोडक्यात बचावल्या, समशेरपुर गावांत हळहळ



**मूर्तिजापूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील समशेरपूर येथे अधिक मासानिमित्त काटेपूर्णा नदीवर स्नानासाठी गेलेल्या माय-लेकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला तर दोन महिला थोडक्यात बचावल्या असल्याची घटना आज गुरुवार ११ जून च्या सकाळी १० वाजता सुमारास घडली आहे. वृषाली हरिदास खोत (वय ३५) आणि स्वराज हरिदास खोत (वय १०) अशी मृतांची नावे आहेत. तर माधुरी उमेश खोत व मीरा श्यामसुंदर चौधरी थोडक्यात बचावलेल्या महिलांची नावे आहे.

अधिक महिन्यात घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. मुलाला वाचवण्यासाठी नदीत उडी मारणाऱ्या आई आणि मुलाचा बुडून मृत्यू झाला. माहिती नुसार, वृषाली हरिदास खोत, माधुरी उमेश खोत, मीरा श्यामसुंदर चौधरी व स्वराज खोत अधिक मास निमित्य नदीवर आंघोळीसाठी गेले होते. यावेळी स्वराज खोत याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात जाऊन बुडू लागला. आपल्या मुलाला वाचवण्यासाठी आई वृषाली खोत यांनी तत्काळ पाण्यात उडी घेतली. मात्र दोघांनाही पोहता येत नसल्याने ते पाण्याच्या प्रवाहात वाहू लागले. हे पाहून त्यांच्यासोबत असलेल्या माधुरी खोत आणि मीरा चौधरी यांनीही मदतीसाठी नदीत उडी घेतली. मात्र त्याही पाण्यात अडकल्या. आरडा ओरडा ऐकून नदीजवळ

☞(पान २ वर)

# २३ सहाय्यक पोलीस निरीक्षकांची बदली

### ग्रामीण पोलीस दलात मोठे फेरबदल -९ अधिकाऱ्यांना नव्याने ठाण्याची धुरा

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी १० जून रोजी जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल केले आहेत. प्रशासकीय कारणास्तव जिल्ह्यातील २३ सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या तात्पुरत्या स्वरूपात बदल्या करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत तब्बल ९ पोलीस अधिकाऱ्यांना नव्याने पोलीस ठाण्याची धुरा सोपवण्यात आली असून, उर्वरित अधिकाऱ्यांची इतर पोलीस ठाण्यांमध्ये व नियंत्रण कक्षात रवानगी करण्यात आली आहे.

या आदेशानुसार, नव्याने ठाणेदारकी मिळालेल्या अधिकाऱ्यांमध्ये प्रामुख्याने सपोनि. अनुप वाकडे यांची पो.स्टे. खोलापूर येथे, विलासकुमार सानप यांची पो.स्टे. लोणी येथे,प्रकाश पाटील यांची पो.स्टे. माहुली जहांगीर येथे तर अमोल तुळजेवार यांची पो.स्टे. मंगरूळ चव्हाळा येथे प्रभारी अधिकारी ठाणेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.त्याच प्रमाणे सतिश खेडेकर हे आता पो.स्टे. सरमसपुराचे नवे ठाणेदार असतील. राहुल गवई यांची पो.स्टे. शेंदुरजना घाट येथे, शिवहरी सरोदे यांची पो.स्टे. कुऱ्हा येथे, प्रशांत देशमुख यांची पो.स्टे. रहिमापूर येथे तर. अमोल मुडे यांची पो.स्टे. खल्लार येथे प्रभारी अधिकारी म्हणून नवीन नियुक्ती करण्यात आली आहे.



दुसरीकडे, काही अधिकाऱ्यांची अन्य पोलीस स्टेशन व वेगवेगळ्या विभागांत बदली करण्यात

☞(पान २ वर)

# महानगरपालिकेत किरिट सोमय्या वापस जाओच्या घोषणा

**-एमआयएम आणि ठाकरे गटाचे पदाधिकारी आक्रमक**
**-जन्म प्रमाणपत्र बैठकीसाठी आले असता गोंधळ**
**-वाहनासमोर लोटांगण घालण्याचा प्रयत्न**

**अमरावती/प्रतिनिधीः-** भाजपचे नेते माजी खासदार किरिट सोमय्या हे महापालिकेत आज गुरुवार ११ जून रोजी जन्ममृत्यू प्रमाणपत्र बैठकीसाठी आले असताना एमआयएमच्या आणि उद्धव

☞(पान २ वर)



**विधानपरिषद आचारसंहिता काळात महापालिकेतील बैठकीवर प्रश्नचिन्ह**

# पदाधिकारी-अधिकाऱ्यांवर आचारसंहिता भंगाचा गुन्हा नोंदवा- खा.बळवंत वानखडे

### राज्य निवडणूक आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीचा कार्यक्रम लागू झाला असून दिनांक १८ जून २०२६ रोजी या निवडणुकीचे मतदान होणार आहे. सदर निवडणुकीच्या अनुशंगाने अमरावती शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आदेशाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. परंतु महानगरपालिका आयुक्त तसेच महानगरपालीचे पदाधिकारी यांनी किरिट सोमैया , माजी खासदार यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक ११ रोजी जन्म मृत्यूच्या दाखल्या संदर्भात एक बैठक आयोजित करून आचारसंहिता भंग केला असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याबाबत खासदार बळवंत वानखडे यांनी थेट राज्य निवडणूक आयुक्तांना लेखी पत्राद्वारे किरिट सोमैया , माजी खासदार यांच्यासह

☞(पान २ वर)

# मित्राला सोडण्यासाठी गेलेल्या तरुणावर हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** मित्राला सोडण्यासाठी गेलेल्या तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना खोलापुरी गेट पोलीस ठाणा हद्दीत येणाऱ्या नालसाबपुरा येथे समोर आली आहे. अब्दुल नमिर अब्दूल सलीम (वय ३५) असे हल्ल्यात गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. त्याच्या वर डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात उपचार सुरू आहे. आबिद ईक्का (वय ३५), साकिफ खान उर्फ अखंड खान (वय २६),समीर खान उर्फ सुफियान खान उर्फ अब्दुल खलीफ (वय १९) हे आरोपी आहे. माहिती नुसार अब्दुल नमीर अब्दुल समीर बुधवारी रात्री आपले मित्र शोएब खान (वय



☞(पान २ वर)

# दिलीप एडतकर यांच्या सारख्या नेतृत्वाची कॉँग्रेससह सामान्य जनतेला सुध्दा आवश्यकताः डॉ सुनिल देशमुख

### एडतकर यांचा राजीनामा नामंजूर; सरचिटणीस पदावर कायम राहण्याची पदाधिकाऱ्यांची विनंती

**अमरावती/प्रतिनिधी: -** महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेसचे सरचिटणीस तथा धनगर समाजाचे प्रमुख नेते ॲड. दिलीप एडतकर यांनी सरचिटणीस पदाचा राजीनामा दिला होता. मात्र, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांचा राजीनामा नामंजूर केल्याची माहिती पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. एडतकरांचा राजीनामा नामंजूर करणारे प्रदेश अध्यक्षांचे पत्र आज प्रदेश कॉँग्रेस तर्फे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉक्टर सुनील देशमुख यांनी दिलीप एडतकर यांना सोपविले.



यापूर्वी ॲड. एडतकर यांनी प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, ज्येष्ठ नेत्या यशोमती ठाकूर तसेच

☞(पान २ वर)

# अखेर काजल इंगळे हत्याकांडाचा उलगडा

### मावस भाऊच निघाला हत्यारा -तपोवन परिसरात आढळला होता मृतदेह

**अमरावती/प्रतिनिधीः-** तपोवन परिसरातील जंगलात एका तरुणीचा अर्धवट जळालेला मृतदेह २ जून रोजी सकाळी आढळला होता. अत्यंत क्लिष्ट ह्या प्रकरणात तरुणीची ओळख पटवण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली होती. डीएनए टेस्ट नंतर तिची ओळख पटली. यानंतर तिचा मारेकरी पोलिसांच्या हाती लागत नव्हता , शेवटी गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वी कामगिरी करत काजल जितेंद्र इंगळे (२२, विश्रोली, चांदूरबाजार) हिच्या हत्या प्रकरणात तिचा मावसभाऊ चेतन सुनील थोरात (वय २४, तेजस विहार, राजुरा अमरावती) याला ताब्यात घेतले आहे.त्याने आपल्या गुन्हयाची कबुली दिली. पण हत्या का केली हे अजून पर्यंत स्पष्ट झाले नाही.



माहितीनुसार २ जून रोजी सकाळी तपोवन परिसरातील जंगलात काजल इंगळेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळला होता. ओळख पटू नये म्हणून आरोपीने तिची हत्या करून मृतदेह पेट्रोल टाकून जाळला होता. एका गुराख्याला काजलचा अर्धवट जळालेला मृतदेह दिसला होता. याची

☞(पान २ वर)

### ■ ३०० सीसीटीव्हीचे फुटेज तपासले-

या अत्यंत क्लिष्ट प्रकरणाचा तपास करताना पोलिसांना मोठी पसरत करावी लागली. अहोरात्र परिश्रम करून पोलिसांनी घटनास्थळापासून दूरवरील विविध ठिकाणचे तीनशेच्या वर सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिकी विश्लेषण वरून आरोपी मृतक महिलेचा मावस भाऊ असल्याचे लक्षात आले. शेवटी पोलिसांनी त्याला गुरुवारी सकाळी ताब्यात घेतले.

# ५.१५ किलो गांजासह आरोपी ताब्यात



### -धारणीत पोलिसांची धाड

**अमरावती/प्रतिनिधीः-** धारणी येथील दुबई मोहल्लामध्ये पोलिसांनी एका घरावर धाड मारून ९९,हजार ४२९ रुपये किमतीचा ५.१५६ किलो गांजा जप्त केला. आरोपी खालील अन्सारी कलीम अंसारी याला ताब्यात घेतले आहे. त्याच्या विरुद्ध एनडीपीएस ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामीण भागात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिले आहे. त्यानुसार पोलिसांनी बुधवारी गुप्त माहितीच्या आधारावर दुबई मोहल्लामध्ये खालील अंसारी कलीम अंसारी यांच्या घराची पाहणी केली असता, झडती दरम्यान तिथून ५.१५६ किलो

☞(पान २ वर)

# वारंवार वीजपुरवठा खंडित, नागरिक त्रस्त

### शिवसेनेने दिला आंदोलनाचा इशारा



**अमरावती/प्रतिनिधीः-** वाढत्या गर्मीच्या दिवसात महावितरणच्या वतीने वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात आहे. यामुळे नागरिक वैतागले आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठावर उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने आज गुरुवार ११ जून रोजी

☞(पान २ वर)

# निमगव्हाण येथे प्रतिबंधित एचटीबीटी कपाशी बियाण्यांचा साठा जप्त

### धामणगावच्या युवकाला अटक,बोगस बियाणे रॅकेटला धक्का

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या प्रतिबंधित एचटीबीटी कपाशी बियाण्यांच्या अवैध विक्रीविरोधात तळेगाव दशासर पोलिस आणि कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने मोठी कारवाई केली आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील निमगव्हाण येथे छापा टाकून तब्बल ७ लाख १२ हजार ८०० रुपयांचा एचटीबीटी कपाशी बियाण्यांचा साठा जप्त केला. या प्रकरणी धामणगाव रेल्वे येथील एका युवकाला अटक करण्यात आली आहे.



पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्यांच्या विक्रीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर तळेगाव दशासर पोलिसांनी ही धडक मोहीम राबविली. ठाणेदार सपोनि किरण औटे यांना

☞(पान २ वर)